म. ग्रं. सं. ठाणे

विषय
नाटक

ग्रंथालय क्रमांक
९७
८३

लेखक नारायण बापूजी कानिटकर

सन
१८७५

पुस्तकाचें नांव मल्हारराव महाराज

८३

९७

नाटक

# HARRAO MAHARAJ.

## EX. GAIKWAR OF BARODA,

## A HISTORICAL DRAMA.

### IN SEVEN ACTS.

BY

NARAYAN BAPUJI KANITKAR.

It is not uncommon, unless a Prince is indeed very acute, and unless he is also very determined—It is not uncommon—I will not say, merely in this country, but in every country in the world—for princes to be surrounded by the vilest of servants—men who are plundering them—men who are deceiving them—men who are tricking them—and yet, men in whom they place their confidence.

SERJEANT BALLANTINE.

BOMBAY,

PRINTED AT THE "NIRNAYASAGAR PRESS."

1875.

*Price One Rupee.*

*(Registered under act XX of 1847.)*

(Right of translation reserved.)

Bombay श्री 6/4/76

# मल्हारराव महाराज नाटक.

## सप्तांकी.

नारायण बापुजी कानिटकर,

यांणीं रचिलें.

न तीव्रमति भूप जे, स्थिर न बुद्धि ज्यांची असे।
तयांस अनिनीचसा जन सदैव सेवीनसे ॥
किती फसविती! किती लुटुनि नेति संपत्ति ती! ।
अहा! भरंवसा अशांवरि किती पहा ठेविती ! ॥

मुंबई,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

सन १८७५.

किंमत १ रुपया.

( हें पुस्तक १८४७ चा आक्ट २० प्रमाणें रजिष्टर केलें असे )

( भाषांतर करण्याचा हक्क ग्रंथकर्त्यानें राखिला आहे ).

# १ प्रस्तावना.

आलीकडे ह्या आपल्या महाराष्ट्र भाषेंत कल्पित कादम्बऱ्या व नाटकें बरींच दृष्टीस पडतात, परंतु ह्या सर्वांमध्यें बहुतकरून अंधपरंपरा व अनुकरण हीं वारंवार दृष्टोत्पत्तीस येतात. आज एकानें एक कल्पित गोष्ट किंवा कादंबरी लिहिली तर त्याच धाटणीवर व संविधानकावर दुसरी लिहावी असा चोहींकडे कल होऊन गेला आहे. नाटकें जीं दृष्टीस पडतात तीं गीर्वाणभाषेंत महाविद्वान् कवींनीं जीं उत्तम उत्तम नाटकें लिहून ठेविलीं आहेत त्यांचींच भाषांतरें. इंग्रजीमध्यें शेक्सपियरादि महाकवींनीं वेळोवेळच्या इतिहासास अनुलक्षून जशीं कांहीं नाटकें लिहून ठेविलीं आहेत, तशा प्रकारचें एकही नाटक ह्या आपल्या महाराष्ट्रभाषेंत आजपर्यंत नाहीं ह्मटलें तरी चालेल, व अशा प्रकारचीं असणें हें सध्याच्या देशकालस्थितीवरून पाहिलें असतां अवश्य आहे हें उघड आहे.

नाटक हें ह्या जगतींतील घडामोडीचें चित्र आहे. ह्या जगाच्या रहाटीमध्यें प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांदेखत घडणाऱ्या सुखदुःखाच्या गोष्टी नाटकरूपानें लिहून ठेविल्या असतां, त्या चिरकाल रहातात, व त्या प्रत्येकास आपला वर्तनक्रम सुधरण्यास उपयोगी पडतात. ह्या नाटकावरून देशाचा इतिहास लिहिणारांस मोठें सहाय होतें, अमुक एक वेळेस अमक्या देशाची स्थिति कशी होती, तेथील लोकव्यवहार कसा होता, राजा कसा होता, पदरचे मंत्री कसे होते, हे चांगले किंवा वाईट असल्यानें

सुखदुःखावह परिणाम काय झाले व ते कोणत्या रीतीनें टाळतां आले असते, वगैरे गोष्टी हव्या त्या वेळीं कळण्यास अडचण पडत नाहीं. सदरहू प्रकारचे विचार मनांत येऊन मी हें नाटक लिहिण्याचा यथामति प्रयत्न केला आहे.

ह्या नाटकांतील संविधानक बडोद्याचे माजी रेसिडेन्ट कर्नल फेय़र साहेब यांस विषप्रयोग झाल्याची बातमी महाराज मल्हारराव गायकवाड यांनीं ऐकिल्यापासून तों त्यांस थेट मद्रासेस पोहोंचतें करी तोंपर्यंत आहे. हें संविधानक वेळोवेळीं वर्तमानपत्रादिकांतून बातम्या आल्या त्यांवरून व मला इतर माहिती मिळत गेली त्यावरून साधलें आहे. बहुतकरून ज्या गोष्टी घडत गेल्या त्या त्या कथेंत आणिल्या आहेत, पण कोठें कोठें नाटकास रसाविर्भाव चांगला यावा ह्मणून कांहीं गोष्टी सोडाव्या व कांहीं नव्या कल्पित घालाव्या लागल्या. अशा बहुतकरून सर्व नाटकांत असतातच व असणें साहजिकच आहे. हें नाटक इतिहासास अनुलक्षून असल्यामुळें ह्यांतील सर्व पात्रें खरीं व विद्यमान असणें अवश्य आहे. ह्या पात्रांस कोणचेही प्रकारें दुखवावें असा माझा मुद्दल हेतु नाहीं. सर्व माहितीवरून ज्या साधारणरीत्या मला खऱ्या गोष्टी कळल्या व वाटल्या, त्या मी ह्या पात्रांचे तोंडीं घातल्या आहेत. ह्यामध्यें कांहीं कमजास्त गोष्टी आल्या असल्यास त्यांबद्दल मी क्षमेस पात्र आहे.

हें नाटक लिहिण्याचा मुख्य उद्देश हा आहे कीं एखादा राजा अशिक्षित, भोळा व हलक्या कानांचा असून त्यास रात्रंदिवस सल्ला मसलत देणारे मंत्री स्वार्थी, अक्षरशत्रु व दुर्वर्तनाचे असले तर राजावर वारंवार कशीं घोर संकटें

येऊन त्याचा शेवटीं काय परिणाम होतो हें दाखविण्याचा आहे.

ह्या नाटकांत मुख्य पात्र अथवा नायक **मल्हारराव महाराज** हे आहेत. नाटक सप्तांकी असून करुणरसप्रधान आहे. कमीशनाची सर्व हकीगत आतां जगजाहीर झालीच आहे तरी ह्या नाटकाच्या संविधानकाची सरणि न मोडावी ह्मणून सहाव्या अंकांत थोडक्यांत दिली आहे. हें नाटक लिहीत असतां मला ज्या ज्या विद्वज्जनांनीं वेळोवेळीं योग्य सूचना दिल्या आहेत त्यांबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें.

अशा प्रकारचें हें नाटक महाराष्ट्र भाषेंत पहिलेंच असल्या कारणानें व माझाही हा यत्न पहिलाच आहे ह्मणून, ह्यांत कांहीं न्यूनाधिक्यें राहिलीं असतील, तीं कृपाळू विद्वज्जनांनीं कोणत्याही रीतीनें मला सुचविलीं तर मी त्यांचा आभारी होऊन त्यांचा उपयोग पुढें करून घेईन.

नारायण बापूजी कानिटकर,

ग्रंथकर्ता.

# उपोद्घात.

बहुत असती दुःखें मोठीं सदैव नृपांस या ।
स्थिति बघुनियां त्यांची येई मनास महा दया ॥
कठिण गुदरे अज्ञानानें प्रसंग तयांवरी ।
तरुनि मधुनी जातां भासे कृपा हरिची खरी ॥ १ ॥

नभस्थानीं जैसा प्रबलहि सहस्रांशु वसतो ।
परी त्याचें राहू ग्रहण करुनी तेज हरितो ॥
तसा अज्ञानानें नृप फसुनि फांसांत पडतां ।
कुबुद्धी मंत्र्याच्या, मग गति तया काय पुसतां ॥ २ ॥

पाहोनी स्थिति अति निंद्य दुर्धरा ही ।
हो लज्जाकुल सकला वसुंधराही ॥
राजे हो ! सविनय सावधान राहा ।
काळातें स्मरुनिच राज्यभार वाहा ॥ ३ ॥

V. A. Acharya
ब्याकरोड मुंबई

# मल्हाररावमहाराजनाटक.

## अंक १.

### प्रवेश १ ला.

मराठी ग्रंथ संग्रहालय

स्थल राजवाडा.

पात्रें.

( मल्हारराव महाराज, नानासाहेब खानविलकर, गोविंदरावमामा, हरीबादादा, राजगुरु, जोशिबावा व इतर मंडळी.)

( महाराजांची स्वारी प्रातःकाळीं मुखमार्जन, स्नान वगैरे विधि आटोपून गच्चीवर येते, सर्वजण उठतात व अदबीने मुजरे करून एके बाजूस उभे रहातात.)

**महाराज.**— या दिवाण साहेब, असे या, बसा कि, उभे कां ? हरीबा या असे; मामा बसा; गुरुजी आपण याकि असे इकडे.

**मंडळी.**— ( हात जोडून ) जी सरकार. ( सर्व बसतात.)

**महाराज.**— ( गुरुजींकडे पाहून ) का गुरुजीबोवा, बरें चाललें आहेना? आज हिकडे सकाळींचसे! काय हुकूम आहे ?

**गुरुजी.**— ( हंसतात ) महाराजांसारखे गोब्राह्मणप्रतिपालक प्रभु असतांनां कोणचेही गोष्टींत न्यूनता म

णूक पडणें नाहीं. सर्व यथास्थित चाललें आहे. त्या कालच्या अनुष्ठानाबद्दल सरकारचे हातून उदक सोडविणें आहे. उदक सोडून महाराजांनीं ब्राह्मणांस सुपारी द्यावी ह्मणजे तत्संबंधी जपजाप्यास त्यांस मोकळीक होणार आहे.

महाराज.— फार बरें आहे, मग करवा तयारी.

हरिबा.— ह्या बामनांच न्हेमी कायबि लचांड असतच बगा, आज काय ह्माराज ह्ये करा, उद्या त्ये करा, कुनिकुनबि पैसे उकळायूच मग कायबि असो.

महाराज.—सेनापतींचें ह्या अशा कामांत थोडेंसें दुर्लक्ष्यच असावें, इतकें बारीक पहाणें आपले कामकाजाकडे असलें ह्मणजे मग काय पाहिजे !

हुजऱ्या.— लयि भ्वाळ सरकार आमच, अक्षि धरमाचा अवतारच, उगाचका राज हकयाती यवढ.

महाराज.— पण कसेंही असो, नाना, आज एकदोन दिवस मनाची कांहीं चमत्कारिक स्थिति झाली आहे. कांहीं सुचत नाहींसें झालें आहे. मनांत नाना प्रकारचे तरंग उठतात. दिवसास कारभार सुचत नाहीं, आणि रात्रीं स्वस्थ झोंप येत नाहीं, असा कांहीं प्रकार झाला आहे.

नानासाहेब.— महाराज, असें कां बरें व्हावें; कारण तर कांहीं दिसत नाहीं. महाराजांस ह्मणजे कोणचें एक कमी आहे अशीही गोष्ट नाहीं. जें पाहिजे तें तयार, तशांत आमच्यासारखीं चार शाहणीं माणसें पदरीं असतांना कोणचे गोष्टीची न्यूनता

आहे ! आज्ञा मात्र व्हावी. सेवेस हजर आहोंत.

**दामोदरपंत.**—( मध्येंच ) मी सांगूं ह्या उद्विग्नतेचें कारण! ( हंसून ) खचीत सांगतों आज्ञा होईल तर.

**महाराज.**— हो, मला वाटलेंच होतें—आपलें ह्यावर कांहीं तरी निघेल ह्मणून. बरें निघूंद्या पाहूं, काय मुखसांतून वाकसें निघतात तीं !

**दामोदरपंत.**— ( क्षमा असावी ) सांगूंच तर (हळूच ) महाराजांचें कोणावर तरी मन—

**हरिबा.**—ह्येच, ह्येच, खुप, बामणबोवा ताडलत् अक्षी.

**महाराज.**—बोलले बृहस्पति ! काय ह्या तुमच्या वासना, कोण हा हलकटपणा, आपल्याला मी फार दिवस ओळखतों आहें. पंत ! पण काय करावें, बंधूंकडे लक्ष्य जातें, आणि त्यामुळें अपराध पोटांत घालावेसे वाटतात. पण पुरे, पुष्कळ झाले आतां. पूर्ण अनुभव आला. आतां सेनापतींची तर काय गोष्ट. शहाणे ते शहाणे. हर हर ! काय मी व काय माझे मुत्सद्दी ! असो, जें आहे तें सर्व बरेंच आहे.

**बळवंतराव देव.**— मलाही आजचा प्रकार कांहीं निराळा दिसतो, मुखावर रोजची हुशारी व तजेला आज नाहीं. वाटतें सरकारचें मन कसें काळजीनें ग्रस्त होऊन गेलें आहे. जणूं हृदय सहस्त्र शल्यांनीं विद्ध होऊन गेलें आहे !!

**गोविंदरावमामा.**—अशा ह्या उद्विग्नतेचें काय कारण असेल तें असो. आह्मांकडून कांहीं अपराध झाले असल्यास महाराज माफ करणार समर्थ आहेत.

**बळवंतराव देव.**—महाराज, काय मनांत घोळत असेल तें बाहेर यावें. आजपर्यंत कोणचीही गोष्ट मनांत राहिलीच नाहीं. सरकारचे मनांत आली कीं आह्मांस समजलीच. प्रेमच आहे तसें आह्मांवर खाविंदांचें.

**महाराज**—(सुसकारा टाकून) काय सांगावें. आज दोन तीन दिवस अशीं कांहीं अनिष्ट चिन्हें होताहेत, अशीं दुष्टस्वप्नें पडताहेत कीं तीं सांगतां पुरवत नाहींत. कालरात्रीं असें एक स्वप्न पडलें कीं, जशी काय एक महापर्वणी आली आहे, व मी माझी अत्यंत जिवलग ह्मणविणारी मंडळी बरोबर घेऊन, सोन्याचे रथांत बसून श्री नर्मदाबाईचे स्नानास निघालों आहें. पुढें नर्मदेस पोहोंचल्यावर मोठा चमत्कार दृष्टीस पडला. बाईस प्रचंड पूर येऊन ती फों, फों, फों, करीत दुतर्फा भरून चालली आहे. पलीकडील किनारा तर दिसतच नाहीं. महाप्रचंड वृक्ष मुळासगट उपटून पाण्यांतून मोठ्या वेगानें वाहत चालले आहेत. मोठमोठे मासे पाण्यांतून वर डोकीं काढिताहेत व आपल्या शेंपटांनीं तडातड पाण्यावर आपटिताहेत. मोठमोठे मगर पाण्यांतून बाहेर वाळवंटावर येताहेत व पुन्हां आंत उड्या टाकिताहेत. असा हा भयप्रद चमत्कार पाहून मी गडबडून गेलों आणि माझी पाचांवर धारण बसली. सारांश, जशी एखादी आई मुलाची अल्लड वृत्ति पाहून त्याजवर रागावते त्याप्रमाणेंच ही नर्मदा आई मजवर रागावली आहे कीं काय,

असें मला वाटलें. मी विचार केला कीं, बाई जरी रागावली तरी क्षमा करणार समर्थ आहे. पण मला आतां नर्मदाबाई स्नान कसें घालिते ह्याविषयीं मात्र मोटी काळजी लागली. मी निश्चय केला कीं, आतां कसेंही होवो, येथपर्यंत मातोश्रीनें कृपा करून आणिलें, आतां स्नान केल्याशिवाय तर परत जाणेंच नाहीं. तिजवर माझा पूर्ण भरंवसा आहे. असें ह्मणून स्नान करण्याकरितां मी कांठावर उभा राहिलों इतक्यांत काय चमत्कार झाला कीं, माझ्या जिवलग ह्मणविणाऱ्या एकानें माझे पाठीशीं उभें राहून मला एकदम आंत लोटून दिलें. मी वुडतोंरे वुडतों, अरे चांडाळानों, नाहाक वुडतों, मला काढा लवकर. अरे ह्या वेळेस माझें कोणी संरक्षण करा, अरे नका असे निष्ठुर होऊं. अरे, तुह्मी मागाल तें मी देईन, अरे, सर्व राज्यावर पाणी सोडीन, तुमचा अपराध क्षमा करून तुह्मांस बक्षिसें देईन, कोणी तरी अशा प्रसंगीं उपयोगी पडा; पण दुष्टांस नाहीं दया आली, नाहीं कोणी माझ्या विनवण्यांकडे लक्ष्य दिलें, उलटें चला चला, बरे चालला आहांत! असें दुष्ट मला ह्मणूं लागले. इतकें जों होत आहे तों मी जागा झालों, आणि पहातों तों नर्मदाबाई नाहीं आणि माझ्या हितशत्रूंतूनही कोणी जवळ नाहीं; परंतु महालांत एक माझी प्राणप्रिया मात्र जवळ आहे. काय ह्याचा अर्थ असेल राम जाणें! मला तर मोठी काळजी लागून राहिली आहे. अहो, हें एकचसें

काय, आणखींही दुसरीं अनिष्टचिन्हें कालपासून पुष्कळ होताहेत.

**दामोदरपंत.**—महाराज, स्वप्नांमध्यें काय अर्थ आहे, आणि त्यांची इतकी काळजी तरी कशाला? तीं कोठें खरीं होत असतात कीं काय, आणि त्यांबद्दल इतकें मनांत तें कशास आणिलें पाहिजे? मी ह्मणत होतों असें त्रिकट संकट काय आहे कोण जाणे. भारी पण भितरा स्वभाव.

**राजगुरु**—शांतं पापं! स्वप्न तर अनिष्ट खरेंच, परंतु ईश, कृपा करणार समर्थ आहे.

**महाराज.**—ह्या स्वप्नाचा काय उलगडा असेल तो असो. (सुसकारा टाकून जोशिबावांकडे पाहातात) कां! तुह्मीही उदास दिसतां. काय आहे तरी काय जोशिबावा!

**जोशिबावा.**—सरकार, पायांजवळ सादर करण्यास परमदुःख वाटतें. कालच पत्रिका पाहिली. ग्रह फार अनिष्ट आले आहेत. महाराजांची धनरास. तेव्हां (बोटें घालतात,) शनि द्वितीयस्थानीं येतो. साडेसातीचा शेवटला चरण अनिष्ट जातो, कांहीं पीडा करणार, बरें आतां गुरु कितवा, (वर पाहातो व ओंठ चावतो) दहावा, हो, बराच आहे, चंद्रही बराच आहे, राहु अंमळ अनिष्ट आहे, पण असो, चिंता नाहीं. सरकार, परमेश्वर कृपा करील. एवढे दोनतीन महिनेच कायते, मग पण पुढें ग्रह काय उत्तम आले आहेत! एवढीं गृहशांत्यर्थ अनुष्ठानें व दानें करण्यास मात्र आज्ञा व्हावी.

महाराज.—देवा ! काय संकटें येतील तीं पाहावीं. आमचें प्रालब्ध ! गुरुजी.

गुरुजी.— महाराजांचे मनांत ह्याविषयीं अस्वस्थता नसावी. सर्वारिष्टशमनार्थ शास्त्रोक्त जपजाप्य, अनुष्ठानें, अभिषेक, चंडिकापाठ वगैरे सर्व यथाविधि करवितों.

महाराज.—दिवाणजी, हें ऐका.

नानासाहेब.—सरकार, सर्व कांहीं तयारी ठेवितों; काळजी करणें नको.

महाराज.—पहा बोवा, मला सर्व कायते तुह्मीच आहांत. सर्व भरंवसा तुमचेवर आहे.

( सर्व जाऊं लागतात. )

हरिबा.—( एकीकडे ) पंत, ह्यो पायलाना भित्रा सोभाव; लयि भित्र सरकार.

दामोदरपंत.—तशामध्यें गुरुजीसारखी तोंडपुजी मंडळी मिळाली ह्मणजे मग काय!

हरिबा.—ही राव बामन लयि लबाड, सरकारचा पडला भ्वाळा सत्राव, घेत्याती झाल लाट साधुनशेनि, आमच ब्वालन लागत यिखासारख. पंत पाह्यलतना त्ये मंगाच ब्वालन.

दामोदरपंत.—तें कांहीं पुसूं नका बोवा. आतांशीं कांहीं वेटा प्रकारच वेगळा झाला आहे. आमचेवर सुद्धां आतांशी थोडीशी खप्पा मरजी झाली आहे. अहो, आह्माला तें देवांसारिखें व मामांसारखें बोलतां येत नाहीं. स्वप्न तें काय, आणि त्याबद्दल येवढा बोभाटा तो काय, आह्माला अशीं शेंकडों स्वप्नें पडतात. असें सर्वांचे खरेंखोटें करीत बसणें पुरवतें काय?

हरिबा.—अतांशी समदे ग्वाड पन तुह्मी अन आह्मी मांतर कडू झालो हवो वगा.

दामोदरपंत.—असो, कांहीं असो, पाहून घेऊं; अहो, कडूचे गोड होण्यास काय उशीर ? ही विद्या आह्मास शिकविणें नको.

( सर्व जातात. )

---

## अंक १.

### प्रवेश २.

स्थल रंगमहाल.

### पात्रें.

(मल्हारराव महाराज, लक्ष्मी बाईसाहेब व दासी.)

लक्ष्मीबाई.—गजाऊ, आज बाई मला कससच होतें आहे.

गजाऊ.—( हंसून ) अव से अस व्हाह्यचच् बाईसात्र.

लक्ष्मीबाई.— कां बरें, तुझ कांहीं तरी मेलें अपलें असतेंच, केव्हांही पहा.

गजाऊ.— सरकार, ही वटीक कव्हांत्रि खोट न्हायि बोलणार. आताशी काय उठता, बसता, खाता, पिता, अक्षि ह्माराजांची मुरत डोळ्यापुढ, जरा जवळ नसल कीं आपल झाल कससच, म्हाराज जणु का गळ्यामधल तायितच.

लक्ष्मीबाई.— पुरेग मेल तुझ, तससच आहे हो, मी मागल्या जन्मीं देवच तसा पुजला होता. पण गडे,

आतां कोठें वरें स्वारी असेल. मला बाई वाटतें नेहेमीं कसें मजजवळच असावें.

**गजाऊ.**—पुरे पुरे बाईसाब. तुमाला वाटूनश्येनी काय, म्हाराज अतां असत्याल कुठ त्या दामोदरपंताजवळ ग्वाष्टी सांगत; न्हायि तर बसल असत्याल गचीवरिचीवर तान्ही वयाला जवळ घेऊनशानि.

**लक्ष्मीबाई.**—अग ते पहिले दिवस विसर आतां. आतां नाहींहो तसें कांहीं. अगदीं शप्पत वाहून घेणें झालें आहे.

**गजाऊ.**—इडापिडा टळो, अन् आपला ज्वाडा सुखी नांदो. आमच तरी ह्येच मागण हाय्, देवाचान्.

**लक्ष्मीबाई.**—( दरवाज्याकडे पहाते ) अग बाई, इतक्यांत यायचें झालें वाटतें, ( लगबगीनें उठून ) मी मेलीनें कसा तो देण्यास अजून विडा देखील करून ठेविला नाहीं. उगीच ह्या मेलीच्या तोंडीं लागलें.

( महाराज येतात व सोन्याचे छप्परपलंगावर बसतात, लक्ष्मीबाई एकीकडे उभ्या राहतात.)

**महाराज.**—(सुसकारा टाकून ) या, बसा, अशा एकीकडे उभ्या कां ?

**लक्ष्मीबाई.**—( लाजून ) बरी आहें, येथेंच बरी दिसतें.

**महाराज.**—( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) पण असें कां ? आमचे ह्मणण्याला ह्मणजे कांहींच किंमत नाहीं का, सर्वच तसें, मग हें तरी कां असें नसावें ! नका बोवा येऊं, नशीब आमचें; त्यास तुमचा तरी काय इलाज.

**लक्ष्मीबाई.**—( जवळ पर्यंकावर येऊन बसते ) अतां तर

झालेंना पण. अम्मळ सुद्धां दूर होतां कामास नये. पण आज हें काय. काय हे सुसकारे. आजची कांहीं तऱ्हाच निराळी आहे (गळयास मिठी मारून तोंडाकडे पहाते) पण आज तोंड कां उतरलें आहे बरें. काय बरें ह्याचें कारण, मज दासीकडून कां कांहीं अपराध झाला आहे?

**महाराज.**— अग, तुझ्याकडे काय आहे, आमचेंच नशीब खोटें.

**लक्ष्मीबाई.**—पण असें झालें तरी काय? देवाच्या दयेनें आपणांस कमी का कांहीं आहे? जें मनांत आलें तें तयार. ताटावरचें पाटावर व पाटावरचें ताटावर असें होत आहे. कोणचें ह्मणून कमी नाहीं. काय तें सांगितल्याशिवाय मी नाहींजा गडे बोलणार.

**महाराज.**—पण आज तें जास्ती काय झालें आहे? नेहमीं यायचा तसा आलों, तुला जवळ बोलाविली, कमजास्त तर कांहीं नाहीं बोवा. मग तुला काय वाटत असेल तें असो, बायकांचा स्वभावच असा. त्यांच्या मनांत नेहेमी आपलें कांहीं तरी असायचेंच.

**लक्ष्मीबाई.**—किती मेलें ओढून ताणून आणावें. पोराला जशा गोष्टी सांगायच्या. सांगायचें असलें तर एकदाचें सांगावें. पहिल्यानें ह्मणायच "आमचें नशीब" आणि विचारलें, ह्मणजे चोरून ठेवायचें.

**महाराज.**—अग, कांहीं नाहींहो, उगीच तें आपलें.

**लक्ष्मीबाई.**—मग आतां नाहींच का सांगावयाचें, मजजवळ नाहीं तर मग दुसरें कोणाजवळ? गोडगोड गोष्टी तेवढ्या आयकून घ्याव्या. तूं माझी अशी,

राज्य संग्रहालय

माझी तूं तशी. आह्मी नाहींच का कोणी? पण राज्याच्या अरध्या धनीनी आहांत ह्मटलें.

**महाराज.**—आज काय हें डोक्यांत वेड शिरलें आहे कोण जाणे!

**लक्ष्मीबाई.**—पुरे मेलं नाहीं तर नाहीं, इतकें तें कशाला ओढून चंद्रबळ पाहिजे? पण अतां शेवटीं नाहींच-ना सांगावयाचें. मी नाहीं जा—(रुसून एकी-कडे बसते).

**महाराज.**—जेव्हां पहावें तेव्हां आपला नाकावर राग खंडीभर; पुरे, पुरे, या आतां हिकडे.

**लक्ष्मीबाई.**—(जवळ येते) पण हें अर्धीच झालें असतें तर? पण नाहीं. एखाद्याला रुसविण्याची आपली चालच पडून गेली आहे.

**महाराज.**—त्यांत तें काय सांगावयाचें (जवळ घेऊन) काल रात्रीं कांहीं दुष्ट स्वप्नें पडल्यामुळें व दुसरे कांहीं थोडेसे अपशकुन झाल्यामुळें मन उदास झालें आहे. जेव्हां जेव्हां ते विचार मनांत येतात तेव्हां वाईट वाटतें. दुसरें कांहीं नाहीं.

**लक्ष्मीबाई.**—पण मग त्याचें तें इतकें कशाला वाईट वाटायला पाहिजे? गुरुजींस सांगून कांहीं अनुष्ठानें करवावीं. कांहीं रोज धर्मादाय जास्ती वाढवावा, जप करवावे ह्मणजे झालें. देव रक्षण करणार समर्थ आहे. आपण काय कोणाचा घातपात केला आहे? मी ह्मटलें काय आहे कोण जाणे.

**महाराज.**—वाः शाबास, एकूण देवानें माणसें द्यावीं तर अशींच द्यावीं. कितीगे गोड तुझे हे विचार.

(मुलाचे पाळण्याकडे पाहून) पण आज हे राजेश्री फारसे निजले आहेत ? (हंसून) जशा आपण झोपाळू तसे पुढें चिरंजीव.

लक्ष्मीबाई.—हो, असो अपला माझा झोंपाळू, त्यानें पुरती झोंप देखील घेऊं नये वाटतें.

(इतक्यांत पाळण्यांत मुलगा उठतो व पाळण्यावर बांधलेल्या खेळाकडे पाहून हंसतो व आपल्या बालभाषेंत बडबड करितो).

महाराज.—अरे ! उठली स्वारी वाटतें.

लक्ष्मीबाई.—(पाळण्याजवळ जाऊन) झालें एकदाचें ? हा पहा उठला. (पाळण्यांतच मुलाचे मुके घेते) उठलिका माझी च्छकुली. निज निज बाई, मी तुला थोपटतें. गाणें ह्मणूं माझ्या सख्याला ? नीज बाबी (झोका देते व ओंव्या ह्मणते.)

हाडरे कुतऱ्या, शुकरे मांजरा ।
माझ्या बाळाच्या काजळा, दृष्ट आली ।
अंगाई निज्रा.—
जसें यशोदेच्या कृष्णें, राज्य केलें द्वारकेचें ।
तसा माझा तान्हा बाळ, राज्य करो गुजराथेचें ।

अग बाई, नाहीं हा निजत. पहा कशी चळवळ लावली आहे ती. अरे, हा तर रडूं लागला; उगी बाई (पाळण्यांतून काढून घेते व खांद्यावर घेऊन थोपटते) आतां पहा कसा उगीच राहिला तो. जसें कोणी ह्मणेल समजतेंच आहे ह्याला.

महाराज.—आणा त्याला हिकडे, आणा नातका पण. पहा बरें काय मजा आहे ती. एवढ्याशा मुलास आई

देखील समजते. ( हात पुढें करून ) ये बाळा.

**लक्ष्मीबाई.**—पहा कसा हंसतो आहे तो, व येण्याकरितां चळवळ करितो आहे. (मुका घेते.) कितीरे तुझी चळवळ ही ! जा तिकडे ( महाराजांजवळ देतात.)

**महाराज.**—( मांडीवर घेऊन मुके घेतात ) किती गोडरे हे तुझे मुके लागतात!

**मुलगा.**—(हंसतो ) बा,—बा,—बा,—आ—

**महाराज.**—(हर्षानें) काय ह्मणताहेत हे राजेश्री (हंसतात व मुलास पोटाशीं धरितात.) काय हे ह्मणताहेत?

**लक्ष्मीबाई.**—( हंसते ) दुसरें काय. ( लाजते )

**महाराज.**—अहाहा ! काय हें सुख ! कोण हा आनंद! पुत्रसुख तें पुत्रसुख. तें कांहीं निराळेंच आहे. परमेश्वरानें कृपाळू होऊन एकदांचें गाऱ्हाणें ऐकिलें. आतां मला काळजी नाहीं. एकदां हें पुत्ररत्न राज्यावर बसलेलें पाहिलें ह्मणजे—

**लक्ष्मीबाई.**—कुणी पाहिलें आहे. सोन्याचीं दारें होतील त्यांवर डोकीं हपटतील. जातो दिवस तो सुखाचा. देव समर्थ आहे, करता करविता तोच आहे. बाळा बसशीलले तूं लाज्यावल ( मुलगा रडूं लागतो )

**महाराज.**— कां इतक्यांत काय बिघडलें. उगा ( पाठ थोपटतात ) अरे, नाहीं हा उगा रहात. जा बोवा एकदांचा. ( लक्ष्मीबाईजवळ देतात ) भूक लागली असेल त्याला.

**लक्ष्मीबाई.**— हो, भुकेला लागलें वेड, इतक्यांत कसली भूक.

महाराज.— गेलें लागलीच रडूं. बरें तर येतों आतां आम्हीं.

लक्ष्मीबाई.— ( खालीं पहाते ) इतक्यांतच? ( मुलास दासीजवळ देते. )

महाराज.— हो, तें खरेंच, तुह्माला काय होतें; सगळा वेळ येथेंच बसलों तरीं तुह्माला हवाच.

लक्ष्मीबाई.— पण मी काय ह्मणतें आहें?

महाराज.— बरें तर. आतां, जातांना येकदां ( गालास हात लावितात. )

लक्ष्मीबाई.— मला नाहीं मेलं ठाऊक. वेडच लागेल. हें काय पण?

(हास्यमुख निघून जातात.)

---

## अंक १.

### प्रवेश ३.

स्थळ

## राजवाडा, कचेरी.

पात्रें.

(नानासाहेब खानविलकर, हरीबादादा, दामोदरपंत.)

नानासाहेब.— कां हरिबा, आतां महालांचा मक्ता देण्याचे दिवस जवळ आले आहेत. काल दोनचार अर्ज्या येऊन पडल्या आहेत. आतां पहावें कसें होतें तें.

...ली ग्रंथ संग्रहालय.

**हरिबादादा.**— पाह्याच काय मर्क, पन्नास हजाराच तोंड लावाकि सुकडीच. चालतया थर्तिवर, तर घ्यावी तुंबडी भरून, मोहोरच मोहोर बगायला यईल.

**दामोदरपंत.**— हो, खरेंच दिवाण साहेब. दिवस मोठे कठीण येत चालले आहेत. आतां उद्यां काय होईल ह्याचा नेम नाहीं. 'हातपरकि तेरी, तवेपरकि मेरी' असें करण्याची वेळ आहे.

**नानासाहेब.**— पण आतांशी सरकारची वृत्ति पालटत चालली आहे. हे नवे आले आहेत कीं नाहीं, हे आमचे अन्नांत विष कालविण्यास आले आहेत.

**हरिबादादा.**— आव्ह तर म्हनूनच गागतो कि मी. मारावा हात कि लांबवाव्या थैल्या गावाकड. ह्या बडोद्यांत कायिचि ठयेवन्याचा विलाज नायि बगा.

**दामोदरपंत.**— खरें बोलले दादासाहेब.

**हरिबादादा.**— ह्यो बामन लयि चपू बगा. द्ये बामनांस नी दक्शिना कि उपट अरधा पैसा, अन् मांड खरच. कर माल खरेदि, द्ये तमासगिरांची नेमणुक, लांबव अरधा पैसा. पक्का ह्यो दामोदर पंत. दोकडूनबी लाट मारतो बगा. समद करूनशेनी पुना सरकारचा जिवपरान जणुका. लइ भरोशाच पंत तुमी.

**दामोदरपंत.**— हो तर आणखी काय, आमचें असें आहे कीं कोणचें करणें तें मोठें बेतानें झालें पाहिजे. पण हें सर्व आपल्या जिवावर ना?

**नानासाहेब.**— ह्या पहिल्या कमीशनानें आपणांस बरें लौकर जागें केलें, कधीं आपणांवर प्रसंग गुदरेल

ह्याचा नेम नाहीं. आतां तें नजरबागेचें काम चाललें आहे, तेंही एक बरेंच आहे, नाहीं बरें?

**दामोदरपंत.**— हो खरेंच, ती एक जागा आहे. आजपर्यंत ५,६ लक्ष रुपये झाले, व आणखी तितकेच होतील. पांच काय आणि दहा काय? कोणीकडून तरी काम महाराजांस पसंत झालें ह्मणजे झालें. कोण बसला आहे किती खर्च झाला याचा विचार करीत. सरकार समर्थ आहेत.

**हरिबादादा.**— काव्ह खानगीवाल, त्ये मग परवाच काम झाल कां न्हायि. तेवढ तें द्याकीं लागी लाऊन. आल हाये पाखरू इतक दूर, व्हईल बिचारीच काम. झालाबिला चवथा वाडा तर मग आपनाला बि करील खुस. अर्थानबि कामानबि. पण पंत अक्षि पाखरूपन पाखरू बगा. काय त्यो बांधा, काय त्यो इवाक, अक्षि मुरकतच बगा.

**दामोदरपंत.**— नाहींहो तें जमत. महाराजांची काय आतांशीं साधुवृत्ति झाली आहे. अशा प्रकारची मी गोष्ट काढिली कीं आपली शिव्यांची लाखोली. अलीकडे भितराही स्वभाव फार झाला आहे. आणि आह्मीं सर्व आतांशी सरकाराला पाण्यांत दिसूं लागलों आहोंत.

**नानासाहेब.**— नशीव आमचें, काय करावें!!

**हरिबादादा.**— काय राव तुह्मींबि अस ह्मंगता. अव जर सरकार आपल्या हतामंदि न्हायित, तर व्यरथ आपल जिन. अव तुह्मीबि काय भिता. हरपरि-

यत्नान घेउं खुस मरजी करूनशेनी, की आली बगा सरकार सोरी.

**मल्हारराव महाराज, गोविंदराव ... व खुषमस्करे मंडळी वगैरे येतात.**

( सर्व उभे रहातात. ).

**महाराज.**— बसा बसा. उभे कां ( सर्व बसतात ) कां दिवाणजी, आतां महाल मक्तयानें देण्याचे दिवस जवळ आले. कोणांकडून अर्जबिर्ज आलेका कांहीं?

**नानासाहेब.**— हो सरकार, आले आहेत. त्या पेटलाद महालाबद्दल अर्ज आला आहे; पण सरकार जमत नाहीं. पैसे फारच थोडे देतात.

**खुषमस्कऱ्या.** —हो बरोबरच आहे. अजून सुकडीचा बेत बराबर जमला नसेल.

**महाराज.**— उगीच बैसरे तूं. मध्येंच काय तोंड घालावें?

**खुषमस्कऱ्या.** —महाराज, अपराधाची माफी असावी. खोटें असेल तर माझ्या दोन तोंडांत द्याव्या. मला दिवाणजी सारखे व दामोदरपंतही सारखे. सरकारचे पायांजवळ खरें बोलण्यास काय? ह्यानीं महाल मक्तयानें घेणारांपासून हवे तितके रुपये उपटून आपल्या तुंबड्या भराव्या. मक्तेदारांनीं रुपयांची भरती करण्यास, गरीब बिचारे रयतेस हवें तसें नाडावें, तिजवर हवे तसे जुलूम करावे, तिची बिचारीची कोण दाद घेणार? गरीबाची मात्र खराबी. इथून तितका असा प्रकार आहे. ओढतात झाले खोऱ्यांनीं पैसे. ती पर्वाची नक्कल असेलच ध्यानांत सरकारच्या.

**महाराज.**— कां दिवाणजी, हे काय ह्मणतात? पहा बोवा, आपण सर्व तर माझ्या राज्याचे मुख्य स्तंभ आहां; आणि आपणाविषयींच असा बोभाटा. आबरू गेल्यावर मग पैसे काय बांधून न्यावयाचे आहेत? रयतेनें आपणांस दुवा द्यावा, हेंच आपले पैसे. खरेंकि नाहीं मामा, मी आपला एकांतांत बोलतों आहें हो.

**मामा**— (हात जोडून) जी सरकार, रास्त गोष्ट आहे. सरकारचे बोलण्यास कोण दोष देणार.

**नानासाहेब.**— तर मग आतां आमचेवर भरंवसा काडीचा नाहीं एकूण, हे खुषमस्करे मात्र खरे, आणि आह्मी प्रत्यक्ष आपले असून—

**सरकार.**— तसें नाहींहो दिवाणजी. तुह्मी तर आमचे राज्यांतील नाना फडणवीस अहांत, पण उगीच आपलें सांगीतलें.

**खुषमस्कऱ्या.**— खरें खरें तें. फडनिसांस वेतन काय, तर २५ रूपड्या, पण लक्ष्मी घरीं पाणी भरीत होतीना? मराठी राज्याची आपली रीतच ही. लुटावें आपले रयतेस हवें तसें. कोणी विचारता ना पुसता.

**महाराज**— (हंसून) अरे पण तुझ्या कां डोळ्यांत खुपतें. तें कसेंही असेना.

**नानासाहेब**— पहा महाराज मध्यें कसें तोंड घालतो आहे तो.

**महाराज**— बरें, तें असो, कोणीकडून तरी माझे नांवास काळिमा न लागावी. मी आपला आहें भोळा.

**खुषमस्कऱ्या.**—फारच भोळे सरकार. पण काडीनाकाडी सर्व माहित आहे ह्मणून बरें. (हंसून) पण अम्मळ भितरा स्वभाव तर खराच, नाहींतर गनबा?

(इतक्यांत एक भिक्षुक येतो.)

**गोविंदभट**– (लगबगीनें जामदारखान्याजवळ येऊन) महाराज, गरीबाचा एक अर्ज आहे; सरकार, आमची भिक्षुकांची दाद घेऊन–

**दामोदरपंत**.– कोण आहेरे तेथें, पहारेकरी. ह्या भटजींस ह्या वेळेस जा ह्मणून सांग. सरकार कामांत गुंतले आहेत. अर्ज ऐकण्यास वेळ नाहीं.

**पहारेकरी**.– चला बामनबुवा आतां जा. मगशानी सरकार, उद्यां नाहीं तर कवाबि या.

**गोविंदभट**.– (हात जोडून) गरीबांची दाद सरकाराशिवाय दुसरी कोण घेणार? महाराज दोनच शब्द ऐकून,–

**महाराज**.– काय गडबड आहेरे? या भटजी, बोला तुमचें काय असेल तें लवकर.

**गोविंदभट**.– महाराज, बोलणें ह्मणून हेंच कीं, मी गरीब ब्राह्मण आहें. वाईचा रहाणार. दशग्रंथी आहें. घरीं प्रपंच मोठा आहे. द्वितीय संबंध आहे. बडोदें स्वधर्माचें स्थान, ह्मणून इतका लांब धांवत आलों. ह्या दामोदर पंताचे पाठीमागें, सरकारांचे नित्य दानांतून एखादें मिळावें, ह्मणून आज फार दिवस लागलों आहें. पण गरीबाची दाद घेतो कोण, शिफारशीचे ब्राह्मण संपतील तेव्हां मग पुढें दुसरा विचार. तर तसा दिवस आणण्यास सरकार समर्थ.–

**दामोदरपंत**.–चलाहो येथून भटजी, लाविली आहे उगीच पिर पिर. असे ब्राह्मण पुष्कळ पाहिले आहेत.

आले आहेत मोठे दशग्रंथीपणाचा बाणा मिरवीत ( आपल्याशींच ) आंधळ्यापुढें दिवा.

**गोविंदभट.**— सरकार. एक— एक— शब्द—

**महाराज.**— उगीच बसाहो पंत. भटजीबावा, बोला काय तें.

**गोविंदभट.**— परमेश्वर महाराजांचें कल्याण करो. मी काल दामोदरपंतांचा पिच्छा घेतला, तेव्हां मला पहिल्यानें ह्मणतो कीं भटजी, नित्य दान मिळेल; पण हा बडोद्यांतील धारा ठाऊक आहेना? अर्धा भाग आमचा. त्या त्रिविक्रम भटजींस विचारा पाहिजे तर. मी ह्मटलें, असो अर्धं तरी मिळो. पण मग मला दुष्ट ह्मणतो काय, कीं सहकुटुंब या ह्मणजे तुमची दंपत्यपूजा करूं. मला कां ह्यानें असें ह्मणावें? सरकारचे मर्जीतला झाला ह्मणून काय झालें. ( सर्वांगास रागानें कंप सुटतो ) मी केवढा, हा केवढा. मी ह्याच्या बापाचा बाप शोभेन. परमेश्वर ह्याचें कधीं बरें करणार नाहीं. सरकार मला आतां याच्या हातून वांचविणार समर्थ आहेत.

**सरकार.**— भटजी, असे संतापूं नका. आह्मीं त्यांस तुह्मांस नित्य दान पोहोंचविण्यास सांगतों. तुमच्या एका केसासही धक्का नाहीं.

**गोविंदभट.**— परमेश्वर महाराजांचें कल्याण करो, अखंड ऐश्वर्य देवो, व असे दुष्ट लोक पदरीं ठेविण्याची कधींही बुद्धि न देवो!

**सरकार.**— काय खानगीवाल्यांची ही कीर्ति. पंत असे

बेफाम होऊं नका; ह्या तुमच्या कागाळ्या आह्मा-
कडे येणें चांगलें नव्हे.

**दामोदरपंत.**—नशीब आमचें सरकार. ह्या भटजींची दक्ष-
णा पावती झाली आहे. जमाखर्च आहेत, पाहावे
पाहिजे तर. आमचेवरील भरंवसा अगदीं उडाला.
काय चमत्कार !

**सरकार.**—तें जमाखर्च मी सर्व जाणून आहें. तो प्र-
कार सर्व यथास्थितच असेल, संशय नाहीं; पण
असो, आतां त्याचें काय, सर्व आहे तें ठीकच
आहे. जसा काळ तशीं माणसें.

**मामा.**—जमाखर्चाचे कामांत पंत हुशार तर खरेच. क-
धीं खोटें लिहिणार नाहींत. लबाडी ब्राह्मणाचीच
नसेल ह्मणून कशावरून ? कोणी तरी त्याला
शिकवून पाठविला असेल.

**सरकार.**—एकूण ब्राह्मण खोटें बोलतो. दक्षिणा घेऊन
सवरून ! धर्माचे कामांत आपली अनुकूलता
किती आहे हें ठाऊकच आहे. धर्माचें नांव का-
ढिलें कीं आपल्या कपाळास आठ्या चढल्याच.

**मामा.**—नशीब आमचें ! आमची पूजा कधींही चुकणेंच
नाहीं. महाराजांनीं सर्व खजीन्यावर उदक सो-
डिलें तर त्यांत आमचें काय गेलें. सरकार सम-
र्थ आहेत, पण आह्मांस जें वाटतें तें सांगतों.

( दामोदरपंत जातात )

**वृषमस्कन्या.**—खरेंच महाराज, दामोदरपंताची वृत्तीच
तशी झाली आहे. फारच कहर उडवून दिला
आहे. उगीच तो कोठें भाऊ होता डोळे उघड-

ण्यास, तोही बिचारा गेला. होता तेव्हां तरी कोठें त्याचें ऐकत होता ? आपला पंतांस पूर्ण पाठंबा मग काय. असे कोठें भिक्षुकांच्या पोरांच्या हातून कारभार चोलले आहेत! अजून सरकारचे डोळे उघडतील. पूर्ण कोठें उघडले आहेत ? आमचें बोलणें कडू लागेल पण प्रसंगीं खचीत उपयोगीं पडेल. असे हे विचार आह्मीं सांगावे असें नाहीं. खरें, पण काय करावें, कधीं कधीं असेही उद्गार काढावे लागतात. आपलें अन्न फार दिवस खाल्लें आहे.

**सरकार.**—कायरे तूं पचकळासारखा बोलतोस ? माझा दामू असा नाहींरे ! अविचारी तर खरा, पण जिवास जीव देणारा ह्यांत संशय नाहीं. त्याचे विचार तरी किती एखादे वेळेस शहाणपणाचे असतात ? हुशार, भारी हुशार.

**खुषमस्कऱ्या.**—हां सरकार, चुकी माफ असावी. खरें, तसेच ते आहेत आपल्या कामांत; वहादूर तर खरेच; पण—

---

**महाराज.**—चल चल, पुरे तुझें. (त्याला गुद्दा देतात)

**खुषमस्कऱ्या.**— गुलाबराव, सरकारचे हात किती नरम आहेत तें तुह्माला येक गुद्दा देतील तेव्हां समजेल. फारच नरम. माझ्या बरगड्यांस विचारावें.

# अंक १.

## प्रवेश १.

मराठी ग्रंथ संग्रह ठाणे.

—दामोदरपंताचें घर.

दामोदरपंत व त्यांची स्त्री.

**दामोदरपंताची स्त्री.**—आंतांशी मेलें किती वेळ तरी बाहेर असावयाचें कोणजाणे. मेली माणसानें वाट ह्मणून कोठपर्यंत पहावी. रोज आपलें येण्यास रात्रीचे अकरा बारा. त्या अन्नाच्या देखील गारगोाव्या होऊन जातात. तशी आधीं सुचना असली, ह्मणजे माणसांस कोणच्याही गोष्टीची तजवीज ठेवितां येते.

**दामोदरपंत.**— काय करावें, आह्मी पडलों ताबेदार. सर्व काम आटोपल्याशिवाय तर यायचें नाहींना? बायकांनां काय होतें, त्यानां वाटतें कीं, सर्वकाळ आपले यजमान आपले जवळ असावे; पण तसें होतें कसें? पुरुषांचें पुरुषांसच ठाऊक.

**स्त्री.**—ठाऊक आहे काम. काम झालें ह्मणून काय झालें? सगळा दिवस नसतोका काम करायला? तेव्हां कुठें बायका येत असतात विचारायला? ज्याचें घरांत लक्ष असतें, त्याला दिवसास पाहिजे तितकें काम करतां येतें. मेला बायकांचा जन्मच खोटा.

**दामोदरपंत.**—आपलें नेहेमीं टोंचून बोलण्याची सवयच ना. हं, मारा आमच्या नांवानें हव्या तितक्या

हाका. सर्वच मारतात मग तुह्मी तरी कां नाहीं मारणार. मजवर सर्वच कसें फिरलें पहा !

स्त्री.—बाई बाई बाई. त्याचें इतकें तें कशाला वाईट वाटावयाला पाहिजे. मी आपली सहज बोललें. कोणी मेले नांवें ठेवित असतील, त्यांचें आपल्याला काय ? ज्या मेल्यांच्या डोळ्यांत खुपत असेल ते ठेवतील नांवें.

दामोदरपंत.—वाः हें बोवा चांगलें ! शिव्या द्यायच्या अन् ह्मणायचें मी सहज बोललें.

स्त्री.—काय वाटलें असेल तें असो, मी तर आपली भावार्थानें बोललें. पण अजून भूक नाहींका लागली? एक्या सकाळचें जेवण झालें होतें.

दामोदरपंत.—आज नाहीं बोवा भूक आपणास. पोटांत ज्याड्य आहे. आज तो तेथें जेवावयास गेलों, तेथें आग्रह फार झाला.

स्त्री.—माणसास कसें बरें हें समजावें. कोण आहेरे तिकडे. हरी ? अरे हरी ? खालीं जाऊन सांग, आज भूक नाहीं ह्मणून; द्या तुह्मी आपलें आटोपून.

स्त्री.—कांहीं थोडें, थोडासा फराळ तरी. रात्रीं तसें निजूं नये. उपाशि पोटीं झोंप येइलका पण ?

दामोदरपंत.—आज कांहीं नको. देत असलां, तर त्या परवां आलेल्या थोड्या श्रीखंडाच्या वड्या द्या ह्मणजे झालें.

स्त्री.—हो, मला असें वाटलेंच ( रुप्याच्या वाटींत वड्या आणून देते ) हो, खर गडे, बरी आठवण झाली, परवां ते सरकारी शालू वांटले कीं नाहीं, त्यांपैकीं

एक आहे ती माझी मैत्रीण अनपुरणा बाई ह्मणून, तिला द्यायचा होता. बिचारी गरीब आहे. द्यावा एक तिला. का मीं आपला जुना देऊं ?

**दामोदरपंत.**—झाले, आतां ते सर्व संपले. मला आधीं आठवण केली असती, तर एक काढून ठेवला असता. (मनांत) आतां आपणही थोडासा विनोद करावा. फार विनोदाच्या गोष्टी ही सांगते. (मोठ्यानें) कोण, कोण ही ह्मटलीस ?

**स्त्री.**—त्याचें काय, आहे मेली कोणी जवरी मसणी. द्यायचा असेल तर हो ह्मणावें. एखादा तरी राहिला असेल. मजजवळ द्यावा ह्मणजे मी तिला पोंचता करीन.

**दामोदरपंत.**—कां तें, आणि तिला राजवाड्यांत येऊन घेऊन जाण्यास काय होतें ? एवढें चोरून लपवून कशाला ?

**स्त्री.**—नाहीं नाहीं ती येणार. तिची बिचारीची कोठली बायांकडे ओळख ? तिला कांहीं लाजलज्जा आहे कीं नाहीं ? ओळखीशिवाय ती कशी जाईल बाई राजवाड्यांत. गरीब बिचारी ! फार साधी ! फार सुशील आहे ती बायको !

**दामोदरपंत.**—हो हो, पुरे; नको एवढी वढाई तिची. आह्माला नाहीं द्यावयाचा जा; आणि तुह्मीही देऊं नका मला विचारल्यावांचून.

**स्त्री.**—(रागानें) मग एवढे आढे वेढे ते कशाला ? नाहीं ह्मणून मोकळें व्हावें. तिचें भारीच दरिद्र

जाणार आहे आपल्या शालूनें. पण बाई अताशीं पहातें तें भारीच कांहीं.

**दामोदरपंत.**—कां कां, फारसें तोंड सुटलें आहे. मला नाहीं आवडत हें नाकापेक्षां मोती जड. चला व्हा आपल्या कशा माहेरीं चालत्या. मोठ्या आल्या आहेत ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी मला सांगायाला.

**स्त्री.**— हो, आपलें तेवढें ह्मटलें ह्मणजे झालें. (डोळ्यांतून पाणी काढते ) देवा, नकोरे हा बायकांचा जन्म. माझें मेलें कुठून तोंड वडवडलें कोण जाणे.

**दामोदरपंत.**—( हंसून ) मी गंगायमुनांचीच वाट पाहत होतों. बायकांचें कायतें हेंच हत्यार. डोळ्यांत पाणी कसें आपलें हुकमी ना? जसा आपला मघांचा विनोद तसाच हा माझा. समजलांत. अरे, काय हें, अधिक अधिकच रडणें! या अशा हिकडे. ( जवळ घेतो व तोंडावरून हात फिरवितो.)

**स्त्री.**— कोठला मेला हा जीवघेण्याचा विनोद.

**दामोदरपंत.**—अहो, आह्मी तोंडानें बोललों ह्मणून हातानें तसें करूं कीं काय? अहो, एक काय पण शंभर शालू ओंवाळून टाकीन तुह्मांवरून. उद्यां तें काम, पहिल्यानें द्या कसा आपल्या मैत्रिणीला शालू एक. ( हंसून ) शालू उपटण्यास तिला पात्र तर उत्तम सांपडलें. अतां झालें एकदाचें ?

**स्त्री.**— हो झालें, नवलच मोठें; आपल्यासारख्यांला एका शालूची विशाद मोठी !

**दामोदरपंत.**—कांहीं करा, तुझें आपलें वर बोलणें आहेच; पण गेला कां राग ?

( इतक्यांत हरी येतो )

**हरी.**— ते नानाजी यशवंत व हरभटजी आले आहेत. बोलावितांहेत बाहेर आपणांस.

**दामोदरपंत.**— बरें येतों ह्मणून सांग. बसा ह्मणावें.

---

## अंक १.

### प्रवेश ९.

( दामोदरपंत, नानाजी विठ्ठल व हरभटजी. )

**दामोदरपंत.**—या नानाजी, आज हिकडे कोणीकडे रात्रीचेसे वाट चुकलां!

**नानाजी.**—जसे आह्मीं कधीं येतच नसतों वाटतें. फार दिवसांत भेट झाली नाहीं ह्मणून उगीच आपलें घटकाभर यावें ह्मटलें आपल्याकडे दोन हिकडच्या तिकडच्या गप्पा मारण्यास.

**दामोदरपंत.**—कसेंही असो, पण आलीकडे आमच्यावर थोडीशी आपली अवकृपा तर खरीच. ठीकच आहे जें आहे तें.

**नानाजी.**—माझी अवकृपा! वा, फार चांगलें, असें उलटें कसें होईल? मी तर असें ह्मणतों कीं आतां आपली आमचेवर मेहरबानगी असावी. आपण आतां पहिले पंत नाहींत. पण नशीबवान खरे आपण. आपणाजवळ जरीबुद्धीच तशी आहे.

**हरभटजी.**—खरें बोललां नानासाहेब. काय हुशारी रावसाहिबांची! वर्णन करावें तितकें थोडेंच. नाहीं

तर आह्मी भारवाहक. खांद्यावर शालजोड्या टाकून दक्षिणा उकळीत फिरण्याच्या मात्र कामाचे.

**दामोदरपंत.**— चढवा बोवा आह्माला हवें तसें हरबऱ्याच्या झाडावर.

**नानाजी**— अहो, विशेष काय सांगावें, ह्या जरीबुट्टीच्या योगानें स्वारी महाराजांच्या गळ्यांतील ताईतच बनून राहिली आहे. काय बेटा अतांशीं चमत्कार पहातों तों महाराजांचे तोंडांत आपलें उठतां बसतां, बोलतां चालतां, पंतांचें नांव! माझ्या दामूनें आज असें केलें, दामूनें अशी कामांत हुशारी दाखविली, दामू असा शहाणा आहे, असा जिवास जीव देणारा आहे, असें आपलें नेहेमीं ह्मणत असतात. कारभारांत असले तरीं दामोदरपंत जवळ पाहिजेत. फिरावयास सोन्याचे रथांत निघाले कीं चला दामोदरपंत. गच्चीवर गाणें ऐकत बसले तरीही तसेंच. (हंसून) काय ते बिचारे रंगमहालांत जात असतील तेव्हां मात्र आपण जवळ असतां कीं नाहीं कोण जाणे. हा सगळा विनोद आहेहो पण? मला तरी थोडीशी जरीबुट्टी द्याहो पंत, ह्मणजे मीं तसी अशी महाराजांची मरजी सुप्रसन्न करून घेईन.

**दामोदरपंत.**— सगळा भ्रम आहेहो! पूर्वीं असें होतें खरें; पण आतां ते दिवस विसरा. सरकारचे वृत्तींत फार फेर पडत चालला आहे. मी जें आतांशीं कांहीं ह्मणतों, त्यास आपला त्यांचा नकार. कोण्या शहाण्यानें अकलकरा चारला असेल तो असो. आमचें रावणाचेंही राज्य सतत चाललें नाहीं.

**नानाजी.**— पण असें कालांतरींही होऊं नये. मग काय असेल तें असो.

**हरभटजी.**— आज पंतांनीं हा एक नवा बूट काढला आहे असें दिसतें. हें आपलें बोलणें महाराज आमचे कान ऐकत नाहींत व अशी गोष्ट कालत्रयीं घडणार नाहीं.

**दामोदरपंत.**— अहो, यांत काय तुम्हास विशेष वाटलें? हे आहेत कीं नाहीं जवळ नवे जुने, त्यांच्यानें हें पहावत नाहीं. सरकार लागलें अलीकडे त्यांचे चहाडचुचकेपणाकडे लक्ष्य देण्यास. पण मी वेळ येते तेव्हां महाराजांचे डोळे उघडण्यास कमी करीत नाहीं.

**नानाजी.**— अहो जाऊंद्याहो, ह्या अशांच्या चहाड्यांनीं काय होणार आहे? असे आजपर्यंत पुष्कळ आले व गेले, अत्तां देतां येईल त्यांस हुसकून. त्यांचे ते इंग्रजी कायदे इंग्रेजींतच. ही आहे गायकवाडी, येथें कांहीं चालणें नाहीं.

**दामोदरपंत.**—संकटें येऊं लागलीं, कीं एकामागून एक येतात. पक्की आमची साडेसाती. तो नवा साहेब आला आहे, त्यास तर मी शत्रूसारखा दिसतों. मीं त्याचें काय केलें आहे कोण जाणे? असे सर्व प्रकार असतांना आमचें अतां काय होणार आहे हें दिसतेंच आहे. आतां दिवाणगिरीची आशा व्यर्थ आहे. कालांतरींही मिळणें नाहीं.

**नानाजी.**—पण तो नवा दिवाण आला आहे, त्याचें आणि साहेबाचें जमत नाहीं अशी कुणकुण ऐकतों.

दामोदरपंत.—तें कसेंही असो, माझें नशीबच खोटें. इतके दिवस सर्व जमाव जमवीत आणला होता, पण सर्व व्यर्थ गेला. असो, काय चिंता आहे ? मी जातीचा रत्नागिऱ्या आहें. ब्राह्मणाचा बच्चा आहें. पाहून घेईन कसें होतें तें ? करूंद्या ह्यांनां हवीती गडबड.

नानाजी– सरकार फार धिमे आहेत, दयाळू आहेत, भोळे आहेत, हजारांचे पालनवाले आहेत, कसेंही झालें तरी आपण त्यांचे मर्जींतले अहांत. आपण सुज्ञ, विचारी व हुशार अहांत. बरें येतों तर आतां. यायचें आहेका कोठें बाहेर ?

दामोदरपंत.— नाहीं बोवा, आज थकलों आहें, निजतों आतां.

---

## अंक १.

### प्रवेश ६.

(मल्हारराव महाराज, नानासाहेब दिवाण, दामोदरपंत खानगीवाले.)

महाराज.—(दुःखानें) एकूण आपले राज्यांत असा प्रकार व्हावा ना ! कोण असा दुष्ट मनुष्य साहेबांचे जिवावर उठला असेल हो ! मला तर बोवा ही बाजारगप्प वाटते.

दामोदरपंत.—नाहीं सरकार. गांवांत भारी दाट वातमी आहे व कापांतून एकजण आला तोही असेंच सांगत होता.

**नानासाहेब.**—गांवांत ज्याच्या त्याच्या तोंडीं हेंच आहे; परंतु दरबारांत त्याजविषयीं अजूनपर्यंत साहेबां-कडून यादी आली नाहीं हा मोठा चमत्कार आहे.

**दामोदरपंत.**—पण साहेबानें सर्व सरवत घेतलें नाहीं, ही गोष्ट मोठी नशीबाची ह्मणावयाची; नाहीं तर मोठा अनर्थ झाला असता.

**महाराज.**— देव करो, आणि बिचारा सुखी असो. इतर गोष्टींत त्याचें आपलें कसेंही असो; पण प्रत्यक्ष त्याचे जिवावर जेव्हां बेतली, तेव्हां मोठा चमत्कार आहे. हर हर! फारच वाईट गोष्ट झाली. कसें झालें तरी तो आपला आहे. तरी पण असा इतका चांडाळ कोण बरें असावा ! खचीत आपले राज्यांतील कोणी नसेल, असें मला तर वाटतें. कोण करणार आहेहो असें ? ( रागानें ) ह्याउपर असा जर कोणी असेल तर, त्याचें डोकें उडवीन, धिंड काढीन. आज साहेबावर प्रसंग आला, उद्यां माझ्यावरही येईल. आतां उद्यां मी साहेबाकडे जाऊन त्याचा पूर्ण शोध लावितों. असें केलेंच पाहिजे. उद्यां चौकशी करवितों. दुष्टाचा शोध लावून त्याचें पारिपत्य करीन तरच मी नांवाचा मल्हारराव.

**दामोदरपंत.**— महाराज, आपले राज्यापैकीं खचीत हें कोणाचें काम नाहीं, ही पूर्ण खातरी असू द्यावी.

**महाराज.**— तें कसेंही असो, ह्याचा पत्ता पूर्ण लागलाच पाहिजे. कोण आहेरे तिकडे ? रामजी—

**जासूद.**— जी सरकार—

**महाराज.**— दादाभाई शेटजींस बोलावणें पाठवा. ह्मणावें वेळांत वेळ करून येऊन जा; जरूरीचें काम आहे.

**जासूद.**— आज्ञा सरकार. ( जातो )

**महाराज.**— ह्या गोष्टीचा पक्का शोध लागेपर्यंत कांहीं सुचणें नाहीं. मोठी काळजी लागली आहे. सर्व कामकाज तोंपर्यंत बंद ठेवा, काय वेटा चमत्कार!!

**नानासाहेब.**— हो तर महाराज, असें तर खरेंच. राज्यास काळिमा लागावयाची वेळ आली आहे. निर्णय होणें जरूर आहे.

( **दादाभाई शेट** येतात.)

**महाराज.**— आजची कापांतील बातमी दिवाणजींनीं ऐकिलीच असेल.

**दादाभाई.**— ऐकली खरी महाराज. मी कालपासून ऐकतों आहें; पण मला ती पहिल्यानें खरी वाटेना. परंतु आज जेव्हां फारच गवगवा झाला, तेव्हां मात्र माझी खातरी झाली. मी आतांच येण्यास निघालों होतों.

**महाराज.**— फार वाईट गोष्ट झाली ! पण शेटजी, असा कोणही इतका दुष्ट असेल ?

**दादाभाई.**— महाराज, येथें कांहीं तर्क चालत नाहीं. मला तरी कालपासून ह्या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटत आहे.

**महाराज.**— आतां तर मग पहिल्यानें असें करावें. दरबारांतून दुःखप्रदर्शनार्थ एक याद पाठवावी, व

सर्व प्रकारें चौकशीचे कामांत मदत करण्यास आम्हीं तयार आहोंत असें कळवावें.

**दादाभाई.**— फार योग्य. असेंच करावें, मी पाठवितों तर आतां तशी याद.

**महाराज.**— आपण उद्यां सकाळीं समक्ष भेटीस जाऊन खुलासा काढूं. फार फार वाईट गोष्ट झाली!

**दादाभाई.**— येतों तर मी आतां.—

( सर्व जातात. )

---

## अंक २.

### प्रवेश १.

### रेसिडेन्सी.

**कर्नल फेयूर साहेब.**

**फेयूर.**— ( फिरून येऊन ) अहाहा ! आज मी सकाळीं हवा खाऊन आलें, त्यानें मला किती बरें वाटत आहे. आतां हा माझा आजारीपणा, किती दिवस तरी माझे मागें लागला आहे ! आज काय डोक्यास गळूं झालें, उद्यां काय ताप आला. मला आज फार दिवसांत रात्रीची झोंप कशी ती ठाऊकच नाहीं. (आफिसांत जातात) बरें असो. आतां नित्यक्रमाप्रमाणें आपलें सरबत तर घेऊं ! पण हे लेकाचे शिपायी लोक आतांशीं सरबतही नीट करीत नाहींत. कां तीं डाळिंबें कुचकीं असतात, किंवा कडू असतात, कां वाशीं झालेलीं असतात,

कोण जाणें. सरबतास कशी ती ह्मणून रुचीच लागत नाहीं. बरें आज तर पहावें पिऊन, कसें लागतें तें. ( टेबलाजवळ जातात व सरबताचे एक दोन घोट घेतात. पुन्हां दुसरे टेबलाजवळ जाऊन एक पत्र लिहूं लागतात ) कां बरें पुन्हां हें माझें डोकें फिरूं लागलें. माझ्यानें हें पत्र पुरें करवेल असें वाटत नाहीं. अरे आहे तरी काय ! कोण ही सुस्ती! आज असें कां बरें होतें ! टेबलाजवळ जातात व राहिलेलें सरबत खिडकीबाहेर फेकून देतात. कां बरें सरबताविषयीं हेळसांड हे लुच्चे लोक करितात ! ह्यांचे बापाचें काय गेलें चांगलीं डाळिंबें आणण्यास ? बरें पण तापाविपाचेमुळें तर माझ्या तोंडाची रुची नाहींशी झाली नसेलना; तरी पण हें सरबत एक दिवसही गोड लागूं नये ! मोठा चमत्कार आहे! ( अकस्मात् गलासाकडे दृष्टि जाते आणि चकित होतात). अरे ! हें गलासांत तळाशीं काळें काळें काय बसलें आहे ! नाहीं, उगीच खिडकीवाटे रस्त्यांतील केर येऊन पडला असेल. पण असें ह्मणावें तर इतका केर कसा असेल ! नाहीं नाहीं; कांहीं तरी दुसरें असावें. ( डोळयाजवळ गलास नेऊन)पण ह्या काळ्या भुकींत चकचकतें हें काय बरें असावें ? कदाचित् हें विष तर नसेल ना! हो, तेंच, खचीत तेंच. कांहीं तरी दगा खचीत. पण काय ही कल्पना ! मलाहो विष कोण घालणार ! मग हा काय प्रकार असावा तर.

( विचार करून ) हं, झाली माझी खातरी. खचीत विषच हें. आज इतके दिवस मी सरबत वाईट वाईट ह्मणून हाका मारतों तें हें सूवर लोक मला विष घालितात! पण असें कसें असेल! इतके दिवस हे मला विष घालतात असें ह्मणावें, तर मी आजपर्यंत जगलों कसा? केव्हांच पार झालों असतों. बरें जर नाहीं ह्मणावें तर आलीकडे बरेच दिवस मी सकाळचें सरबत घेतलें कीं घेतलें, ह्मणजे माझी कांहीं चमत्कारिक स्थिति होते. याचें कारण काय असेल? असें होणें हा विषाचाच परिणाम नसेल ह्मणून कशावरून! असो, ह्या कामांत आपले विचार उपयोगाचे नाहींत. हा विषय डाक्टर साहेबांचा आहे. त्यांसच बोलावणें पाठवावें ह्मणजे ते या गोष्टीचा खुलासा करितील ( डाक्टरास पत्र लिहितात ) सीपाय् ( मोठ्यानें ) सीपाय्.

**शिपायी.**— जी साब. ( धांवत येतो )

**फेयूर.**— ये चिटी डाक्टरसाबके पास लेकर जाव. जल्दि, बोहोत जल्दि, दौरो.

**शिपायी.**— अच्छा साब ( घेऊन जातो )

**फेयूर.**— काय ही माझी अवस्था! तोंडांतून शब्द उमटत नाहीं. कोण ही सुस्ती! ( ईझी चेअरवर पडतो ) मरतों मी आतां, खचीत मरतों. कसची माझी मडम भेटते आतां मला! नाहीं भेटत. माझीं मुलें व ती आतां मला अंतरलीं. अरेरे! जळो तो पैसा, व जळो ती चाकरी. कोठें आमचा देश व कोठें आह्मी.

## अंक २.

### प्रवेश २.

क० फेयूर व डा० सीवर्ड.

डा० सीवर्ड.— गुडमार्नींग सर. आपली चिठ्ठी आली, आणि हा मी आलोंच.

फेयूर.— डाक्टर साहेब, माझी प्रकृति बिघडली आहे, हीस करावें तरी काय? आज तर फारच बिघडली आहे.

डा० सीवर्ड.—मी ती लौकर बरी करितों. आपण कांहीं काळजी करूं नका (नाडी पहातात व सर्व अंग तपासून पहातात.)

फेयूर.— डाक्टर साहेब, मला कांहीं आज आपणापाशीं थोडेंसें बोलावयाचें आहे. एक संशय आला आहे.

डा० सीवर्ड.— कोणता तो? तुह्मी घाबरून जाऊं नका. यांत घाबरण्यासारखें कांहींच नाहीं.

फेयूर.— कृपा करून तें टंबलर पहा बरें. त्यांत तें काळें काय दिसतें आहे. (हळूच) मला तर वाटतें. कांहीं तरी दगा आहे खचीत.

डा० सीवर्ड.— काय ह्मटलेंत आपण? (चष्मा लावितात व नीट न्याहाळून टंबलराकडे पाहतात) ह्या टंबलरांत कांहीं काळा पदार्थ दिसतो आहे. चमत्कार आहे मोठा. सरबत घेतलें आपण ह्या गलासांतील?

**फेयूर.**—हो, दोन घोट तर घेतले, पण बाकीचें फेकून दिलें.

**डा० सीवर्ड.**— काय ह्मणतां आपण ? ( पुन्हां नाडी पहातो ) असो, हरकत नाहीं. परमेश्वरानें आज मोठी वेळ चुकविली. बरें तर आतां——

**फेयूर.**— पण डाक्टर साहेब हें आहे तरी काय ?

**डा० सीवर्ड.**—असो, तें आतां कशाला? खचीत हें कोणी दुष्टानें आपणास आज विष घातलें होतें. आपला पिंड मजबूत ह्मणून निभावलां, नाहीं तर अनर्थ झाला असता. परमेश्वर वांचवितो ह्मणतात तो असा.

**फेयूर.**— मलाही असेंच पहिल्यानें वाटलें; पण ह्मटलें, न जाणों; आपणास हा प्रकार दाखवावा हें बरें. कोण असा दुष्ट माझे जिवावर उठला असेल तो असो. हो, पण मला ठाऊक आहे कोण तो (रागानें ) बरें बरें, पाहून घेईन तरच नांवाचा फेयूर साहेब. डाक्टर साहेब, कृपा करून त्या काळ्या भुकीचें शोधन करा, व कायतें मला लौकर कळवा.

**डा० सीवर्ड.**— बरें, तर हा गलास मी घरीं घेऊन जातों आणि पहातों काय आहे तें.

**फेयूर.**— पण हा गलास लपवून न्या. काय तो निर्णय झाल्याखेरीज ही गोष्ट मला बाहेर फोडावयाची नाहीं.

**डा०सीवर्ड.**— फार चांगलें; पण एक विचारण्याचें राहिलें, आपणास चिन्हें तरीं काय होताहेत ?

**फेयूर.**— तें काय सांगावें, एक का दोन ह्मणून. माझें डोकें जड झालें आहे, व मला भोंवळ येत आहे. डोळ्यांवाटे पाणी गळतें. सुस्ती तर पराकाष्ठेची

आली आहे. पोटांत ढवळतें. खाल्लेलें गोड लागत नाहीं. आज फार दिवसांत रात्रीची स्वस्थ झोंप कशीती ठाऊक नाहीं.

**डा० सीवर्ड.**— हींच चिन्हें विषप्रयोगाचीं. खचीत खचीत आपणास कोणी विष घातलें, ह्यांत कांहीं संशय नाहीं. बरें तर, घरीं गेलों ह्मणजे आपणांकरितां औषध पाठवून देतों. तें घ्यावें ह्मणजे आपणांस बरें वाटेल. काळजी करूं नये. येऊं तर आतां ?

**फेयूर.**— पण औषध फार लौकर पाठवून द्यावें.

( डा० सीवर्ड जातात ).

**फेयूर.**— काय चमत्कार आहे ! मी एवढा मोठा ह्मणवितों, पण माझ्या जिवावर उठले अं ! बरें काय चिंता आहे. परमेश्वरा, आज मजवर तुझे असंख्य उपकार झाले.

---

## अंक २.

### प्रवेश ३.

क. फेयूर, भाऊपुणेंकर व बळवंतराव.

**भाऊ.**—( हळूच आफिसांत डोकावतात व मागें सरतात.)

**फेयूर.**— कोण आहे तिकडे, सीपाय्.

**भाऊ.**— ( आंत येऊन ) नाहीं साहेब, मी भाऊ आहें. साहेब कामांत गुंतले असल्यास मी बाहेर बसतों.

**फेयूर.**— या, या भाऊसाहेब. मी रिकामा आहें. असे बाहेर बाहेर कां? अहो, तुमच्याशीं तर हजार कामें सोडून बोलावयाचें. वाटेल तेव्हां बेधडक येतजा.

**भाऊ.**— साहेब लोकांची प्रकृत थोडीशी कडक असते; ह्मणून त्यांच्याशीं बेताबातानेंच वागावें हें बरें.

**फेयूर.**— ( हंसून ) घ्या ती खुर्ची, बसा. त्या गृहस्थांसहि बसावयास सांगा तेथें.

**भाऊ.**—जी साहेब, प्रकृति कशी काय आहे त्याविदांची आतां.

**फेयूर.**— काल तुह्मी पाहिलीत त्यापेक्षां बरी आहे आतां. डाक्टर साहेबांचे औषधानें बराच गुण आहे.

**भाऊ.**— येईल, येईल. त्यांचा हातच तसा यशस्वी आहे, व आपणही भाग्यवान् अहांत. परमेश्वराची आपणांवर कृपा तर खरीच. ( अदबीनें हळूच ) साहेब, एक जाहीर करणें आहे. आज्ञा होईल तर.—

**फेयूर.**— मग त्यास आज्ञा ती कशास पाहिजे? हिंदु लोक तुह्मी बोवा बोलणारे मोठे चतुर. बोला काय असेल तें बेधडक.

**भाऊ.**— साहेब, ह्या परवांच्या विषप्रयोगाविषयीं एक बारीकशी बातमी लागली आहे.

**फेयूर.**— हं, हं, ( जवळ येऊन ) काय कायती ?

**भाऊ.**— ज्यांजवळून बातमी मिळाली आहे त्यांसही बरोबर मी आणलें आहे. हे गृहस्थ ते. ( बळवंतरावांकडे बोट दाखवितात ).

**फेयूर.**— ( बळवंतरावास ) हं, मग याकिहो असे जवळ· इतके लांब कां? ( मनांत ) तुमच्या सारख्यांचें तर मला आज काम आहे.

बळवंतराव.—( खुरची जवळ घेऊन ) जी साहेब. ( हात जोडून )

भाऊ.— हे मोठे सद्गृहस्थ आहेत, माझे मित्र आहेत, व विश्वसनीय आहेत.

फेयूर.— वा:, मग आज इतके दिवस नाहीं कोठें ह्यांस भेटावयास आणिलें तें.

भाऊ.— ते थोडेसे निस्पृह आहेत. मी त्यांस ह्मणत होतों कीं, पाहिजे तर साहेबांस भेटावयास नेतों; पण त्यांचें ह्मणणें असें पडलें कीं, कामाशिवाय उगीच काय एखादे मोठ्या गृहस्थांकडे जावें. आपण पडलों गरीब.

फेयूर.— ह्या गृहस्थांचें नांव काय ?

भाऊ.— ह्यांस बळवंतराव ह्मणतात.

बळवंतराव.— जी साहेब.

फेयूर.— सांगा आतां कायती खबर बळवंतराव. आह्मांस सांगण्यास कांहीं हरकत आहे कीं काय ?

बळवंतराव.—हरकत कसली ? पण भाऊसाहेबच ती विदित करितील.

भाऊ.— बरें, त्यांत काय गेलें, मी सांगतों. ( साहेबांचे कानांशीं लागून ) हिऱ्याची खाक, तांब्याची राख, व सोमल, हे तीन पदार्थ.—

फेयूर.— काय !!! काय ह्मणतां—हं, तरीच गलासाचे बुडाशीं कांहीं चकचकत होतें, व तोंडास कांहींशी कळंकाची चव लागत होती. पण भाऊ, ही खबर कोठून लागली ?

भाऊ.— माजी खंडेराव महाराजांच्या राखेचे पुत्र बापूसा-

हेब ह्यांचे तोंडांतून ही ऐकिली, असें हे ह्मणतात. हे त्यांचे पदरींच असतात.

**फेयूर्–** असें काय. बरें बापूसाहेबांस ही बातमी कोठून कळली ?

**भाऊ.–** तें कांहीं सांगतां येत नाहीं.

**फेयूर्–** मोठें कृत्य हें विलक्षण दिसतें. ह्याची आखेर कोठें जाऊन पोहोंचेल, ह्याचा नेम नाहीं. बरें असो, पाहूं पुढें काय होतें तें. मी ही बातमी डा० ग्रे साहेबांस तावडतोब कळवितों, व त्यांत हेच पदार्थ आहेत कीं काय, ह्याचा शोध काढण्यास सांगतों. हें काम मोठें गुप्तरीतीनें झालें पाहिजे.

**भाऊ.–** ह्या बातमीवरून मनांत विलक्षण विचार येतात. दुष्ट लोक काय न करितील? हर हर! कोण हें शत्रुत्व! तो परवाचा खलिता लाटसाहेबाकडे गेला कीं नाहीं, त्याचें उत्तर दोन चार दिवसांत येणार, अशी आज दरबारांत दाट बातमी आहे. पण काय फत्तर होणार आहे ह्यांच्यापासून.

**फेयूर्–** करितात हवी तशी खटपट, तो पारशी मोठा उलाढाल्या आहे. देतो कधीं तरीं महाराजांस ठोकर. मी दमलों त्यांचे कान उघडून उघडून. पण त्यांच्या कांहीं मनांतच येत नाहीं. माझ्या तोंडावर मात्र हो, हो, ह्मणतात. पण मीही त्या खलित्यावरोबर खरमरीत रपोट पाठविला आहे.

**भाऊ.–** अरण्यांत कावळे का थोडे कावकाव करतात, पण सर्व व्यर्थ. साहेब, भारी आहे ही मंडळी घमेंडींत, व महाराज पडले चमत्कारिक; कोणाएका-

चेही मताप्रमाणें वागत नाहींत. खचीत घेतात आपलें नुकसान करून. सगळे कसे त्यांस योग्य भेटले आहेत, एकापेक्षां एक अधिक.

फेयूर.—बरें, काय चिंता आहे? घेतों पाहून. मीही त्यांस वस्तादच भेटलों आहें.

भाऊ.— राज्यांत अंदाधुंदी पराकाष्ठेची चालली आहे. हें मी आपल्यास पूर्वींच विदित केलें आहे. आज अमक्याचें घर पाड, उद्यां तमक्यास छळ, परवां दे ह्यास उगीचचे उगीच शिक्षा. अशी झोटींगबाच्छाई चालली आहे.

फेयूर.— मीही ह्या लोकांचे बोभाटे व फिर्यादी ऐकतां ऐकतां थकलों. कधीं देव त्या गरीबांस ह्या जुलुमांतून सोडवील कोण जाणें.

भाऊ.— आतां लवकरच साहेब. परवांच्या त्या गृहस्थाचे कामाबद्दल त्यास अजून दरबारांतून चिठी मिळाली नाहीं. साहेबांची मेहेरबानी होईल तर.—

फेयूर.— हरकत नाहीं भाऊ, उद्यां दरबारांत याद पाठवितों, व त्या गृहस्थाचे रुपये देववितों.

भाऊ.— येतों तर आतां साहेब. ( सलाम करितो ) चला बळवंतराव.

बळवंतराव.— मीही घेतों रजा आतां. (हात जोडतो, आणि वाकून सलाम करितो.)

फेयूर.— यावें, यावें, आतां पुन्हां कधीं भेटाल?

भाऊ.— आज्ञा होईल तेव्हां आम्हीं सेवेंत हजरच आहों. साहेबांची मेहेरबानीच आहे तशी आमच्यावर.

फेयूर.– ( भाऊंचे हातांत हात घालून बाहेर येतात,) पण भाऊ, आह्मी तुह्मांस कांहीं न देतां घेतां, तुह्मी आह्मांस ह्या घोंटाळ्याचे कामीं फारच मदत करितां. भारी उपकार आहेत तुमचे.

भाऊ.– साहेब, हें असें काय आपण मनांत आणावें? आह्मी ह्मणतों कीं, खाविंदांसारख्यांचा आश्रय आह्मा गरीबांस असला ह्मणजे मग काय! आह्मी मोठे आपणांस नशीबवान् समजतों. नुसतें साहेबांनीं एखादें काम केलें कीं, भरलें आमचें पोट. पण साहेब, एक प्रार्थना करावयाची आहे, ती आणिले देवानें तसे दिवस तर मग पुढें करीन.

फेयूर.– (हंसून) समजलों, समजलों काय आहे ती. असो, पाहूं पुढें.

भाऊ.– येतों तर मी आतां. साहेबांनीं उगीच तसदी घेतली बाहेर येण्याची. आह्मी का कोणी महाराज, का कोणी सरदार, का बडे साहेब. पण आपलें हें एक सरळपणाचें व आमचे सारखे गरीबांवर मेहेरबानीचें लक्षण आहे. येतों तर आतां.

फेयूर.– ( हंसतात व आंत जातात.)

# अंक २.

## प्रवेश ४.

### रेसिडेन्सी.

**क. फेयूरसाहेब, मल्हारराव महाराज, दादाभाई शेट दिवाणजी.**

( सरकार फेयूर साहेबांस भेटावयास येतात )

**फेयूर.**—(सरकारांचे हातांत हात घालून सलाम करितात) सरकारस्वारी आज रोजचे पेक्षां लवकर आली.

**महाराज.**—( दुःखानें ) साहेब, काल एक दुःखकारक वातमी ऐकिली, त्याचे योगानें मनास फार वाईट वाटलें. कामकाज सुचेनासें झालें आहे. रात्रीं झोंप देखील आली नाहीं. केव्हां साहेबांस भेटेन असें झालें. ऐकिलें कीं, कोणी दुष्ट आपले जिवावर उठून, त्यानें आपणास विषप्रयोग केला होता; पण परमेश्वर तारणारा समर्थ असला ह्मणजे काय होणार आहे ? आपली नाडी खबरदार ह्मणून बरें; नाहीं तर एखादा घात व्हावयाचा.

**फेयूर.**— महाराज, असें झालें तर खरें. ईश्वराचे मजवर असंख्य उपकार आहेत.

**महाराज.**— पण मी परवां सकाळीं आलों होतों, तेव्हां कोठें साहेब मजजवळ ह्यासंबंधी बोलले नाहींत हें कसें ! असें होऊं नये ह्मटलें असतां.

**फेयूर.**— नाहीं, सहज नाहीं मीं महाराजांजवळ गोष्ट काढली.

**दादाभाई.**— मीही ह्या विषप्रयोगाबद्दल गांवांत प्रथम बोभाटा ऐकला, पण माझी पहिल्यानें खातरी होईना. मनांत असें येई कीं, असें होणें असंभाव्य आहे. असेल ही एखादी बाजारगप्प, पण जेव्हां काल दाट वदंता ऐकिली, व महाराजांनींही सांगितली तेव्हां मग खातरी झाली. मोठा चमत्कार वाटतो हा!

**फेयूर.**— (विषप्रयोगाविषयीं सर्व हकीगत महाराजांस सांगतात.) कोण्या दुष्टाचें हें कृत्य असेल तें प्रभु जाणें.

**महाराज.**— ह्याविषयीं पूर्ण चौकशी होणें अवश्य आहे साहेब. आपणांस जी लागेल ती मदत देण्यास मी सिद्ध आहे. मला सांगाल तर मीही स्वतां चौकशी करवितों. माझ्या राज्यापैकीं जर कोणाचें हें कृत्य असेल तर त्याचा जीव घेईन, त्याची धिंड काढीन. काय सांगूं साहेब! असें होऊन त्याची चौकशी न होणें, हें राणी सरकारचे राज्यास व माझे राज्यासही मोठा काळिमा आणणारें आहे. तर मग साहेब आतां पुढें काय बेत.

**दादाभाई.**— खरें आहे सरकार. राजा कोणास ह्मणावें तर ज्याचे राज्यांत एकाद्या साध्या लंगोट्याच्या जीवितास व वित्तासही ढका नसावा. नाहीं तर काय पुष्कळ राज्यें आहेत आणि राजेही आहेत.

**फेयूर.**— आपलीं हीं भाषणें ऐकून समाधान होतें. महाराजांच्या ह्मणण्याप्रमाणें पूर्ण चौकशी होईल.

**महाराज.**— येतों तर मी आतां. फार फार वाइट गोष्ट

झाली! माझें मन फार उद्विग्न झालें आहे. ह्याची पूर्ण चौकशी होईपर्यंत अन्नही गोड लागणार नाहीं.

दादाभाई.– खरेंच आहे. कसें गोड लागेल!

( सर्व जातात. )

## अंक ३.

### प्रवेश १.

दरबार.

**मल्हारराव महाराज, दादाभाईशेट, काजी शाबुद्दिन, बळवंतराव मंगेश, हुरमुसजी वाडिया.**

महाराज.– शाबास आपली दिवाणसाहेब. परमेश्वरानें आपणांस ह्या आपुल्या कामांत पूर्ण यश दिलें. साहेबांपासून भारी त्रास झाला होता हो, बरें झालें एकदाची पिडा गेली.

दादाभाई.—खरेंच महाराज. कोणचेंही काम सुचत नव्हतें. साहेबांची व माझी आपली सदा तेडच. कधीं ह्मणजे मी जाऊन एखादी मसलत विचारिली, आणि त्याणीं मोकळ्या मनानें दिली असें झालेंच नाहीं. या साहेबानीं माझा अपमानही वारंवार केला.

महाराज.– मजजवळ ते नेहेमीं ह्मणत असत कीं, हे असले दिवाण आपले कामाचे नाहींत. ह्यांनीं विलायतेंतील सभांमध्यें मोठमोठीं संभाषणें मात्र करावीं; परंतु हे राजकीय कामांच्या अगदीं उ-

पयोगाचे नाहींत, यामुळें सर्व घोटाळा करून टाकितील. हे आपले मनांत नानाप्रकारचे नवे विचार भरवून देतील, व आपला आजपर्यंत जो पूर्वापार कित्ता चालत आला आहे त्यामध्ये व्यत्यय आणितील व शेवटीं सर्व रहातील एकीकडे.

**बळवंतराव.**— काय ते राज्यकार्यधुरंधर हेच! तरीं बरें, जिकडे जिकडे ह्या स्वाऱ्या गेल्या तिकडे तिकडे फजीती झाली ह्मणून. पालनपुरास गेले, तेथें फजीती. सिंध देशांत गेले, तेथें फजीती. बडोद्यास आले तेथेंही हाच प्रकार.

**दादाभाई.**—मला हे साहेब ह्मणत असत. "दिवाणजी, आपण ह्या अशा गोंधळांत पडूं नका; आपणाच्यानें हें काम पार पडणें नाहीं. ही गायकवाडी ह्मणजे केवळ खटपटीचें घर." पण हे नवे साहेब आले, ह्यानीं मला जी आठ दिवसांत सुधारणुकेचे कामीं मदत केली, ती फेयूर साहेबांचे हातून सहा महिन्यांत देववली नाहीं. खरोखरच मी मोठे गोंधळांत पडलों होतों, व पुढें काय करावें हें सुचत नव्हतें. झालें हें कांहीं अंशीं बरें झालें.

**बळवंतराव.**— हे नवे पेलीसाहेब बरे पोक्त विचाराचे आहेत असें दिसतें. राज्यकारस्थानीही खरेच, व सल्ला मसलत देण्यांतही फार हुशार आहेत.

**महाराज.**— फेयूर साहेबांचे अनुयायी ह्या साहेबांकडे गायकवाडीविरुद्ध फिर्यादी घेऊन जाऊं लागले होते; पण मग ह्या साहेबांनीं त्यांस काय उत्तर दिलें. "तुमचा राजा तुमचें बोलणें ऐकून घेणार समर्थ

आहे. तुह्मी त्याजकडे जावें हें योग्य. मजकडे येण्याचें कांहीं कारण नाहीं." नाहीं तर आमचे फेयूर साहेब! शहाणातो शहाणा. सध्यां तर वेवा हे असे आहेत मग पहावें.—

काजीसाहेब.—महाराजांनीं हा रयतेवरील एक चतुर्थांश कर कमी केला ह्मणून रयत फार दुवा देते आहे. भारीच ही पिडली होती. आतां हे महाल इजाऱ्यानें देण्याचे कामीं मात्र महाराजांनीं उत्तम व्यवस्था केली पाहिजे.

महाराज.—पण वसूल किती कमी झाला आहे आलेंका ध्यानांत. रयतेला काय होतें? जमीनीवरील सर्वच सारा कमी केला तर रयत उड्या मारूं लागेल; पण आपण आपला विचार पाहिला पाहिजेना? केवळ रयतेचे कल्याणाकडे लक्ष दिलें तर हें राज्याचें गाडें चालेल कसें?

दादाभाई.—सरकार, अलीकडच्या ह्या मंडळीनें जे कांहीं रिकामे खर्च वाढविले आहेत, हे कमी केले असतां उत्पन्नास आणि खर्चास मेळ राहील. खानगीचें प्रकरण हें अलीकडे फारच वाढलें आहे; त्याचाही विचार झाला पाहिजे. सरकारचा जितका खर्च होतो त्यापैकीं बहुतेक अनेक वांकड्या वाटांनीं जातो; तसें न झाल्यास महाराजांचे सर्व हेतु पूर्ण होऊन, खर्च कमी लागेल. आतां असा बंदोबस्त झाला असतां रयतेचें कल्याण होईल खरें; पण सरकारचे पदरची मंडळी मात्र डोळे वटारील तिकडे कानाडोळा झाला पाहिजे.

**महाराज.**—आमचा खानगी खर्च डोळ्यांत सलतो आहे. त्यापैकीं एक कवडी देखील कमी होणार नाहीं. आपण ह्याकडे लक्ष देऊं नये, असें मला वाटतें.

**बळवंतराव.**—पण सरकार, मागें वहिवाट चालत आली आहे त्याप्रमाणें महाराजांनीं खुशाल खर्च करावा. पण जितका हा अयोग्य कारणानें वाढला असेल त्याविषयीं मात्र.—

**महाराज.**—हो, ही तोड आह्माला कबूल आहे.

**वाडियाशेट.**—सरकार, आह्मी सर्व आतां आपले राज्यांतील पार्लमेंटच कीं नाहीं? विलायतेंत एव्हढीं मोठीं महाराणी सरकार आहेत, त्यांस देखील जो कांहीं कमजास्त खर्च लागतो, त्याबद्दल पार्लमेंट सभेचें अनुमोदन घ्यावें लागतें, आणि राणी साहेब आपला चालू खाजगी खर्च सभेनें जी नेमणूक करून दिली आहे, त्याबाहेर जाऊं देत नाहींत.

**महाराज.** —(हंसून) मोठें गोड बोलतां शेटजी. पण ह्या मराठीशाईंत असा इंग्रेजी बेत चालेल कीं नाहीं हें सांगवत नाहीं.

**बळवंतराव.**—महाराजांनीं मनावर घेतलें, ह्मणजे काय नाहीं होणार? सरकार, ही नजराण्याची चाल बंद झाली हें देखील बरें झालें. लोकांस फारच सुख झालें आहे.

**दादाभाई.**—हो, ह्यांत काय संशय. तितकी न्यायविकरी कमी झाली कीं नाहीं. न्यायाचे जोरावर तर हा इंग्रजांचा राज्यकर्तेपणाचा एवढा बाणा व एवढें महत्व.

**महाराज.**— तुह्मी सर्व आतां प्रतिगायकवाड बनलां अहांत जणु. बेधडक हवा तो हुकूम प्रसिद्ध करितां. उगीच आह्मला विचारल्यासारखें मात्र करितां.

**काजीसाहेब.**— पण महाराज, आपल्या हुकुमावरच तर आमच्या ह्या उड्या. गायकवाडी शिक्का मोर्तब असल्याशिवाय आमच्या हुकुमास विचारतो कोण?

**दादाभाई.**— आतां, ही सरदार व दरकदार ह्यांचे हक्कांविषयीं व देण्याघेण्याविषयीं चौकशी लौकर झाली पाहिजे. तशाच त्यांच्या दोन दोन, तीन तीन वर्षांच्या चिठ्या मात्र झाल्या आहेत, परंतु भरण्यास ठिकाण नाहीं; तसेच लष्कराचे पगार फार तुंबले आहेत; ह्या सर्व कामांचा विचार फार लौकर झाला पाहिजे. काय हा या पदरचे लोकांनीं वखेडा करून टाकिला आहे!

**बळवंतराव.**— खरेंच, एखादी गोष्ट विकोपास गेली नाहीं तोंपर्यंत कोणचा एखादा विचार झाला पाहिजे.

**महाराज.**— तुह्मीं सर्व ह्मणतां हें खरें आहे. आतां हळुहळू त्याचा विचार करितां येईल. घोटाळा तर खराच झाला आहे, पण तो सगळा एक दोन दिवसांत तर मोडत नाहींना?

**काजीसाहेब.**— राजाचें मुख्य कर्तव्य हें आहे, कीं आपला स्वतांचा देखील तोटा सोसून घेऊन ज्यांच्या जिवावर आपणांस राजा हें पद मिळालें आहे त्यांस सुखी ठेवावें. महाराज हें सर्व जाणतच आहेत.

**बळवंतराव.**— महाराज, आणखी एक प्रार्थना आहे. ह्या शहरसुधारणुकेकडे थोडेंसें लक्ष असावें. को-

ण हें गलिच्छ शहर! पण अतां हा सूरसागराचा तलाव पुरा झाला ह्मणजे काय मौज होणार आहे! प्रथम तर शहरची हवा फार सुधरेल. शहरांत पाणी विपुळ झालें ह्मणजे शहरसुधारणुकेचें अर्धें काम झालें.

**महाराज.**— आतां अहांतच आपण सर्व हुशार. आमचें वडोदें प्रति मुंबई बनवा ह्मणजे झालें! आतां आमचा तर सर्व विश्वास तुह्मावर आहे.

**दादाभाई.**— महाराज, आह्मी ह्या आपल्या कामांत एकदां हात घातला आहे, त्यापेक्षां आह्मास महाराजांची सर्वांचे तोंडून वाहवाच ह्मणविणें आहे. ह्या कामांत आह्मांस यश मिळो, हेंच देवाजवळ आमचें मागणें आहे. महाराजांनीं प्रजेचे कल्याणाकडे सतत लक्ष द्यावें, तीस न्याय उत्तमप्रकारचा द्यावा, तिचें संरक्षण पोटचे पोराप्रमाणें करावें, तिच्या वित्तास, प्राणास व स्वातंत्र्यास धक्का न लागूं द्यावा. असें झाल्यास महाराजांची कीर्ति दिगंतरीं पोंहोंचेल. कोणाच्यानें महाराजांच्या काडीसही धक्का लाववणार नाहीं, आणि जर कोणी लाविला तर त्यांची खबर शेवटपर्यंत घेण्यास आह्मी तयार आहोंत. आमचा मनःपूर्वक हेतु हाच आहे कीं आपल्या हिंदुस्थानांत जीं कांहीं दोन चार ह्मणावयाजोगीं राज्यें अजून राहिलीं आहेत, तीं तरी सुखी असावीं. त्यांनीं तरी इंग्रेज सरकारची मर्जी सुप्रसन्न करून घ्यावी. हें एकदां राज्याचें काम सोईस लागेपर्यंत मी येथें रहाणार आहें.

हा एवढा माझा हेतु सिद्धीस गेला, ह्मणजे मग सरकारची आज्ञा घेऊन पुनः पूर्वींचे कामास लागणार. आपली पूर्वींची स्थिति बरी.

**महाराज.**— माझें नशीबच माझे साह्यकारी झालें असें ह्मटलें पाहिजे; नाहीं तर अशी ही हितचिंतक मंडळी मजकरितां इतकी लांब कशाला धांवत आली असती!

( कचेरी बरखास्त होते, सर्व जातात )

---

## अंक ३.

### प्रवेश २.

राजवाडा, माजघर.

**मल्हारराव महाराज, नानासाहेब खानविलकर, दामोदरपंत.**

**दामोदरपंत.**— आज नव्या मंडळीशीं फार वेळ गुंतली होती स्वारी. ( हंसून) असेल कांहीं तरी नेहमींचें चऱ्हाट ! कांहीं नव्या सुधारणा !

**महाराज.**— कांहीं आपल्या राजकीय गोष्टी चालल्या होत्या. इतकी बारीकशी त्याची चौकशी ?

**नानासाहेब.**— आह्माला काय त्याचें ? असतील कांहीं अशा प्रकारच्या गप्पा. सरकार, आज हें बंद करा, उद्यां तें करा, आज ह्या नव्या सुधारणा करा, उद्यां त्याचे पोटावर पाय आणा !!

**दामोदरपंत.**— आणि आमचे विषयींही कांहीं कागाळ्या असतील. आमचे पाठीस हे नवे हात धुऊन तर लागले आहेत. आतां पहावें त्यांचे बेत आमचे अन्नदात्यापुढें किती टिकतात ते? पण रंग बरा दिसत नाहीं! नशीब आमचें! खाशांची मर्जी देखील आमचेवर सध्या बहाल नाहीं. हो, कशाला असेल? आह्मी राज्यबुडवेच पडलों कीं नाहीं?

**महाराज.**— पंत, तसें नाहींहो; तुमचे वरची मर्जी कालांतरींही कमी होणें नाहीं. मग आपले आपले ह्मटले आहेत ते काय! कांहीं तरीं आपलें नेहेमीं खोचून बोलावयाचें ना?

**नानासाहेब.**— पण सरकार, आजचें काय खलबत चाललें होतें?

**महाराज.**— खलबत तें कसलें? रयतेवरील कर कमी केला, नजराण्याची चाल बंद केली, त्यानें लोकांस फार सुख झालें आहे असें ही मंडळी ह्मणत होती.

**दामोदरपंत.**— फार चांगलें! रयतेस ह्मटलें कीं, आज सर्वांनीं निघावें व सरकारी खजीना लुटावा, आणि राजवाड्यांतील सर्व सामान आपले घरोघर न्यावें, तर रयत हंसत तसें करील व महाराजांवर पुष्पवृष्टिही करील! आले मोठे शहाणे सल्ला मसलत देण्याला! आजपर्यंत देत होती कीं नाहीं रयत वसूल. आमचे राज्यांत रहाणें तीस पुरवत नसतें तर ती कधींच इंग्रेजी अमलांत गेली असती; पण अजून तर तो प्रकार कोठें ऐकिला नाहीं. करितील धूळधाणी हे लोक राज्याची. मग डो-

ळे उघडतील!! महाराज, आह्मी असें बोलावें, असें नाहीं; पण आपली गोष्ट सांगितली. सरकार सर्व जाणतच आहेत.

**महाराज.**— मला ह्मणतात खाजगी खर्च कमी करा; ह्मणजे वसूल कमी आला तर त्याची कसर निघून जाईल.

**दामोदरपंत.**— हो, हो, फार शहाणे! ह्मणतात खानगी खर्च कमी करा! कां तो? महाराजांनीं मान डोलविलीच असेल! भारी भोळा स्वभाव! त्या शिंद्याचे व होळकराचे खजीन्यांत पहा काय चंगळ आहे ती. अतोनात पैसा सांठवून ठेविला आहे कसा तो. राज्यांत सुख कायतें द्रव्य. त्यासच हे शहाणे लोक आडवे येतात. मग काय विचारावें!

**महाराज.**— काय करावें, तुह्मी ह्मणतां हें खरें वाटतें व ते ह्मणतात तेंही तेंवढा वेळपर्यंत खरेंच वाटतें.

**नानासाहेब.**— पण आमचे खरें वाटण्यास विचारीतच नाहींसा झाला आहे कोणी. आह्मी ह्मणजे आपले दीडदमडीचे!

**महाराज.**— ते ह्मणतात, ह्या सरदारांच्या व दरकदारांच्या बाक्या व लष्कराचे पगार द्यावे चुकवून लवकर.

**दामोदरपंत.**— द्यावे, द्यावे! आहेत तेवढे चाळीस लाख रुपये, तेवढे डोळ्यांत खुपतात ह्यांच्या..काय झालें आहे सरदारांस व दरकदारांस एक दोन वर्षांच्या बाक्या थकल्या ह्मणून? थोडी का गायकवाडी लुटली आहे त्यांनीं. एकएकाच्या घरांत पहा कशा सोन्याच्या कांबींच्याकांबी सांठवून ठेविल्या आहेत त्या.

मराठी ग्रंथ संग्रहालय

ह्या वडोद्यांत अजून सोन्याचा धूर निघतो आहे. आतां लष्कराचे पगार, ते मात्र दिले पाहिजेत. देतां येतील सावकास, पुढल्या वर्षाचा वसूल आला ह्मणजे. कां दिवाण साहेब, मी ह्मणतों हें खरें का नाहीं?

**नानासाहेब.**– हो खरेंच, असेंच करावें; ह्याणी नजराण्याची चाल बंद केली. कां हो! दुसऱ्या राज्यांत नजराणे घेण्याची चाल नाहीं का? मोठमोठीं सुधारलेलीं राज्यें ह्मणवितात, तेथें देखील कधीं कधीं नजराणे घेण्याची चाल आहे. ह्या नव्या मंडळीसच विचारा ह्मणजे समजेल.

**महाराज.**– पण अशी आपल्यासारखी चाल नाहीं हो, त्यांच्यामध्यें. अलीकडे हें प्रकरण फार माजलें होतें. मी तुह्माला कितीवेळ सांगितलें होतें कीं, हें नको आपणास. ही चाल बंद करा; पण नाहींच तुह्मी ऐकिलें.

**दामोदरपंत.**– सर्व कामांत आह्मी अपराधी आहोंतच!

**महाराज.**– तर मग आतां काय करावें तरी ह्या घोटाळ्यास, आणि आणावा कोठून इतका पैसा. जेथें तेथें ही मंडळी. पण त्यांना तरी पैसा तर पाहिजेच कीं नाहीं !

**दामोदरपंत.**– वा:, इतकी गोष्ट सरकारच्या लक्षांत आली असतांही सरकार त्यांचा नाद सोडीत नाहीं हें. आश्चर्य नव्हे का? अहो, द्या हुसकून या मंडळीस. कशाला पाहिजे ही पिडा उगीच, दुकाळांत तेरावा महिना ! पण ही गोष्ट धन्याच्या मनांत वागली पाहिजे ना !

**महाराज.**— पण असें केलें असतां मला लोक काय ह्मणतील वरें ?

**दामोदरपंत.**— लोक झक मारतात ! आपणांला काय करावयाचें आहे त्यांच्या ह्मणण्याशीं? आपला नफा तोटा तर आपल्याला पाहिला पाहिजे का नाहीं?

**नानासाहेब.**— खचीत, भारीं त्रासलों आहोंत आह्मी. सरकारांनीं कोणता तरी एक विचार करावा; नाहीं तर आह्मांस तरी सांगावें घरीं वसण्यास, हे आह्मीं तयार आहोंत. कंटाळलों आतां ह्या दगदगीस आणि ह्या काळजीस.

**महाराज.**— तुह्मी सर्वच जर असें ह्मणूं लागलां तर हें निभेल तरी कसें ?

**दामोदरपंत.**— महाराजानीं कोणाचे एकाचे बोलण्यावर तरी विश्वास ठेवावा. एकाचे मतानें चालावें. असें हजारांचे विचारानें चाललें असतां काय परिणाम होईल हें कोणी सांगावें?

**महाराज.**— वरें बोवा. ह्या मंडळीस सध्यां इतक्यांत तर दूर करितां येत नाहीं; व त्यांनीं जें कांहीं आजपर्यंत केलें तें वदलतांही येत नाहीं. आतां ह्या पुढें मात्र कोणची गोष्ट करणें ती विचारानें करूं. जा आतां तुह्मी. फार रात्र झाली. मीही जातों आतां निजावयास.

—महाराज जातात.—

**दामोदरपंत.**— ( मनांत )वा:, एकूण येथपर्यंत तर मजल येऊन ठेपली. आतां पुढें पाहून घेऊं काय होतें तें ( मोठ्यानें दिवाणजीस )कांदिवाणजी, स्वा-

रीचें मन वळविलें कीं नाहीं? नाहीं तर कायहो आपली फजीती. आपणास बडोद्यांतून लवकरच पाय काढावा लागला असता.

**नानासाहेब.**—भारी भोळा स्वभाव, व बुद्धिही भारीच चंचळ. आतां एक व घटकेंत एक, हें चांगलें नाहीं पण.

**दामोदरपंत.**— हरकत नाहीं हो. आपणास मोठ्या हुशारीनें मात्र राहिलें पाहिजे. ह्या मंडळीनें कांहीं नवें काढिलें कीं त्यावर हरयुक्तिप्रयुक्तीनें खो आपला आणिलाच पाहिजे. (हंसून) माझें इतकेंच ह्मणणें आहे कीं आपणास ह्या इंग्रेजींतील मंडळीनें न हरवावें.

**नानासाहेब.**— फार हुशार तुह्मी बामणबोवा. आमच्या मराठ्यांच्या हातून असें होणें नाहीं.

**दामोदरपंत.**— (हंसून) हो, असें तर झालेंच पाहिजे. बरें, चला आतां.

(जातात.)

---

## अंक ३.

### प्रवेश ३.

म्हाळसा बाईसाहेबांचा रंगमहाल.

मल्हारराव महाराज व म्हाळसाबाई.

(महाराज येतात व पलंगावर विडा खात बसतात.)

**महाराज.**— या अशा, बसा कीं. (हंसत) माझे पाय दुखतात!

म्हाळसाबाई.— हो, आलेंच हे आणखी एक दोन विडे, दासीस करण्यास सांगून.

महाराज.— पण आह्माला हातचे पाहिजे असल्यास?

म्हाळसाबाई.— हो, करितें. माझ्याकडून तयारीच आहे.

महाराज.— पण नकोत आतां. याच कशा —

म्हाळसाबाई.— हो, हे झालेच. ( येतात व जवळ वसतात ) आज आमचें मोठें नशीबच ह्मणावयाचें. बाई साहेबांनीं वरी रजा—

महाराज.— जसे काय आह्मी कधीं येतच नसूं. तिचें विचारीचें काय !

म्हाळसाबाई.— हो खरेंच तें. तें असो; पण आज हे पंत फार वेळसे वसले होते? बारीक बारीक गोष्टी चालल्या होत्या, कांहीं तरी मतलबाच्या असतील.

महाराज.— बायकांना काय त्याचें ? तुमच्या मनांत ही मंडळी ह्मणजे मतलबाचें घर; पण मला वाटतें कीं जिवास जीव देणारी हिच्यासारखी मंडळी जगांत नसेल. खरोखर हे माझ्या हितास मनापासून झटतात.

म्हाळसाबाई.— महाराज स्वप्नांत आहेत ! हे तर एकास पळ व एकास पाठीस लाग असें ह्मणणाऱ्यांपैकीं आहेत. आपली तुंबडी भरली ह्मणजे मग दुसऱ्याचें कांहीं कां होईना, अशांतले हे लोक आहेत. पण आज काय खलबत चाललें होतें? ऐकावें तर खरें.

महाराज.— पण आह्मास नसलें सांगायाचें तर ? तुमचा कांहीं आग्रह?

**झाळसाबाई.**— त्यांत तो कसला आग्रह. नाहीं सांगण्याचें झालें तर आमची बळजोरी कां आहे? आह्मी कोणचे झाडाचा पाला; पण आपला जीव वेडा, ह्मणून वाटतें कीं स्वभाव पडला भारी भोळा, तेव्हां कोणी मेले आपस्वार्थी भलतीच सल्ला मसलत देऊं लागले, तर जपून वागावें ह्मणून सांगावें. दुसरें काय आणखी! आपलेकडून आपण सांगत असावें, मग ऐकणें न ऐकणें—

**महाराज.**— त्याचा इतका राग तो कशाला पाहिजे? सांगाच ह्मणावें आणि मग जर नाहीं सांगितलें, तर मात्र आमचा दोष. दामू सांगत होता कीं ही नवी मंडळी दिवाणजी वगैरे, ह्यांनीं राज्याची धूळधाणी आरंभिली आहे.

**झाळसाबाई.**—कोणी! ह्या नव्या मंडळीनें! आणि राज्यकारभारांत उत्तम जसे मेले हेच!! काय केलें नव्या मंडळीनें, हे ह्मणतात?

**महाराज.**— जमीनीवरचा सारा कमी केला, नजराण्याची चाल बंद करविली, ह्या गोष्टी वाईट केल्या असें त्यांचें ह्मणणें पडतें, आणि विचार करून पाहिलें असतां मलाही त्यांचें ह्मणणें रास्त दिसतें. सारा कमी केला तर तितके पैसे नाहीं का कमी होत? आतां हे नजराणे, कां आपण एकटेच घेतों आहों, दुसऱ्या राज्यांतही पुष्कळ चाल आहेच. मग आपणच कां कमी करावे? अग, तुला समजत नाहीं, जो दिवस जातो तो आपला. उद्यां काय होईल ह्याचा नेम नाहीं.

म्हाळसाबाई.–हर हर! कोण हा भोळा स्वभाव, कोण ही चंचळवृत्ति, मी ह्मणजे असें ह्मणावें असें नाहीं. पण काय करावें! चरणांपाशीं आजपर्यंत विदित करीतच आलें आहें, व पुन्हा वारंवार हेंच सांगतें कीं हे पदरचे दुष्ट आहेत, आपमतलबी आहेत, लोभी आहेत; पण नाहींच कांहीं मनांत येत ! रयतेवरील कर थोडासा कमी केला व नजराणे बंद केले ह्या गोष्टी ह्यांच्या डोळयांत खुपाव्या ना ! मोठे आले आहेत राज्याचा नफा करणार! रयत सुखी तर राजा सुखी ही ह्मण का खोटी आहे? ज्या राजास लोक दुवा देतात व त्याचें बरें इच्छितात तोच राजा सुखी. पैशास काय करावयाचें आहे? रयत असंतुष्ट, पण पैसा पुष्कळ काय जाळावयाचा आहे?

महाराज.– खरें गडे, तूं ह्मणतेस हेंही खरें. मला एकदां असें वाटतें, एकदां तसें वाटतें. दिवाणजी सांगतात, सरदारांच्या वगैरे रोज्या थकल्या आहेत, त्या देऊन टाकाव्या; हे ह्मणतात, कांहीं नको देण्यास. पुष्कळ गायकवाडीस बुडविलें आहे त्याणीं.

म्हाळसाबाई.– आणि ह्याणीं जसें कमीच केलें आहे! दोहों दोहों हातांनीं पैसे ओढताहेत मेले जसे! आमची बायकांची बुद्धि तर खरीच; पण ऐकणाराचें त्यांत कल्याणच आहे. आह्मास समजत तर नाहींच, पण हें देखील वाटतें कीं, ज्या सरदारांचे व दरकदारांचे जिवावर तर आपलें सर्व, त्यांसच दगा द्यावा हें नीट नाहीं. उद्यां ते उठले तर ही हुजी मंडळी येईल कां पुढें डोकें द्यायाला? मी पदर पस-

रितें, हात जोडून सांगतें कीं ह्या मंडळीचे नादीं लागूं नये. हे खालीं पहावयास लावितील व आपण होतील नामानिराळे. ही नको पिडा राज्यांत. मीच असें ह्मणतें आहें असें नाहीं; साहेबाकडूनही ह्या मंडळीस घालवून देण्याबद्दल हुकूम आला आहे, तरी अजून देखील त्यांस छायेखालीं ठेविलेंच आहे! सरदारांनीं व दरकदारांनीं गायकवाडी बुडविली अं! त्यांच्या पूर्वजांच्या बाहदऱ्या मनांत आणिल्या तर डोळ्यांवाटे टिपें गळतात, कित्येकांनीं गायकवाडीकरितां आपले जिवाकडे देखील पाहिलें नाहीं. प्राण दिले! कशा मनोभावानें त्यांनीं चाकऱ्या केल्या आहेत बरें! नाहीं तर हे तोंडपुजे!

**महाराज**– (गहिवरतात) काय करावें! ते मला भय घालितात कीं, ह्या नव्या मंडळीस वाटेस लावा, किंवा आह्मांस तरी घरीं बसण्यास सांगा, आह्मी हे तयार आहोंत.

**ह्माळसाबाई.**– वाः, हे घरीं बसतील तर मग सोन्याहून पिवळें! आमची एखादी तरी मेली बायकांची बुद्धि ऐकायची होती. आह्मी वेड्या तर ठरलोंच आहोंत; खचीत खचीत हे खालीं पहावयास लावितील!

**महाराज.**– बरें असो, पाहूं त्याचें. आतां रात्र नाहीं का झाली; कंटाळलों मी ह्या राज्याच्या काळज्या करितां करितां. नको मला हें राज्य असें झालें आहे.

**ह्माळसाबाई.**–ह्या पदरच्या मंडळीस रजा द्यावी, नव्या मंडळीच्या अनुरोधानें असावें, ह्मणजे आपोआप काळज्या नाहींशा होतील व सर्व यथास्थित चालेल.

**महाराज.**— पुरे तें, नको आतां कटकट. हें रोजचेंच आहे. चला आतां. मला बोवा झोंप आली.

सर्व जातात.

---

## अंक ३.

### प्रवेश १.

रेसिडेन्सी.

**रावसाहेब गजानन विठ्ठल, खानबहादुर अकबरअली, खानबहादुर अबदुल्लाअली, शिपाई.**

**रावसाहेब.**— कां खानबहादुर, ह्या विषप्रयोगाचा पत्ता लावण्याचे कामांत आपणास सक्त मेहेनत केली पाहिजे. आपण हुशार ह्मणूनच सरकारानें हें काम आपणांकडे सोंपिलें आहे, यासाठीं आतां आपल्या चातुर्याविषयीं व मेहेनतीविषयीं सरकारची खातरी करण्याचा हा प्रसंग दवडतां नये.

**खानबहादुर.**— बडी अक्कल खरचली पाहिजे रावसाहेब. आज मी सरकारचें काम ३९ वर्षं करितों आहें, पण असा घोंटाळ्याचा खटला मीं कधीं पाहिला नव्हता.

**छोटेखान बहादुर.**— रावसाहेब, या खटल्यांत खुदानें यश मात्र दिलें पाहिजे, मग सरकाराजवळ इनाम मागण्यास आपण सोडणार नाहीं.

**रावसाहेब.**—बरें, तें असो; ती पुढची गोष्ट. काम मोठें पण शितापीनें झालें पाहिजे. खटल्याचे स्वरू-

पाहून पाहतां असें वाटतें कीं, ह्या कामांत गायकवाड सरकारचें खचीत अंग आहे; कारण जर हें काम गरीबगुरीबाचें असतें तर त्यास हिऱ्याच्या पुडीचा उपयोग करणें सुचलें नसतें.

**खानबहादुर.**—खरें ह्मटलेंत. माझाही असाच तर्क धांवतो. आतां ह्या खटल्यांत रावजी व नरसु यांस पकडलेंच आहे. आतां काय तो बरोबर खुलासा कळेल.

**रावसाहेब.**—रावजीस माफीचें सरटिफिकीट पेली साहेबांकडून देववितों ह्मणून कालच सांगितलें आहे. तो कांहीं तरी खचीत सांगेल.

एक पोलीस जमादार येतो.

**पोलीसजमादार.**— (खानबहादुरांस सलाम करतो) आपलें काम झालें खानसाहेब.

**छो० खानबहादुर.**—काय, काय ह्मणतां जमादार ?

**पोलीसजमादार.**—साहेब, रावजी हवलदार कबूल झाला एकदाचा. तो आपणांस बोलावतो आहे.

**खानबहादुर.**— रावजी झाला कबुल! तो काय ह्मणतो?

**पोलीसजमादार.**—गलासांत विष मी टाकलें असें सांगतो.

**रावसाहेब.**—हां! येव्हढेंच कबूल करितो?

**पोलीसजमादार.**—नाहीं साहेब, तो पुष्कळांचीं नांवें घेतो.

**छो० खानबहादुर.**—हं ! कोणकोणाचीं तीं?

**पोलीसजमादार.**—सालम, यशवंत वगैरेचीं नांवें आपलीं एकामागून एक बकतो.

**रावसाहेब.**—वगैरेचीं ह्मणजे? आणखीं कोणाचीं?

**पोलीसजमादार.**—रावसाहेब, खुद्द सरकार मल्हाररावमहाराजाचें नांव त्यानें तोंडांतून काढिलें.

छो० खानबहादुर.— काय ह्मणतां? महाराजाचें नांव? तुह्मी स्पष्ट ऐकिलेंत?

पोलीसजमादार.—हां, गायकवाडाचेंच; तें आपण समक्षच ऐका चला.

खानबहादुर.— काय ह्मणतो तो? जमादार, रावजी काय ह्मणतो?

पोलीसजमादार.—तो ह्मणतो, महाराजानें मला फेयूरसाहेबास जहर घाला ह्मणून सांगितलें. मी एका बाटलींत पाणी घालीत असें व महाराजाकडून आणलेलें विष त्यांत टाकून बाटली हालवून तें पाणी सरबतांत घालीत असें. असेंच आणखींही पुष्कळ भारूड सांगतो. हवलदार पण मोठा हुशार आहे. माफीची गोष्ट कळतांच सुमारें एक दोन कलाकांचे आंत तो सोईस आला, आणि त्यानें ती सर्व हकीगत सांगितलीन्, विचारपूस फारशी करावी लागली नाहीं.

छो० खानबहादुर.— हो, मनुष्य असाच हुशार पाहिजे अशा कामास, नाहीं तर, त्याचे जिवास त्रास, व आमचे जिवास त्रास.

रावसाहेब.— कां खानबहादुर, आपला तर्क खरा झाला कीं नाहीं? मला अशीं स्वप्नेंच पडत होतीं!

खानबहादुर.— बरें आपलें हें एक मोठें काम झालें.चल आतां आपण सूटर साहेबांस ही बातमी सांगूं. मग पुढें त्याची लेखी जबानी घेतां येईल.

छो० खानबहादुर.— जमादार, आतां आजपासून रावजीवर सक्त नजर असूंद्या, व त्यास नीट समजून

सांगा कीं, बाबारे, सांगणें असेल तर खरें सांग. साहेबापुढें तुझी जबानी होणें आहे, तेव्हां खरें सांगशील तरच तुला माफी मिळेल. हो पण, त्यानें आपणास बोलाविलें आहे तिकडे आपणच जाऊन त्यास हा मजकूर कळवूं.

( सर्व रावजी हवालदाराकडे जातात. )

---

# अंक ३.

## प्रवेश ५.

रेसिडेन्सी.

**सूटर. रावसाहेब, खानबहादुर, छो० खानबहादुर.**

**रावसाहेब.**— साहेब, आह्मीं आपणांस पूर्वीं जाहीर केलेंच होतें कीं रावजी हवालदार सर्व कबूल झाला व त्याप्रमाणें त्याची जबानीही परवां झाली. आजची बातमी अशी आहे कीं, काल जमादारही मोठ्या कष्टानें कबूल झाला. आतां आपलें काम बहुधा पार पडलें.

**सूटर.**— हं ! ( खानबहादुरांस ) खरेंचकाहो खानबहादुर?

**खानबहादुर.**— हा साब; काल असें झालें खरें.

**सूटर.**— नरसूही कबूल झाला ना ?

**रावसाहेब.**— फार काय साहेब, घोडा मैदान जवळच आहे. जबानीचे वेळेस कळेल साहेबांना?

**सूटर.**— शाबास रावसाहेब, हें एक मोठेंच काम झालें; पण त्यास माफी देऊं ह्मणून सांगितलें कीं काय?

खानबहादुर.— नाहीं साब, हें त्यास तर आह्मीं निक्षून सांगितलें कीं तुला माफी मिळणार नाहीं. तुझ्या वर आह्मी खटला करूं व शिक्षा देऊं, हें देखील त्यास सांगितलें.

सूटर.— मग त्यानें कसें वरें कबूल केलें ?

छो० खानबहादुर.— नाहीं तर आमचें चातुर्य तें काय !

सूटर.— हें कसें वरें झालें ?

खानबहादुर.— काल संध्याकाळीं तो कोठीबाहेरील बागेंत बसला होता. रावजीस आह्मी त्याचे जवळ नेलें आणि त्याचेकडून सांगविलें कीं "बाबारे, मीं येथपर्यंत ( गळ्यापर्यंत ) सर्व कबूल केलें आहे. तूंही कर. सरकारास दया आली तर, ते तुजवर मेहर नजर करितील."

सूटर.— मग पुढें ?

छो० खानबहादुर.— मग साहेब.—

खानबहादुर.— ( छोटेखानबहादुरांस ) तूं उगाच बैस जरा. मग आह्मीं नरसूला योग्य समजूत देऊन सांगितलें कीं बाबारे, उगीच कशास लपवितोस? तसें करून कोठें चालणार आहे? तूं जरी नाहीं सांगितलेंस तरी खटला ह्मणजे तेवढ्यावर थांबतो असें नाहीं, तर बऱ्या बोलानें आपलें काय तें कबूल कर. उगीच मनांत ठेऊन ईश्वराचा अपराधी कां होतोस? नरसू ह्मणाला, " सरकार मायबाप आहेत, तारोत कां मारोत, माझें नशीबच फुटलें त्यास कोणाचा उपाय; करतों तर मी कबूल," असें ह्मणून त्यानें सर्व कबूल केलें. रावजीचें व त्याचें पूर्ण जमतें.

**सूटर.**— वाः, काय हुशारी ही आपली सर्वांची, वर्णन करावी तितकी थोडीच !

**रावसाहेब.**— (हंसून) ह्यांत हुशारी ती काय आमची ! हीं आमचीं नेहमींचीं कामें, जर आमचे हातून बरोबर पार पडलीं नाहींत तर मग आमचा उपयोग तो काय ?

**सूटर.**— असो, हें आपण आतां पेली साहेबांस कळवूं. ह्या शिपायाची जबानी त्यांचे समक्ष घेऊं. काल दुसरेंही या पत्र्यांतील विषाचे पुढीसंबंधी—खानबहादुर तुह्मीं मोठे शिताफीनें पुरावा मिळविला. पहा, उद्योगाअंतीं असें फळ प्राप्त होत असतें. तुह्मांस कल्पना पण खूब सुचली, व त्याप्रमाणें आपलें कामही तावडतोब झालें. बरें असो. शिपायांवर नीट डोळा असूंद्या मात्र. बहुतकरून आपणांस ह्या कामांत यश खचित येणार. आतां हा पुरावा तावडतोब कलकत्यास पेली साहेबांचे रपोटाबरोबर पाठवून मला बोलाविलें तर मीही तावडतोब जाऊन येईन.

---

## अंक ३.

### प्रवेश ६.

### रेसिडेन्सी.

**सर लुईस पेली, रिची, शिपाई, जासूद.**

**पेली.**— रिची साहेब, हा टेलिग्राम कलकत्याहून आला हा पाहिला काय?

**रिची.**— गायकवाडास गादीवरून दूर करावें व त्यांच्या मालमत्तेवर मोहोरा करून ठेवाव्या असें ह्यांत लिहिलें आहे. सगळा जाहीरनामा मागाहून येणार आहे.

**पेली.**— हो. हें काम मोठे हुशारीनें पार पाडिलें पाहिजे. उद्यां सकाळीं हा बार उडालाच पाहिजे. आपणांजवळ आतां लष्करी लोक बरेच आहेत. कांहीं हरकत नाहीं.

**रिची.**—गायकवाडास सकाळीं बोलावणें पाठवावें, व त्यास जाहीरनामा वाचून दाखवून तेथचेतेथेंच धरावें.

**पेली.**— मला वाटतें कीं, महाराज येथें आल्यावर जाहिरनामा वाचून दाखवावा, आणि त्यांस आपले हद्दींत चलावें ह्मणजे मग आपणांस काय करणें तें करूं असें सांगावें. आपण त्यांचे मागें लागलेंच जावें. व ते हद्दींत पोहोंचल्यावर त्यांचे गाडीभोंवतीं वेढा घालून त्यांस आपल्या ताब्यांत घ्यावें, आणि आपले गाडींत बसवून परत आणावें.

( इतक्यांत गायकवाडाकडून जासूद येतो. )

**शिपाई.**— महाराजांकडून निरोप घेऊन एक जासूद आला आहे.

**रिची.**— ( पेली साहेबांस ) आपण त्यास भेटत नाहीं, ह्मणून सांगावें.

**पेली.**— कां, असें कशास? आपण त्यास भेटलों तर काय हरकत आहे ? सीपाय्, जासुदास आंत बलाव.

**जासूद.**— (आंत येतो) सलाम साब, ( मुजरा करितो.)

**पेली.**— सलाम, काय निरोप आहे?

**जासूद.**— साब, हरणाचे पारधीस सालाबादप्रमाणें जाण्याची तयारी आहे. उद्यां सकाळचा बेत झाला आहे, साहेबांनीं उद्यां निघण्याचें करावें. साहेबांची व महाराजांची कोठें भेट होईल असें महाराजांनीं विचारिलें आहे.

**पेली.**— महाराजांस सलाम सांगा व कळवा कीं सांगण्यास फार दिलगिरी वाटते कीं, उद्यां मला येण्यास फावणार नाहीं, फार काम आहे. ह्याबद्दल मी निराळी चिठ्ठीही महाराजांस पाठविणार आहें.

**जासूद.**— अच्छा साब. घेतों मी रजा. (जासूद जातो)

**रिचीं.**— हो, असें करणें बरें, मग पण लागलेंच महाराजांस सविर्ड साहबाचे बंगल्यांत पोहोंचतें करूं, व भोंवतालीं गोरेलोकांचा पाहरा ठेऊं.

**पेली.**— याप्रमाणें सर्व तजवीज झाल्यावर मग एकदम शहरांत लष्करी लोक पाठवूं, आणि सर्व दंग्याधोप्याचा बंदोबस्त करूं, हाच बेत कायम. नंतर महाराजाची सर्व मालमत्ता जप्त करून त्यावर राणी सरकारचीं सिलें केलीं पाहिजेत. हें जप्तीचें काम गजानन विठ्ठल व मि. ज्याकसन यांजकडे सोंपवूं. ते ह्या कामीं फार चांगले आहेत.

**रिचीं.**— इतकें झालें ह्मणजे आणखीं काय राहिलें? गायकवाडांस ही खबर अगदी कळूं दिली नाहीं ह्मणजे हा बेत सर्व नीट पार पडेल.

**पेली.**— त्याविषयीं आपण उत्तम तजविज ठेऊं. आज रात्रीं मी गायकवाडाचे लष्करावरील कमांडर, जनरल

डिव्हायीन यास बोलावणें पाठवून त्यास लष्कराविषयीं बंदोबस्त ठेवण्यास सांगतो.

---

## अंक ३.

### प्रवेश ७.

वडोदेंशहर, विठ्ठलमंदिर.

**गजंभट, हरभट, श्रीधरभट, आबाशास्त्री, गोपाळपंत.**

**गजंभट.**– कां हरभट, अलीकड फार रोडलासा दिसतोसरे, पुख्याचा लाट कुठ बरोबर जमत णाहीं वाटत!

**हरभट.**– ( तपकिरीची डबी उघडून ) ही पाहिलीसका रामभट. ही वर्तकी नवी आणली आहे. त्या सदाशीवभटानें दिली बोवा एकदांची पुण्याहून पाठवून. घे, ही पहा तर खरी कशी आहे ती. ( चिमूट ओढतो ) वाः, वर्तकीस काय विचारावयाचें आहे. (फडक्यानें नाक शिकरून खांद्यावरील शालजोडी उडवितो ) छेः बोवा, तें कांहीं पुसूं नकोस. अतांशी भाद्रपद महिन्याची बेटी वारंवार आठवण होते. घरीं रोज बायकोला त्रास द्यावा लागतो. कंटाळते बिचारी सयपाकास.

**श्रीधरभट**– हं, हं, हं ! उगीच आपलें कांहीं तरीं बकावें ना ! (अंमळ वाकडा होऊन) अरे! विष्णवे नमः ( नाकास व कानांस हात लावितो ) तूं जर अशा

हका माराव्यास, तर मग आह्मीरे काय करावें? दामोदर नेन्याचा आश्रय! मग काय, कोठें अनुष्ठान निघालें तरी ह्यास आपलें ठेवलेलेंच, सरकारी नित्यदान, व दंपत्यदान मिळाल्याशिवाय तर दोन दिवस देखील उलटत नाहींत. वेड्या, तुझ्या उदरीं शनि आला आहे. आश्रयच तसा, मग काय!!!

**हरभट.**– भारी चघळ आहेसरे तूं श्रीधरभट. जेथें तेथें थट्टाचना आपली?

**आबाशास्त्री.**– आं! अरे थट्टाच का ही लेका! (हंसून) कशाला वेड्या तो वेद शिकलास हं हं हं!

**हरभट.**– शास्त्रीबोवा, आपणांसही असेंच वाटतें ना! बरें, राहो तें. पण कांरे गजंभट, ते सालाबादप्रमाणें सरकारी सहस्रभोजनाचे दिवस जवळ आले नाहीं बरें. आतां कधींचा बेत आहे? यंदा दक्षणाही चळचळीत आहे असें ऐकतों.

**गजंभट.**–अरे, हा आला गोपाळपंत, ह्यास ठाऊक असल. कांरे गोपाळपंत, आतां कधीं देता एकदा सरकारी सहस्रभोजणाचा धडाका उडवूनशान. माझ्याकडील यादींत पंणास भिक्षुकांचीं णांवं आहेत बर का, ध्याणांत ठिवा. (त्याच्या कानाशीं लागतो) अर्ध्या दक्षनेपैकीं एकचतुर्थांश तुझा अन् बाकीचा आपला माझा. तें आपल सालाबादप्रमाण आहेचणा.

**गोपाळपंत.**– अहो, कसलें घेऊन बसलां अहांत सहस्रभोजन! भिक्षुकांस आपले लाडू आणि दक्षणा, दुसरी गोष्ट नाहीं. गांवांत काय बोभाटा झाला आहे. सर्वांचे तोंडचें पाणी पळालें आहे.

**आबाशास्त्री.**— कायरे काय! गोपाळपंत, कसला बोभाटा झाला आहे? शांतं पापं!

**गोपाळपंत.**— अहो, त्या विषाच्या प्रकरणाबद्दल. तें पुन्हा माजविलें आहे त्या नव्या साहेबानें, खुद्दांवर.—

**हरभट.**— कायरे काय ह्मणतोस तरीं काय तूं? हर हर!

**आबाशास्त्री.**— अरे गोपाळपंत, महाराजांवर कांहीं अनिष्ट प्रसंग गुदरतो आहे?

**गोपाळपंत.**— (सुस्कारा टाकून) कापांत काय कडेकोट तयारी होऊन राहिली आहे. गोरें लष्कर तर येऊन थडकलें आहे. तोफखाना तयारच आहे. भाऊसाहेबांच्या मंडळीकडून तर बातमी येथपर्यंत आहे कीं उद्यां सकाळींच महाराजांस धरून कापांत ठेवणार. तो नानासाहेबांनीं जासूद पाठविला होता तो सांगत होता कीं, साहेब उद्यां शिकारीस येत नाहींत, त्यांस काम आहे. ह्मणतात कलकत्त्याहून लाट साहेबांकडून ह्या प्रकरणीं तार आली आहे, परंतु दुसरी आणखी तार येणार आहे ती आली कीं हें काम लागलेंच ताबडतोब होणार.

**गजंभट.**—हे ह्मनतात काय कीं विष महाराजांणीं घातल. छीः, अस होण णाहीं.

**गोपाळपंत.**— ह्मणतात कीं रेसिडेन्सीमधील शिपायांनीं महाराजांचें नांव घेतलें.

**आबाशास्त्री.**— आणि त्या नीच जनांचे वचनांवर महाराजांस असा हा असह्य प्रसंग प्राप्त होणार! छेः, असें हें घोर कर्म आपले महाराजांचे हातून घडणें नाहीं. परवां स्वामीचे कर्णीं ही वार्ता गेली त-

त्समयीं त्यानीं अत्यंत दुःख दर्शविलें, आणि स्वारी स्वतः हें कृत्य करण्याचें मनांत आणील! तथापि, पूर्ण न्यायास अनुसरणारें इंग्रेज सरकार एतद्विषयीं पूर्ण निर्णय केल्याशिवाय ह्या शिपायांचे जल्पनांवर विश्वास ठेवून, आपल्या अन्नदात्यावर हा असा प्रसंग किमपि आणणार नाहींत. अतएव ही वार्ता सर्व मिथ्या हेंच सत्य.

**गोपाळपंत.**—नाहीं हो शास्त्रीबोवा, उद्यां तर असा प्रकार खचीत होणार. मग पुढें कांहीं होणें असेल तें होवो.

**हरभट.**— आह्मीं भविष्यच केलें होतें कीं आतां ह्या पारशाचा व सुधारल्यांचा राज्यांत पाय शिरला, आतां गायकवाडी लौकर बुडणार. असा प्रसंग आल्यावर आतां ते पारशीब्रिरशी सर्व काळें तोंड करून गेले. त्यांचीच ही कांहीं महाराजांस धरण्याविषयीं आंतून खटपट असावी. काय बेटी गायकवाडी! आजपर्यंत होती कीं नाहीं; पण असें कां कोठें झालें होतें ?

**आबाशास्त्री.**— कायरे हें असें अप्रयोजकासमान जल्पन! त्यांनीं रे काय केलें ? हर हर ! हजारांवर अरिष्टें यावीं पण त्यांचें पालन कर्त्यावर कधीं येऊं नयेत. एकूण शेवटीं असा प्रसंग प्राप्त होणार अं !

**श्रीधरभट.**— सरकार ह्मणजे केवळ प्रत्यक्ष धर्ममूर्तिच. ह्या पुरुषानें आजपर्यंत किती तरी धर्म केला बरें? सहस्रभोजनें तर घातलीं. गायकवाडींत कोणी आजपर्यंत मोहोर ह्मणजे दिली नव्हती, ती ह्यानें दिली. ब्राह्मणांस पितांबर व सुवासिनींस शालू तर

वांटले. एक कां दोन ह्मणून ह्यांचीं धर्मकृत्यें सांगावीं!

**गोपाळपंत.**— राम राम ! कोण हा प्रसंग महाराजांवर येणार ! आतां हे पदरचे नवग्रह भारीच उपयोगास पडणार आहेत. हव्या तशा खाविंदांच्या जिवावर ह्यांनीं उड्या मारल्या. कोणी विचारता ना पुसता. सुखाला सर्व, पण आतां प्रसंगीं सर्व दूर होणार!

**श्रीधरभट.**— आपण ह्मणतां हेंच खरें. काय हें वडोद्याचें नशीब!

**गजंभट.**— प्रभु महाराजांवर कृपा करनार समर्थ आहे. असा हा महाराजांवर प्रसंग गुदरला तर कडक उपवास करून अणुष्ठाणे करावयाचीं, अभिषेक करावयाचे, सांबाचीं देवाळयें पान्याणे भरून काढावयाचीं असा परमेश्वरावर भार घातल्याखेरीज तो पावतो कीं काय? मी तर बोवा हा निश्चय केला आहे.

**श्रीधरभट, हरभट.**— आह्मींही तयार आहोंत.

**आबाशास्त्री.**— उत्तम, हें तर अवश्यमेव झालेंच पाहिजे. सर्वारिष्टशमनार्थ हें उक्तच आहे.

---

# अंक ४.

## प्रवेश १.

स्थळ.

**राजवाडा, रंगमहाल.**

पात्रें.

**मल्हाररावमहाराज, लक्ष्मीबाई व गजाऊ दासी.**

**गजाऊ.**— बाईसाव, आज ह्ये अस का वर. कायिवि

च्यालत न्हाई, चालत न्हाई. आपल्या उदास वा-
नि वसल्याती. बया! आजचा परकार समदा
येगळा दिसतोइ!

**लक्ष्मीबाई.**— नाहींग. उगाच आपली वसलें आहे वि-
चार करीत. (आपणाशींच) आज वाई कां वरं
इत्का उशिर.

**गजाऊ.**—आतां तर बया शरत झाली आपल्या पुड. अव
पन त्येचा इचार इचार म्हुन किती तरी करावा?
येत्याल आतां म्हाराज. न्हायि येक दोनदि आले
म्हुन काय. आमचं हयत का नाई घरधनी. म्हुन
आमी नाय बया वाट वगत त्येची साराइळ.
कव्हान्नी येत्यात, कव्हात्रि जात्यात.

**लक्ष्मीबाई.**— अग तुमचें काय घेऊन वसलीस. तुमची
गोष्ट निराळी पडली. आज सगळ्या दिवसांत
स्वारी आली नाहीं म्हणून मला कसें चुकल्याचु-
कल्यासारखें झालें आहे. करमतच नाहीं वाइ
कस तें. अग, पण असें कधीं होत नसतें. मेले
विचार तरीं कसे, भलते भलतेच मनांत येतात.
वाटतें कीं, मजवर का रागावण झालें असेल, का
त्या वया साहेबांनीं कांहीं कान फुंकले असतील,
का माझ्या हातून कांहीं अपराध झाला असेल!
पण नाहीं. असा कांहीं प्रकार व्हावयाचाच नाहीं.
मग कां वरं इतका उशिर आज येण्यास गजाऊ?

**गजाऊ.**— येत्याल सरकार आतां, त्येचा इत्का घ्यार कशा-
ला बया, पन खर वाइसात्र, एक ग्वाट न्हायली
च्वालायची. अव आताशी शेरामंदी लै लै ग्वांधळ

चाललाय वगा. त्यो कोनी नवा सायब आलाय्, अन त्ये दुसर आमच्या जातीच काळ डगलवाल आल्याती कनी, त्येनी लै उच्छाद मांडलाय सरकार. आज ह्येला धर घाल खाड्यांत; उद्या त्येला, न्हे कापामंदी, अस चालवलय्, अन त्येनी (हनवटीला हात लावून) बया, त्या यशवंतरावाला, अन् सालमाला न्येल कीं काल कापामंदी धरून. आमच घरधनी हंगत व्हत्ये, की त्या दोगासनी ठ्येवलइ पाऱ्यामंदी.

लक्ष्मीबाई.— काय ह्मणतेस, यशवंतरावास व सालमास कापांत पहाऱ्यांत ठेवले आहेत! ते काय ह्मणून?

गजाऊ.— अन कापामंदी लै ग्वार लोक लोटल्याती, त्वाफा आल्याती, आन् सैन आलंइ, अस मुकिदा मंगा सागत व्हता. कापामंदी जिकड तिकड तंबू ख्वून पांडरफक करून दिल हाये. बाइसाब, ह्येचा काय बरं अरोथ असावा? माज तर सरकार काळिजच थरारून रायलय.

लक्ष्मीबाई.— मेली बडबडते आहे काय ही! खरेंच काग असें ऐकिलेंस?

गजाऊ.— बया, मला ख्वाट सांगून काय परापी महाराज.

लक्ष्मीबाई.—ह्याचें तर मग काय बरें कारण असावें? कशाकरितां बरें ह्या इतक्या तयाऱ्या? आजपर्यंत बाई असें कधीं झालेलें ऐकिलें नव्हतें.

गजाऊ.— बाइसाब, कुनीकाइ, कुनी काइ हंगत्यात. ह्ये सर्व ग्वार ल्वाक दुसर कुनिकड जान्याच्या तयारीमंदि हयेत अस कुनि हंगत्यात, कुनी (गहिवरून)

आइ बेचरावाइ! आमच म्हाराज देवान राज्यामंदी सुकी ठेवाव म्हंजी झाल. (कानशिलावर बोटें मोडते)

लक्ष्मीबाई.—( घाबरते ) असें अरधेंच काय बोलतेस गजे? हर हर! ह्याचा काय खरें अर्थ असावा? ( मनांत) मीही आज पण फार दिवस वेड्या विदऱ्या बातम्या ऐकतें. खचीत कांहीं तरी येथें अधिक उणें असावें ( मोठ्यानें ) देवा, आमचा सर्वांचा साह्यकारी तूंच आहेस! रक्षण करणार समर्थ आहेस! पण गडे, आज अजून कां वरं येणं होत नाहीं? तूं तरी जा आणि कोठें स्वारी आहे ह्याचा शोध करून येण्याचें झालें ह्मणजे मला कळीव.

( गजाऊ जाते ).

लक्ष्मीबाई.— ( आपणाशींच ) कांहीं मेलं सुचत नाहीं. असें नव्हतें बाई मला कधीं झालें ( कपाळास हात लावून पलंगावर विचार करीत पडते. ) देवा, काय ह्या नेहेमीं काळज्या! एक दिवस तरी सुखाचा! दुसऱ्या बायका ह्मणत असतील कीं, "ही लक्ष्मी बाई मोठी नशीबवान. पहा राज्याची धनीन आहे. पोटीं पुत्रसंतान आहे. सर्व कांहीं हिचें चांगलें आहे." पण बाई ज्याच्या त्याच्या प्रमाणें त्याला काळज्या आहेतच. आह्मांस कां बरें ह्या काळज्या असाव्या! देवा!! काय तुझे आह्मी अपराध केले आहेत! पण पुनःपुन्हा मनांत येतें कीं, ह्या ह्यांच्या तयाऱ्या व बंदोवस्त कशाकरितां चालले असतील? ह्यांच्यानें का आ-

ह्यांस सुखांत पहावत नाहीं ! असो. कळेल आतां स्वारी आल्यावर. ( डोळा लागतो )

( लक्ष्मीबाईस स्वप्न पडतें.)

मल्हारराव महाराज येतात.

**महाराज.**— ( पलंगाजवळ जाऊन ) अरे! कोण ही झोंप. वस्ताद बोवा झोपाळू. केव्हांही पहा. ( मुखा-जवळ मुख नेतात ) महाराज.—

**लक्ष्मीबाई.**— ( इचकून जागी होते व महाराजाचे गळ्यास मिठी मारते ) देवा ! एकूण असा प्रसंग येणार ना ! तुझे मोठे आभारी आहोंत आह्मीं. बरें तूं लवकरच जागें केलेंस !

**महाराज.**—(आश्चर्यानें) आज हें काय पण! मोठा चमत्कार आहे. सखे, कां बरें आज ही इतकी झोंपेनें घेरली आहे तुला? काय हें वरळणें ! नेहमींचा तर असा परिपाठ नाहीं. रोज मजकरितां महालामध्यें मार्गप्रतीक्षा करीत बसतेस. मी लौकर आलों नाहीं तर दासीचे हातीं वारंवार निरोप पाठवितेस. येथें आलों ह्मणजे मोठे प्रेमानें मनजवळ बसतेस व नानाप्रकारच्या सुखदु:खाच्या गोष्टीनीं माझें मन रिझवून टाकितेस. येथें असलों ह्मणजे मी स्वर्गसुखांतच आहें कीं काय असें मला वाटतें. पण आजचा प्रकार पहातों तो कांहीं वेगळाच. कोण ही आज झोंप, (पोटाशीं धरून ) आज जागी केल्याबरोबर कां बरें ही माझे गळ्यास घट्ट मिठी आणि हें असें बोलणें?

माझे लाडके, सांग सांग काय असेल तें मला. अरे, ही अजून झोंपच! ( हनवटी वर उचलून ) सखे, पाहिलेंस का पण हें येथें कोण आलें आहे तें ?

लक्ष्मीबाई.—महाराज, काय मी सांगूं! देवा, संभाळणार तूंच आहेस. पण अतां नाहींग बाई मी माझे जवळून हलूं द्यायची ( महाराजांस ) पायांजवळ माझें एक मागणें आहे, एक सांगावयाचें आहे.

महाराज.—सांग, सांग; निःशंक सांग. हा मी ऐकण्यास तयार आहें. खचीत तूं सांगशील त्याप्रमाणें ऐकेन. पण आहे तरीं काय प्रिये?

लक्ष्मीबाई.— आज देवच आपला साह्यकारी झाला असें ह्मटलें पाहिजे. त्यानेंच आपणांस जागें केलें आहे. आज मी रोजचेप्रमाणें वाट पहात बसलें होतें. पण फारवेळ येणें झालें नाहीं. माझें मन आज एक दोन दिवस उदास झालें होतें. कांहीं केल्यानें आज करमेनासें झालें. मनांत नानाप्रकारचे विचार येऊं लागले. उगीच पलंगावर पडलें होतें तों कोठे डोळा लागला मात्र, आणि झाला स्वप्नास आरंभ.

महाराज.— हात्तेचा, येवढेंच कीं नाहीं. मीं ह्मटलें, काय सांगते आहे कोण जाणें. ( मनांत ) काय बरें हिला स्वप्न पडलें असेल ( मोठ्यानें ) हं; सांगा काय स्वप्न पडलें तें.

लक्ष्मीबाई.— थट्टा वाटते; पण बाई ज्याचें त्यासच ठाऊक. असें विलक्षण स्वप्न नवतें कध्धीं पडलें मला. स्वप्नांत पाहिलें कीं, कोणी एक अक्राळ विक्राळ पुरुष मज-

पुढें आला आहे. त्यानें अंगास राख फांसली आहे. डोक्यावर मोठा जटाभार आहे, येका हातांत तरवार व दुसरे हतांत सर्पाचा कोरडा घेतला आहे, वाघावर बसला आहे व गळ्यांत रुद्राक्षाच्या माळा घातल्या आहेत. कोणग बाई त्याचें तें स्वरूप. (भिते व महाराजांच्या गळ्यास घट्ट मिठी मारिते.)

**महाराज.**— अग, तूं वेडीबिडी तर नाहींना झालीस? फार भितरी बोबा ही! अशीं स्वप्नें पडतच असतात. मग त्याचें इतकें मनांत—

**लक्ष्मीबाई.**— तें काळासारखें स्वरूप पाहून माझी बाई गाळणच झाली. मी मोठ्यानें ओरडूं लागलें; पण माझे तोंडांतून शब्दच उमटेना. मला ते ह्मणाले "बेटा, भिऊं नकोस. मी सांगतों येवढें मात्र ध्यानांत ठेव. उद्यां (नांव घेऊन सांगितलें कीं) मोठें विघ्न येणार आहे. फार जपून असावें, घरांतून अगदीं बाहेर पडूं नये. मग जें होणें असेल तें होवो." असें जवळ सांग ह्मणून सांगितलें. इतके शब्द बोलले मात्र, आणि तेथचे तेथेंच नाहींसे झाले. इतक्यांत येणें झालें तेव्हां मला जागी केली. नशीबवान आह्मी, ह्मणूनच हें असें दर्शन झालें. देवा, सांभाळ करणार तूंच आहेस! काय ग बाई तें स्वरूप, जसें डोळ्यांपुढें दिसतें आहे.

**महाराज.**—(मनांत) स्वप्न तर चमत्कारिक खरेंच (घाबरतात) आज अशा प्रकारचीं वाईट वाईट स्वप्नें फार दिवस पडताहेत. परवां मला अशांतलेंच एक पडलें, आज हिला पडलें. काय बरें ह्याचा

अर्थ असावा राम जाणे ! ( आपल्याशींच ) पण आतां ह्यावेळेस हिचें तर समाधानच केलें पाहिजे. ( उघड ) अहाग भित्रा बाई! अशीं तर स्वप्नें नेहमीं सर्वांस पडतात. स्वप्नांस जर इतकी भितेस तर पुढें तुझी गत तरी काय?

**लक्ष्मीबाई.**— कांहींही ह्मणावें; पण ह्या स्वप्नामध्यें कांहीं तरी अर्थ आहे खचीत. उद्यां मजजवळून मी खचीत नाहीं हलूं देणार. मग कसेंही असो.

**महाराज.**— मग शहाणीच मोठी ! अशा स्वप्नांस भिऊन जर आह्मी बायकांसारखे घरांत लपून बसूं लागलों तर मग काय ! फारच चांगले राजे आह्मीं. अशीं स्वप्नें रोज पडणार आह्मांस, ह्मणून का त्यांना भिऊन आह्मीं आपला राज्यकारभार सोडून घरांत बसावें कीं काय ?

**लक्ष्मीबाई.**— नाहीं पण गडे, माझें येवढें उद्यांचे दिवस ऐकिलेंच पाहिजे. तशांत आणखी गांवांत काय चाललें आहे तें कानावर आलेंच असेल. आज ह्याला धर, उद्यां त्याला धर. गोऱ्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी कापांत लोटतातच आहेत. घोडेस्वार व तोफखाना येऊन थडकलाच आहे. काय बरें ह्याचा अर्थ असावा ? खचीत खचीत कांहीं तरी धोका आहे. मी ही कुणकुण आज दोन तीन दिवस ऐकतें आहें, तेंव्हांपासून मला कांहीं सुचेनासें झालें आहे. मोठी काळजी लागली आहे. ही दासी चरणांजवळ विनवीत आहे. फार जपून असाव इतकेंच माझें ह्मणणें. ( सुस्कारा टाकिते )

**महाराज.**– ( सुस्कारा टाकून मनांत ) ही ह्मणते हें खरें असेल काय ? पण हिचें ह्मणणें खरें वाटतें. असा मजवर गहजब करण्याचा प्रकार कांहीं ह्यांच्या मनांत असेल काय ? पण कां बरें असावा ! असें करण्याचा काय हेतु ? तरी पण भ्यावें कां ? (मोठ्यानें ) येईना लष्कर आलें तर. तें तिकडे दूर जाण्याकरितां आलें आहे. उगीच येथें विश्रांतीस ह्मणून दोन दिवस राहिलें आहे. अग, तूं ह्मणतेस असें कधीं होणें नाहीं. ते असें करणार नाहींत. वेडीग वेडी ! मी ह्मणत होतों कीं, एवढ्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगत असतेस तेव्हां कांहीं तरी शहाणी असशील.

**लक्ष्मीबाई.**– कसेंही माझें समाधान करावें, पण मला तर वाई गोष्ट विपरीत वाटते. ऐकायचेंच होतें तेवढें माझें वेडीचें. एक दिवसानें काय मोठा राज्यकारभार थकतो असें नाहीं.

**महाराज.**– पण तुझा तरी कां बरें इतका आग्रह. दुसरें कांहीं सांगितलेंस तर ऐकेन, पण एक दिवस भागुबाईसारखें घरांत लपून बसा, ह्मणून कोणीं ह्मणूं लागलें तर कधीं ऐकणार नाहीं. मी तर उद्यां सकाळीं उठल्याबरोबर मुद्दाम साहेबांस भेटावयास कापांत जाणार; पण हो, उद्यां गुरुवार ना, उद्यां तर गेलेंच पाहिजे.

**लक्ष्मीबाई.**–(दुःखानें ) मी हात जोडितें, पदर पसरितें, मी ह्मणजे हट्टानें असें ह्मणतें असें नाहीं. एवढें माझें ऐकावेंच. असें न झालें असतां मोठा

अनर्थ गुदरणार आहे. ही आमची आपली बायकी बुद्धि, पण वेळेस तीही उपयोगी पडते. याउप्पर मर्जी. आमची का सक्ती आहे. पण उगीच वाईट वाटतें ह्मणून सांगावें झालें.

**महाराज.**—कधीं नाहीं ही गोष्ट ऐकणार, मग काय होणें असेल तें होवो. पण छेः, अशी गोष्टच मनांत आणावयास नको. त्यांचा न्याय काय! दया किती! उगीच ही सांगते झालें कांहीं तरी. कधीं त्यांचे हातून अशी गोष्ट होणें नाहीं. माझी पक्की खातरी आहे.

**लक्ष्मीबाई.**—मग नाहींचना एकून आमचें ह्मणणें पसंत पडत ? असो, आतां परमेश्वर सहायकर्ता समर्थ आहे. देवा—जेजूरीच्या खंडेरावा—अंबाबाई—डाकुरनाथा, आमचें संरक्षण करणार तुह्मींच आहांत. संकटाचें निवारण होवो व सर्व विघ्नें नाहींशीं होवोत. जोड्यानें तुमच्या दर्शनास येऊं, सहस्र भोजनें घालूं, दानधर्म करूं, सर्व भार तुमच्यावर आहे.

सर्व जातात.

---

# अंक ४.

## प्रवेश २.

स्थळ.

राजवाडा.

**मल्हारराव महाराज, नानासाहेब खानविलकर, हरीबादादा, बळवंतराव देव, गोविंदरावमामा, बापूभाई व जासूद.**

(सर्व मंडळी दुःखित व चिंताक्रांत अशी खालीं तोंडें घालून उभी रहाते, महाराज येतात.)

**महाराज.**—(सर्वांचे तोंडांकडे पाहून) अरे! आज काय चमत्कार! जिकडे पाहवें तिकडे हाच प्रकार! दिवाणजी, हरीबा, देव, मामा, भाईसाहेब, हें आहे तरी काय, खालीं माना काय घातल्या आहेत, सर्वांचीं तोंडें कशीं उतरून गेलीं आहेत. डोळ्यांतून पाणी काढतां, ह्याचा अर्थ काय? सांगाकिहो दिवाणजी!

**बळवंतराव.**—(खिन्न होऊन) प्रभो, शेवटीं असा प्रसंग गुदरणार ना, धिक्कार असो आह्मास! काय आमचा उपयोग! खायाला मात्र काळ! सरकार आतां येथें काय तरीं बोलावें आह्मी अभाग्यानीं!

**महाराज.**—खचीत कांहींतरी कमजास्त आहे. हर हर! काय ही माझी स्थिति! मामा सांगाकिहो काय असेल तें?

**मामा.**—कोणच्या तोंडानें बोलावें आह्मीं महाराज. गांवांत जिकडे तिकडे दाट बातमी आहे कीं महाराजां-

वर आज मोठा प्रसंग गुदरणार. (डोळ्यांतून पाणी काढितात.)

**महाराज.**— ( आश्चर्यानें ) काय ह्मणतां? मजवर, मजवर प्रसंग गुदरणार? कां तो? मी कोणाचें काय घोडें मारिलें आहे! दिवाणजी, मजवर कांहीं येणार आहे?

**नानासाहेब.**— महाराज, जिकडे तिकडे कडेकोट तयारी आहे, कालपासून गोरे लष्कराच्या आगगाड्यांवर आगगाड्या भरून येत आहेत, तोफखाना व तुरूप येऊन थडकला आहे, शिकारीस येण्यास बनत नाहीं ह्मणून साहेबांची रात्रींच चिठ्ठी आली आहे. सारांश प्रसंग भयंकर आहे.

**महाराज.**— तर मग ह्यांचा काय बरें विचार असावा! ( मनांत ) पण खचीत ह्यांत कांहीं तरी आहे. मला आज फार दिवस एकावर एक अपशकुन होत आहेत. पण ह्यांना असें करण्यास काय बरें कारण असावें! काय मी ह्यांचा असा अन्याय केला आहे? (कपाळास हात लावतात) च्छे:, कधीं नाहीं असें ह्यांचे हातून होणार.

**बापुभाई.**— त्या विषप्रयोगासंबंधी भारी गडबड चालली आहे. अशी बातमी आहे कीं काल रात्रीं कलकत्याहून अखेर हुकूम आला आहे, त्यांत महाराजांस (स्फुंदून) हाय हाय, देवा! मोठा आह्मांवर हा गहजब गुदरणार आहे!

**महाराज.**— (चकित होऊन) मला हे धरून नेणार! कां बरें, मी विष घातलें असें हे ह्मणतात? कोणाची मगदुर आहे असें ह्मणण्याची? मला हे कैद क-

रणार, हो तर दुसरा काय अखेरचा हुकूम असणार आहे. जगांतून सर्व न्याय नाहींसाच झाला काय! हतभाग्य मी! पण असें होईल कसें? ह्या प्रकरणीं ते मला विचारतील तेव्हां मी जबाब देण्यास खंबीर बसलों आहें. मी देवास स्मरून त्यांचें पूर्ण समाधान करण्यास समर्थ आहें. एकदम विचारपूस केल्याशिवाय हे असें करतील असें तुह्मांस वाटतें! देवा, काय हा प्रसंग! मी ह्यानां इतकाही भिऊनवागत असतां हे मजवर असा प्रसंग आणतील! मग त्यापेक्षां मरण बरें. ( कपाळावर हात मारून) फुटलें माझें प्रारब्ध! त्या बिचाऱ्या मंडळीसही मी ह्या वेळेस दूर केलें ( मनांत) आतां ही पदरची मंडळी काय ह्या प्रसंगीं उपयोगी पडणार हें दिसतेंच आहे! हिच्या नादीं लागून पूर्ण फसलों!

हरीबा.–(धैर्यानें) सरकार, पन का म्हुन भ्याव आपुन? च्याख स्वान्यास इस्तवातंत्रि फ्येकल म्हुन काय व्हनार हये त्येला. अन अब ह्ये काय करत्याति. त्ये काम लयि विचाराच हये. अन काय नानासाब, मामा, दोब, तुमिबी रडूरडू करता? अब कायि धैर धरा, नाहीं तर थुः तिच्या, काय आपल जिन. अस तुमीबि समद पाय गाळू लागलाती तर व्हइल कस पुढ? निबाव तरि कसा लागनार? काय ह्मनाव तरि तुमास्नी!

बळवंतराव.–काय हे आह्मी कामाचे. चंदनाचे झाडाखालीं उभें राहून त्याचा सुगंध मात्र घेण्यास तयार, पण

जर कोणी तें तोडून नेऊं लागला तर मात्र आमचे हातून कांहीं होणें नाहीं! धिक्कार असो आमचे जिण्यास! (डोळे पुसतात) आमचा उत्कर्ष त्यांना सहन होणार नाहीं, व कधीं तरी कांहीं कमजास्त होणार अशीं स्वप्नें पडतच होतीं!

**महाराज.**—(धैर्यानें) मग आतां भिऊन काय, जें होईल तें होवो; पण माझें तुह्मा सर्वांस एकच सांगणें आहे कीं, मला ह्मणून ह्या कामीं काडीची भीति नाहीं; कारण ह्या विषप्रयोगाच्या कामांत माझा अगदीं संबंध नाहीं. करोत ते हवें तसें माझें. नाइलाज आहे. प्रसंगास पाठ दिलीच पाहिजे. वेळ खचीत मोठी आणिबाणीची येणार आहे; पण मी परिणामास भीत नाहीं. ते साधारण सार्वभौम आहेत. त्यांची कडेकोट तयारी कशी आहे ती दिसतेच आहे. परंतु माझी खातरी आहे कीं माझ्या कामांत ते खचीत अन्याय करणार नाहींत. माझ्यावर त्यांनीं असा प्रसंग आणावयाचें मनांत आणूं नये, पण आणणार खरा असें दिसतें, आतां त्यास काय इलाज आहे? याउपर माझें कसेंही होवो, पण माझी इच्छा आहे कीं माझे प्रजेचे केसास धक्का न लागावा. तर आतां तसें कांहीं न होऊं देणें हें तुह्मांकडे आहे. तुह्मी सर्व जाणतच अहांत. मी सांगावें असें नाहीं.

(सर्व दुःखित होत्साते खालीं पहातात)

**मामा व बापुभाई.**— महाराज, आमची एक चरणांपाशीं विनंती आहे. सरकारांनीं आजचा कापांत जा-

ण्याचा बेत रहित करावा. मग पुढें काय होणें असेल तें होईल. एवढें तरीं ऐकावें महाराजानीं आमचें.

**महाराज.**— ( मनांत ) माझी प्राणप्रियाही काल असेंच ह्मणत होती. आणि आज ही मंडळीही असेंच ह्मणते आहे. आतां येथें करावें तरी काय? ह्या सर्वांचे ह्मणण्याप्रमाणें करावें झालें. (विचार करून) पण कां असें करावें? काय होणें जाणें असेल तें तेथें-च होवो. पण ही मंडळी कां बरें मला असें सां-गते ! ह्यांनां असें वाटत असेल काय, कीं मला त्यानीं रयतेचे डोळ्यांदेखत धरून न्यावें व माझी अप्रतिष्ठा व्हावी. नाहीं, हा ह्यांचा हेतु नसेल. ( मोठ्यानें ) नाहीं, नाहीं; हें तुमचें ह्मणणें मा-झ्या युक्तीस येत नाहीं. मला कापांत तर गेलेंच पाहिजे. होणें जाणें चुकत नाहीं. मला त्याची कांडी मात्र भीति नाहीं. पेली साहेबांवर माझा पूर्ण भरंवसा आहे. ते गैरशिस्त कधीं करणार नाहींत. कोण आहेरे तेथें? आणा माझें अंगरखा-पागोटें. चला चला, आटपा ह्मणावें लौकर, गाडी-ची वरदी द्या.

**जासूद.**— जी सरकार——

**नानासाहेब.**— महाराज, आह्मी तरी येतों बरोबर, आज्ञा व्हावी.

**महाराज.**— कशाला येतां तुह्मीं! तुमचें येण्याचें कारण नाहीं. (दुःखानें ) माझ्या हालअपेष्टा व बेअब्रू पहाण्यासच कीं नाहीं? (डोळे पुसतात) बरें, चला,

तुमच्या मनासारखें होऊंद्या. चला मामा, माईसाहेब तुम्हीही चला. व्हा तयार.

[नानासाहेब, बापुभाई व मामा जातात व खालीं उभे रहातात.]

( **महाराज** खिन्नवदन होत्साते गाडी येण्याची वाट पाहात खिडकींत उभे राहातात—इतक्यांत एक फकीर रस्त्यांतून सव्वाल घालींत फिरतो, त्याकडे महाराजांचें लक्ष जातें )

**फकीर.**—( सव्वाल )—

दोस्तके दुश्मन् हुवे, तो कर खुदाकू याद तूं।
चल् उसीके राहसे, फेर देख उसीके राह तूं।
दिल न दीजे ना कदरकूं, जानले सबकी कदर।
चाहना उसकों, के जिसकों चाहनेकी है कदर।
दाम उदर दो बातके, बंदे है बेहोष।
उनको जो दिल देवेगा, वो पावेगा अफसोस्।

**महाराज.**—अहाहा! काय हे सव्वाल! ह्या यःकश्चित् फकीरानें देखील मला शहाणपण शिकवावें ना! सायीं, फार उशीरां माझे कान उघडलेत! आतां ह्यानीं एक उशीरां उघडले, पण इतर माझे हितचिंतक तर आजपर्यंत उघडीतच होते कीं नाहीं! कोठें मी हतभाग्यानें त्यांचें ऐकलें! हर हर, देवा! आतां माझी काय गत होणार! काय आम्हीं बाव्हल्यांतील राजे! प्रसंगाशिवाय डोळे उघडत नाहींत. काय आमची अवस्था! काय आमचे पूर्वजांचा महिमा! त्यांनीं तरवारीचे बळावर राज्यें मिळवावीं; आह्मी तीं सुधारावयाची देखील गो-

ष्ट एकीकडे ठेवून, धुळीस मिळवावीं! थूः आमचे जिनगानीवर! नानाप्रकारचे लुच्चे व आपमतलबी लोकांचे नादीं आह्मी लागावें. त्यांचे बरोबर हलकटापेक्षां हलकट, नीचापेक्षां नीच व्हावें. इतकेंही असून घाणेरडीं कामें करावीं त्यानीं, आणि डंका जिकडे तिकडे आमचे नांवाचा! अशापैकींच हें एक अरिष्ट नसेल ह्मणून कशावरून! काय मनुष्याची चमत्कारिक स्थिति आहे बरें! मीच पहाना, ह्या घटकेस राजा आहे, सर्व अख्त्यार आहे. आणि घटकेनें काय प्रसंग गुदरणार कोण जाणे. हे पदरचे लोक तोंडापुरते मात्र, मागें मतलबाकरितां हवें तें करतील. अशी आतां खातरी होते. पण आतां काय उपयोग! चला, आतां देवावर हवाला ठेवून, वारा येईल तशी पाठ दिली पाहिजे. सर्व व्यर्थ आहे!

( इतक्यांत गाडी येते )

**महाराज.**—(खालीं येतात) चला दिवाणजी, (सर्व गाडींत बसतात. )

(लहरीपूल दरवाज्याजवळ गाडी येते तों गाडींत कोणी पत्र टाकून नाहींसा होतो. )

**मामा.**—( पत्र उघडतात व वाचतात ) "महाराज, आज एक महान् प्रसंग गुदरणार आहे. दिवस मोठा कठीण आहे. कापांत जाण्याचा बेत राहित करावा. ह्याउपर जपून रहावें. परमेश्वर संरक्षण करणार समर्थ आहे. गायकवाडाचें पिढ्यानपिढ्या अन्न खाणारा."

एक.

# अंक ४.

## प्रवेश ३.

स्थळ, रेसिडेन्सी.

पात्रें.

**(मल्हारराव महाराज, सर ल्युइस पेली, कर्नल जेकब, रिची, नाना साहेब खानविलकर, गोविंदराव मामा, बापुभाई व इतर मंडळी,)**

(**महाराज** येतात. **सर ल्युईस पेली, रिचि** वगैरे सर्व मंडळी उभी रहाते. **पेली साहेब** दोन पावलें पुढें येतात व महाराजांचा हात धरून सलाम करितात व त्यांस एके कोंचावर बसवितात.)

**स० पेली.**—महाराजांची प्रकृति बरी आहेना ?

**महाराज.**—हां साहेब, आपले कृपेंकरून. साहेबांची तब्बेत बरी आहेना?

**स० पेली.**—आच्छी आहे. (एकीकडे) महाराजांस एक गोष्ट विदित करणें आहे.

**महाराज.**— हँ करावी. मी ऐकण्यास तयार आहें.

**स० पेली.**—कलकत्त्याहून हुकूम आला आहे कीं महाराज गायकवाड यांस तूर्त गादीवरून दूर करून सर्व राज्यावर जप्ती ठेवावी, व गायकवाडी मालमत्तेवर मोहोरा करून ठेवाव्या. तेव्हां महाराजांचा कसा काय विचार आहे? आह्मांस तर हुकुमाप्रमाणें केलें पाहिजे.

**महाराज.**—असें होण्यास कारण? माझे हातून असा काय सरकारचा गुन्हा झाला आहे? (दुःखानें) एकदम

मला राज्यावरून दूर करावा असा हुकूम आला आहे?

**स० पेली.**—मी महाराजांस जाहिरनामा वाचून दाखवितों ह्मणजे सर्व कळेल. (वाचतात व महाराजांस समजावून सांगतात).

**महाराज.**—(आश्चर्यानें) साहेब, माझे हातून असा अपराध होईल? आपणास मी निक्षून सांगतों कीं, गोविंदराव गायकवाडाचे कुलांत अशी गोष्ट स्वप्नीं देखील आणावयास नको. हर हर! खचीत खचीत अशी गोष्ट माझे हातून झाली नाहीं. मी निरपराधी आहें. ह्यापैकीं मला कांहीं एक माहीत नाहीं. सरकार समर्थ आहे!

**स० पेली.**—महाराज, आपणांस काळजी करणें नको. सरकारचा ह्या विषप्रयोगाचे कामांत महाराजांवर वहीम आहे. ह्या कामांत उत्तम प्रकारची चौकशी होईल. आपण गादीवरून दूर रहाल तोंपर्यंत, राज्याची सर्व व्यवस्था सरकारानें आपल्याकडे घेऊन मजवर सोंपिली आहे. गायकवाडीचें राज्य खालसा करण्याचा सरकारचा इरादा नाहीं; तर आतां ह्या कामाची पूर्ण चौकशी होईपर्यंत महाराजांनीं कापांतच राहावें असा हुकूम आहे. तर मग आतां——

**महाराज.**—सरकारचा हुकूम मला मान्य करणें आहे. महाराणी सरकारचे चरणांपाशीं माझी पूर्ण राज्यभक्ति आहे. आपण सर्व माझे मित्र व हितचिंतक अहां. ह्या प्रसंगीं लाट साहेबांवर व आप-

णांवर माझा पूर्ण भरंवसा आहे. (दुःखानें) माझी तर अशी स्थिति आहे कीं, ज्या धरणीवर मी ह्या वेळेस चालतों आहें ती देखील मजवर उलटली आहे. मजवर आकाश कोसळलें आहे. माझे दुसमानानीं मजवर आग पाखडली आहे. पण खचीत साहेब, मजवर हा असा प्रसंग येईल हें स्वप्नीं देखील नव्हतें, आणि तशांत दयाळू व न्यायी सरकाराकडून हें एकदम विचारपूस न करितां मजवर अरिष्ट! हर हर! एकूण गायकवाडीवर इतकी सरकारची इतराजी झाली अं! प्रारब्ध माझें, त्यास काय उपाय. सरकाराकडे काय आहे! धिक्कार असो माझ्या जिण्यास! (डोळ्यांतून अश्रु येतात)

**स० पेली.**— तर मग आतां पुढचा विचार?

**महाराज.**— त्यांत तो काय विचार. हा मी अभागी येथें आपल्या ताब्यांतच आहें! जें करणें असेल तें करावें!

**स० पेली.**— महाराजांनीं आपल्या राज्याचे हद्दींत जावें आणि मग काय होणें तें व्हावें हें बरें.

**महाराज.**— फार बरें, मजकडून कोणत्याही गोष्टीस हरकत नाहीं.

(सर्व उठतात व गाड्यांतून बसतात. गायकवाड सरकारची गाडी पुढें जाते व मागून बरोबर स्वार घेऊन **सर लुईस पेली, डाक्टर सीवर्ड, कर्नल जेकब,** वगैरे मंडळी जाते. महाराजांचे गाडींत **नानासाहेब, गोविंदराव मामा** व **बापुभाई** बसतात.)

—गाडींतील संभाषण—

**महाराज.**— ( दुःखानें ) मामा, आला शेवटीं प्रसंग ! चला, आतां काय, मुकलों सर्वांस. हर हर ! आतां सांगितलेलें मात्र ध्यानांत असूंद्या. ( डोळे पुसतात )

**मामा**:— ( कंठ दाटतो ) सरकार—महाराज—

**महाराज.** — आतां वाड्यांतील सर्व मंडळीचें शांतवन करणार तुह्मी सर्व अहांतच दिवाणजी. अहो! तुह्मी सर्व असें काय एखादे मुलासारखें करितां ? भाईसाहेब, मामा, हें काय ? अहो, हे प्रसंग आहेत, मनुष्यमात्रांस येतच असतात. राजापासून रंकापर्यंत. मग मीच कोणतो येवढा मोठा. कांहीं थोडें धैर्य धरा ?

**नानासाहेब.**—तरी महाराजांची आह्मी प्रार्थना करीत होतों, पण नाहींच ऐकिलें. व्यर्थ आमचें जिणें! महाराजांचे जिवावर मजा मारण्यास मात्र आह्मीं तयार!

**महाराज.**— ( वाईट वाटतें ) होणें तें चुकत नाहीं. असो, आतां काय, मामा, माझ्या कमेस वारंवार आश्वासन देत जा. पोरीला फार दुःख होईल. हें ऐकल्याबरोबर हंबरडा फोडील. तिचें आतां कसें होईल! राणीसाहेबांचें शांतवन करा. मला मोठी ह्यांची काळजी आहे. काय करितील कोण जाणें. त्यां सर्वांचा शब्द मोडून कसा मी निष्ठुर होऊन येथें आलों! देवा, कोण हा प्रसंग! दुसरें तिसरें कांहीं न करोत हें तुजजवळ पदर पसरून मागणें आहे! फार फार त्या मजकरितां आकांत करितील.

मामा, संभाळा त्यांना. वारंवार दोन गोष्टी सांगत जा. माझा त्यांस निरोप सांगा कीं, "मला ब्रह्मदेवाचीही भीति नाहीं. मी लवकर येतों" ( चला, आतां ह्या वेशी जवळ येत चालल्या.) आतां फार काय सांगूं. माझ्या धाकट्याला फारच संभाळा, मला त्याच्या शिवाय कसें चैन पडेल तें पडो!

**मामा.**—महाराज,—आतां शेवटीं वियोग होणारचना. हर हर! छायेखालीं होतों, कोणची ह्मणून काळजी नव्हती. आग लागो आमचे जिण्यास! आतां आमचे हाल कुतरा खाणार नाहीं. बुडालें हो बुडालें! आतां आमचें कसें होईल. आतां आमचें कसें होईल! महाराज, आजपर्यंत जे आमचे हातून अपराध झाले असतील त्यांची देवानेंच आपण क्षमा करावी.

( वेशीजवळ गाड्या येतात. इंग्रेजांचे स्वार महाराजाचे गाडीभोंवतीं वेढा घालतात. पेलीसाहेब महाराजांचे गाडीजवळ येऊन जाहिरनामा वाचतात, व महाराजांस गाडींतून उतरावयास सांगतात. महाराज उतरतात, व **सीवर्ड** साहेबांचे गाडींत बसून कापांत पुन्हा जातात.)

(**कर्नल जेकब** स्वार बरोबर घेऊन शहरांत शिरतात.)

[ **डाकतर सीवर्ड**चे बंगल्यांत महाराजांची स्वारी येते. सलामी होते. महाराज बंगल्यांत जातात. व बरोबरची मंडळी शहरांत परत जाते ]

**स० पेली.**—महाराज, सीवर्ड साहेब आपले स्नेही आहेत. आपल्या बडदास्तींत काडीमात्र कमी होऊं देणार

नाहींत. आपण फक्त आमचे ताब्यांत येऽहृदेंच मात्र कायतें. येतों तर मी आतां.

महाराज.–हां साहेब, सरकार समर्थ आहे, मी हुकमाचा बंदा आहें.

(बंगल्याभोंवतालीं गोरे लोकांचा पहारा बसतो. कोणास आंत जाऊं देत नाहींत)

सर्व जातात.

---

## अंक ४.

### प्रवेश ४.

वडोदें शहर, रस्ता.

गोपाळपंत.--कांहो विष्णुपंत, सरकारस्वारी आज अजून कापांतून कां परत येत नाहीं ? काय आहे समजत नाहीं.

विष्णुपंत.– काय आहे कोण जाणे. अहो! पहा हे महाराजांबरोबरचे रिसाल्याचे स्वार घाबरलेले दवडत माघारें येत आहेत.

गोपाळपंत.– कांहीं तरी गडबड खचीत. मी ह्यांस विचारतों. (एकाजवळ जातो) कांहो रिसालदार, काय गडबड आहे ही ?

रिसालदार.– काय सांगावें महाराज आह्मीं. (रडत) धिक् आमचें जिणें! कसले आह्मीं रिसालदार. घात झाला !!

विष्णुपंत.– (घाबऱ्या घाबऱ्या) काय झालें, महाराज कोठें आहेत ?

**रिसालदार.**— महाराजांस नेलें आणि आह्मी खालीं मान घालून रडत आलों आहोंत!

**विष्णुपंत.**— नेलें तरी कोठें महाराजांस ? मुंबईस ? कोठें, कलकत्त्यास ? हाय हाय !

**रिसालदार.**— नाहीं हो. सीवर्ड साहेबांनीं त्यांस गाडींत बसवून आपले बंगल्यांत नेलें. बंगल्याभोंवताली गोरे लोकांचा पहारा ठेविला आहे. सर्व दरवाजे बंद केले आहेत, व कोणास आंत जाऊं देत नाहींत.

**गोपाळपंत.**—गेली हो गेली, गायकवाडी बुडाली असें आतां खचीत समजा!! दुर्दैवी आह्मी, राम राम! बरें मी राजवाड्यांत जातों आणि तिकडे काय गडबड आहे ती पहातों. (पळत सुटतो)

( इतक्यांत पलटण दवडत येते. )

( जिकडे तिकडे गडबड होते. )

**जेकब.**— बाजू बाजू हो जाव सब लोग.

**पदंभट.**— अर पळा, अरे हे आलणा गोर लोक दवडत. पळारे पळा. ( जोडा काढून पळत सुटतो )

**त्रिविक्रमभट.**—धावारे धावा, कसली खिचडी आणि कसलें काय! अरे पदंभट, तूं कोठें आहेस? पळारेपळा, अरे सांपडलोंरे सांपडलों (कांसोटा सुटतो) अरे! माझा जोडा गेलारे गेला! (एका हातांत पागोटें धरून पळत सुटतो.)

**जकब.**— बाजू, बाजू. ये तुम सुअर, घोडेके टापसें मर जावेगा.

रामजी.– अरे ल्योकानो पळ काढाकि. ह्ये बगा राव समद गोरच गोर. अर जनकू, अव सुभानराव हा कुनिकड? मरतो व्ह मरतो अता आपुन !

केशवभट.– अरे विष्ण्या, अरे गोप्या, अरे यारे या, अरे गुळाम्यो, घरांत या (घाबरलेला घरांत शिरतो) हर हर! बुडाली हो बुडाली गायकवाडी! दगा आहेरे दगा आहे. (घरांत शिरतो व दार लावून घेतो) अतां आमचें कसें होईल! (बायकोस) अग? आहेस कोठें तूं? तीं पोरें आलीं कां घरांत. तो दारास अडसर घे लावून, अग तो अगोदर घे, जा. खिडक्या लावारे पोरानों, घरांत जाऊन बसा. खबरदार बाहेर याल तर. कोण प्रसंग हा!

(जिकडे तिकडे शहरांत एकच गर्दी होते.)

(क. आनूसन् लहरीपूर दरवाज्याजवळ येतो व पहातो तों दरवाजा बंद केला आहे.)

क. आनूसन्.– कोन है अंदर? दरवाजा खोलो एकदम्. नहि खोलेगे तो तोफसे उडाना पडेगा. (उंच स्वरानें) गोलंदाज, भरो वो तोफ जलदी.

(दरवाजा उघडतात व गोरी पलटण आंत शिरते.)

(क. आनूसन् गायकवाडी सोन्यारुप्याचे तोफखान्याकडे जातो तों, गोलंदाज लोक तोफांस घोडे जोडून पोषाख वगैरे चढवून कडेकोट तयारींत आहेत.)

क. आनूसन्.– जल्दि करो. घोडेके उपरसें सब सामान उतार डारो. कोन है तुंम् लोग्.

**एकजण.**— साहेब, आह्मी सोन्यारुप्याच्या तोफखान्यावरील लोक आहों.

**क. आन्सन्.**— (रागानें) सुअर लोग्, जलदि करो, हमारा हुकूम नहि सुनोगे तो येकदम् तुमकूं कैद करेंगे. सब हथियार इदर रखदेओ, और तुंम् अपना रस्ता पकडो. जलदी करो.

**एकजण.**— अछा साब! हमारा कुच अख्त्यार नहि है. हम् हुकूमके ताबेदार हैं. (तोफांचे घोडे सोडतात) (शहरांत जिकडे तिकडे पहारे बसतात आणि बंदोबस्त होतो)

---

## अंक ४.

### प्रवेश ९.

—गायकवाडी बराखी—

(सर्व लष्करी लोक बराखीबाहेर तयारीनें जमतात.)

**क. आन्सन्.**— क्या है? कायके वास्ते सब गडबड कर रहेहो.

**सीनियर हवलदार.**— साब हमकू कुच् हमारे कमांडरनें हुकूम दिया नही. वो जो हुकूम फरमावेंगे वैसी तजवीज हम करेंगे.

**क. आन्सन्.**— तुमको हुकूम मिलताहै सो सुनो. कुच् गडबड और दंगा फिसाद मत् करो. तुम् सब लोकके उपर अब् इंग्रेज सरकारका हुकूम् है,

उस हुकूम् मुजब तुमकू चलना चाहिये. समजे तुंम् लोग्.

सी. हवलदार.— येतो अजब बात है! लेकिन्, मेहेरबानी करके हमारे कमांडर साहेबकुं भेज देना. वो: जो हुकूम फरमावेंगे, सो हमकुं कबूल है. हम् गायकवाडके सिपाही हैं, सो तो साब जानतेइ हौ.

क. आन्सन्.—अछा, कुच फिकिर नहीं. हंम उनको बोल भेजतेहैं.

सी. हवलदार.— अछा, साब. हम तो हुकूमके ताबेदार हैं.

—कमांडर यास बोलावून आणतात—

म्याक्कार्मिक्.— हमकुं कुच हमारे महाराजके पाससें हुकुम मिला नहींहै. साहेब बोलोगे तो सब् सिपाही लोकके हथियार उतरवाके रखवायेंगे. और जिस जग्गेपर आब् बोलोगे उस जग्गेपर सब लोग् जायेंगे.

ज. डिव्हाइन.— (गायकवाडचे कमांडर.) (कांहीं बोलत नाहींत.)

क. आन्सन्.— हुकूम यें है के सब लोकने अपने अपने हथियार नीचे रखके, ये शेहेर छोडके बहार निकल् जाना येही बात है. (सर्व शिपायी लोक शहरचे दरवाज्याजवळ येऊन हत्यारांची रास करून पुढें चालते होतात.)

---

# अंक ४.

## प्रवेश १.

### राजवाडा, कचेरी.

**हरीपंत.**—कांहो नानाजी, आज शहरांत भारी गडबड झाली आहे. महाराजांस कैद करून कापांत नेलें, शहरांत गोरेलोकांचे पाहारे वसले, गायकवाडी फौजेपासून हत्यारें घेतलीं, सर्व तोफा कापांत नेल्या, सर्व कांहीं इंग्रेज लोकांनीं आपले ताब्यांत घेतलें! राम राम! बुडाली हो बुडाली गायकवाडी.

**नानाजी.**—( घाबरून ) खिडकींतून पाहातो. अहो, आलें हो गोरे लोकांचें पलटण! आलें, येऊन ठेपलें वाड्यापुढें! हें आलें पहा! हर हर! आतां आमची काय अवस्था होईल!

**केशवराव.**—अहो नानाजी, हा पहा ह्यांनीं वेढा घातला. पाहाऱ्यावर अरब लोकांस सांगा हो, कीं दरवाजे बंद करा ह्मणून. मी जातों, व ही खबर हुजूर कचेरींत नानासाहेब, मामा, बापुभाई हे आतां कापांतून आले आहेत त्यांस कळवितों.

**हरीपंत.**—मीही देतों राणी साहेबांकडे वरदी.

**नानाजी.**—काय उपयोग आतां धामधूम करून! गेलेंहो सर्व बुडालें, आतां काय, हतभाग्य आपण सारे!

( पलटण जाकसन साहेबांसह राजद्वाराजवळ येते. )

**जाकसन.**— कोन है अंदर? खोलो दरवाजा.

**अरब.**—साहेब, हमकूं खोलनेका हुकूम नहींहै.

**जाकसन.**– (रागावून) किसका हुकूम तुमकूं होना? हुकूम करनेवाला तो अबी कापमें कैद है. हमारे हुकुमसे खोलो दरवाजा. नहीतो हम तोफ चलाएंगे. ( कांहीं इंग्रेजीभाषेंत पुटपुटतात )

**मामा.**–( खिडकींतून ) पहारेकरी, उघडा दरवाजा. आतां काय! ( पाहारेकरी दरवाजा उघडतात.)

**जाकसन.**–गडबड नहि करना. तुमकूं हम् एक बात बोलताहै. तुह्मारा महाराज अबी इंग्रेज सरकारके ताबेमे है. तुह्मारा धनी इसवखत इंग्रेजसरकार है, इस्वास्ते उनका हुकुम अब् तुमकूं सुन्ना चाहिये. गडबड करोगे तो तुमभी कैद हो जाओगे, और कुच नही होगा.

**एक आरब.**–अबे ज्या! बडा साब होके आया है! तुं हमकूं कैद करेगा ? ( बंदुकीस हात घालतो ) मै अरबका बच्चा हूं.–

**दुसरा आरब.**–ये क्या है (त्यास एकीकडे करून) बखतियार खां, तुं क्या गव्हार है? ये कोन साहेब हैं सो तुं पिछानता है? अफीमकी निशा उतरने दे तेरी. (साहेबांस) अच्छा साहेब, जैसा आवका हुकूम् होगा वैसा हम् करेंगे.

**जाकसन.**–तुम् हुषियार सिपाही है. तुमारे महाराजकी हमारे सरकारमें दरियाफती होगी और वो जब, वे गुन्हा होएंगे तब फिरकर इदर आवेंगे. सरकारका इरादा येः गादी खाल्सा करनेका नहीं है, ये तुम् खुब दिलमे समजना. अबी जो हम् हुकूम देएंगे उसमुजब करना. इतनाइ हमारे कहेनेका मतलब है.

**पहारेकरी.**—खावंद आप् धनी हो. अबसें हम् इधर आवके हुकूमसे पेहेरा करेंगे. साहेबने बेफिकीर रहेना. वडोदेकी गादी कायम रहेना, बस येही बात है.

**जाकसन.**—बोहोत अच्छा, भरोसेसें काम करो नहीतो—

(वाड्यांत शिरतात व जिकडे तिकडे कुलपें घालून त्यांवर मोहोरा करतात.)

---

# अंक ५.

## प्रवेश १.

राजवाडा.

**सूटर, रावसाहेब गजानन विठ्ठल, खानबाहादुर, छो० खानबाहादुर, नानाजी विठ्ठल, माधवराव.**

**सूटर.**—आज पेली साहेबांचे हुकुमाप्रमाणें सर्व गायकवाडी जवाहिराची मोजदाद करावयाची, व सर्व राजवाडा शोधून पाहून कांहीं कमजास्त सांपडतें की काय हें पहावयाचें. इतकींच ना कामें रावसाहेब?

**रावसाहेब.**—हां साहेब. जवाहिराच्या यादीही करण्याविषयीं हुकूम आहे.

**सूटर.**—हो, खरेंच. हें मी विसरलों. तर मग चला आतां पहिल्यानें जामदारखान्यांत.

(जामदारखान्यांत जातात.)

नानाजी विठ्ठल, साहेबांस सलाम करितात, व रावसाहेबांस नमस्कार करितात.

**रावसाहेब.**—नमस्कार. आजचे ह्या कामांत आपली आह्मांस मदत पाहिजे आहे.

**नानाजी.**—फार बरें आहे. आह्मीं तयार आहोंत.

**रावसाहेब.**—( कारकुनास ) माधवराव, आपण दौत लेखणी कागद घेऊन, आह्मी सांगतों त्याप्रमाणें यादी करालका ?

**माधवराव.**—जशी आज्ञा. (दौत लेखणी कागद घेऊन येतो, लगबगीनें लेखणीचा टांक नीट करितो, बंद मोडतो, व खुरमांडी घालून लिहिण्यास तयार होतो. )

**सूटर.**—अर्धी ही मोठी पेटी उघडूंया. ( कुलूप काढितात व पेटी उघडतात. )

**खानबाहादुर.**—हो, हीच पहिल्यानें उघडावी.

**सूटर.**—(एक एक जिन्नस बाहेर काढवितात.) हीं काय सोन्यारूप्याचीं ताटें आहेत. कायहो हीं जड! ( एक उचलून पहातात. ) अब्बब !

**रावसाहेब.**—मांडाहो, ताटें सोन्याचीं नंग ५, किता, रूप्याचीं नंग १५, इतकाच तपशील बस आहे. किती भारविर कशाला पाहिजेत ?

**खानबाहादुर.**—हँ, मांडा. मोठ्या वाम्या सोन्याच्या नंग ३५, रूप्याच्या नंग ५०, काय ह्या जड आहेतहो !

**छोटेखानबाहादुर.**—पहिल्यानें मोठ्या जिनसा सगळ्या बाहेर काढाव्या मग यादीबरहुकूम दुसऱ्या पेटींत ठेवितां येतील.

**रावसाहेब.**—कशाला इतकी खटपट! ह्याच्या ह्याच पेटींत

ठेवानात कां. हिऱ्यामोत्यांचें सामान मात्र मोठे पेटींत ठेऊं झालें.

**सूटर.**—हो, तसें केलें तरी हरकत नाहीं, ( दुसरी पेटी उघडतात )

**रावसाहेब.**—मांडा बळवंतराव, तबकें २९, अत्तरदाण्या १९, गुलाबदाण्या १०, चौफुले रूप्याचे १०, वर सोन्याचा मुलामा व मिन्याचें काम.

**सूटर.**—काय हें सोनेंरूपें! मला वाटतें ९।१० मण असेल. आमच्या पैकीं मोठा मोठा श्रीमंत ह्मटला ह्मणजे त्याचे घरांत चिनाई मातीचीं भांडीं देखील इतकीं निघणार नाहींत. ( दुसऱ्या आणखी पेट्या उघडतात व सोन्यारूप्याच्या भांड्यांच्या यादी करतात.)

**रावसाहेब.**—साहेब, ती दुसरी जवाहिराची पेटी उघडावयाची आतां.

**सूटर**—(उघडतात व पांच पंचवीस पोचांड्या बाहेर काढितात. रावसाहेब त्या सोडतात.)

**रावसाहेब.**— हं, घ्या, मांडा जवाहीर. मोत्यांचे व हिऱ्याचे राणीसाहेबांकडील दागिने. तन्मनी मोठे नंग ९, चंद्रहार नंग ७, कंठे मोत्यांचे व पदकें हिऱ्याचीं नंग ६, पोत नंग ८, पदर २०. मांडलेंत ?

**माधवराव.**— हो, पोत नंग ८ पदर वीस. हं मांडिलें. ( दुसऱ्याही आणखी पुष्कळ जिनसा मांडावयास सांगतात. सर्व जिनसा यादीवरहुकूम मोजून पेटींत ठेवितात)

**रावसाहेब.**— चला आतां ती मोठी पेटी.—

सूटर.–(दुसरी जवाहिराची पेटी उघडतात व एक मोठी पोचांडी बाहेर काढून ती सोडतात. ) ओःहो ! माझे तर डोळे दिपले बोवा ! काय ही संपत्ति, काय हे हिरे, मोतीं, माणकें! नदर ठरत नाहीं. रावसाहेब, काय बरें हा दागीना असावा?

रावसाहेब.–साहेब, हा मल्हाररावाच्या गळ्यांत घालण्याचा कंठा असेल. काय हें प्रकरण! मी त्या नरगुंदकराचे संस्थानांत संपत्ति पुष्कळ पाहिली पण हें गायकवाडीचें प्रकरण कांहीं वेगळेंच ! हा कंठा गळ्यांत घातला तर आमचा तर बोवा ऊर दडपून जावयाचा! हा शेवटला हिरा तरी केवढा आहे!

नानाजी.– हा कंठा खंडेराव महाराजांनीं करविला होता. नुस्ता हा मोठा हिरा ८ लाख रुपयांचा. मुंबईहून निकालकंपनीकडून खरेदी केला होता. तरीं महाराजांनीं दोन तीन पदर कमी करून आपल्या गळ्याजोगता केला, त्याचे अर्धीं तो कंबरेपर्यंत पडत असे. खंडेरावमहाराज पुरुषच तसा होता. त्यास तो शोभत असे.

रावसाहेब.–बळवंतराव, मांडा हा कंठा. खुद्दांचा, हिऱ्याचा. हिऱ्याच्या दागीन्यांचें सदरच निराळें घाला.

सूटर.–( दुसऱ्या पोचांड्या सोडतात) ओःहो ! हें काय! हा सगळा इंग्रेजी चालीचा हिऱ्याचा पोशाक आहे! ही टोपी, हें डगलें, ही विजार, हा एक कंबरेचा पटा, ही तरवार, ह्या सुऱ्या. हाय हाय! काय हे हिरे! आतोनात संपत्ति आहे बोवाही ! ही पाहून माझा तर उर दडपून गेला बोवा ! गायक-

वाडींत संपत्तीला पार नाहीं. (हंसून) हा पोशाक कालचे समारंभास नवे गायकवाडांस असता तर फार बहार झाली असती.

**खानबहादुर.**— हां साब, खरेंच.

**सूटर.**— नाहीं तर आमचे घरांतील संपत्ति ह्मटली ह्मणजे टेबलें खुरच्या, कोचें, बिलोर, चिनी मातीचीं भांडीं; फारच झालें तर सोन्यारुप्याच्या मुलाम्याचे किंवा रुप्याचे प्याले व चमचे.

**रावसाहेब.**— बरें, मांडला का हा दरेस? मांडा, मांडा, चला उशीर झाला, दुसरीं पुष्कळ कामें आहेत.

**माधवराव.**— हं मांडला, करितों बेरीज आतां.

**सूटर.**— चला, घाला ह्या पेट्यांस कुलुपें, करा वर मोहोरा.

(घड्याळ उघडून पहातात) जलदी करा.

(तसें करितात.)

**सूटर.**— चला आतां दुसरे कामास.

(सर्व मंडळी राजवाड्यांतील खोल्या, पेट्या, फडताळें वगैरे शोधतात.)

**खानबहादूर.**— हें पहा इकडे त्या पेटींत काय आहे तें. हा सोन्याचा लोटा. ह्यांत पण हें काय आहे? मोहोरा!

**सूटर.**—चला, काढा बाहेर त्या मोजा.

**रावसाहेब.**— हें पहा हिकडे ह्या फडताळांत काय आहे तें. अरे? हे तर रुपयांचे तोडे रचून ठेविले आहेत! नानाजी, काढा हे. आतां मोजण्याच्या भरीस नका पडूं. कांम्यानें तोला झालें. कोठवर बसाल मोजीत.

**छो. खानबहादुर.**– ह्या पेटींत हें सोन्याचें विड्याचें सामान. ही रूप्याची पेटी, हिजमध्यें काय हें! खडीसाखर! दीड दमडीच्या खडीसाखरेस पेटी कशाची, तर रूप्याची!

(आणखी पुष्कळ शोधाशोध करितात व आणखी पुष्कळ विषय सांपडतो.)

---

## अंक ५.

### प्रवेश २.

बडोदें शहर.

**गणपतराव, हरिपंत, मोरोपंत, भाऊसाहेब, सयाजी.**

**भाऊसाहेब.**–कां हरिपंत (आसपास, नाहींना कोणी, फार भ्यावें लागतें) कमीशनाचा दिवस लांबविला ह्मणतात. अहो कसलें कमीशन आणि कसलें काय, त्या सर्व गप्पा आहेत !

**हरीपंत.**– छेः, असें होणें नाहीं. कांहीं कारणाकरितां त्यांस तसें करावें लागलें असेल.

**गणपतराव.**–विलायतेहून, कलकत्याहून व मुंबईहून महाराजतर्फें बारिष्टर व वकील येणार ह्मणतात. शांतारामजीची तर मेहेनत बोवा विलक्षण आहे!

**मोरोपंत.**– अशी बातमी तर आहे बोवा. येतील तेव्हां खरें. दुर्दैवी विचारे महाराज. त्यांवर विघ्नें आपलीं

एकामागून एक येत चालली आहेत. काय करतात बिचारे! काळाची गति गहन आहे!

**सयाजी.**— अब ये बोलन्याचा विलाज नाइ बगा. परसंग पन मोठा परसंग येवर. काय आता राजामंदी अन आपनामंदि फरक! अब आपुन वर.

**मोरोपंत.**— अहो त्यांस या लोकांस देण्यापुरते पैसेही देत नाहीं सरकार. ह्मणतात एक लाख रुपयांत खर्च आटोपला पाहिजे. कसा आटोपणार! एक लाख रुपये तर विलायतेचा बालिष्टरच खाऊन बसणार. मग पुढें वकील वगैरे लोकांस महाराजानीं काय द्यावें!

**गणपतराव.**—अहो, कोणीकडून आपल्या येतील तितक्या अडचणी आणावयाच्या आणि दुसरें कायसरकार ह्मणतें, राज्याचा पैसा व्यर्थ खर्च करावयाचा नाहीं. आतां हा कमीशनाचा खर्च, लष्कराचा खर्च, पोलिसाचा व आणखीही दुसरे पुष्कळ खर्च भारीच सरकार आपले पिशवींतून पुरविणार आहे! आणि गायकवाडासंबंधी तेवढे मात्र पैसे फुकट जातात!

**हरिपंत.**—चोहोंकडून बिचारी पंचाईतच महाराजांस. त्यांचे वकीलांस राणीसाहेबांकडेही जाण्याची बंदी. त्यांस ह्मणतात कीं आह्मांस असें लिहून द्या, कीं त्यांजवळून खर्चाकरितां आह्मीं पैसे मागणार नाहीं तर मग परवानगी मिळेल.

**सयाजी.**— ह्या बिचाऱ्या प तरी काय हाये. सर्व बुचाड-

नशानीं घेतल्या हयती. अव नाकामंदी नथ व्हावी, तरत्रि घ्ये श्येटचा हुकूम. असा परकार हये त्रगा.

**भाऊसाहेब.**— काय त्रिचाऱ्या महाराजांवर प्रसंग? पण असें होणार नाहीं. सरकार लागतील तितके पैसे खचीत पुरवील. ते कलकत्याचे लाट साहेब चांगले आहेत. त्यांचे कानांवर मात्र ही गोष्ट गेली पाहिजे. ते मोठे विचारी आहेत.

**सयाजी.**—अव पैस न्हायी चेत तर न्हायि. अपून करू की ह्या बडोद्यातून जमा लागत्याल तिकत. ह्माराजांवर कचाट त्ये आपनावरत्री. काय ह्मंगता ह्ये देखील आपनाच्यान व्हत न्हायी!

**गणपतराव.**— तें करण्याची देखील पंचाईत. तें कालचें महाराजांचे मुक्ततेत्रद्दलच्या अर्जावर सह्या घेण्यात्रद्दलचें प्रकरण माहीतच आहे. त्या सह्या घेणारांस किहो धरून नेलें होतें फौजदारानें; पण मग त्रिचारे शेवटीं सुटले.

**हरिपंत.**— अतां दुःखांत सुख हें आहे कीं, कमीशनांतील मेंबर तरी चांगले आहेत. ते कधीं एखादी वांकडी गोष्ट करणार नाहींत.

**सयाजी.**— अव्ह त्ये उगाच राव. संमद ग्वार ल्वाक् जमत्याल अन व्हत्याल येक यिचाराच. आमच राज ल्वाक्, "व्है ह्माराज, व्है सायत्र, तसच, अमीत्री त्येच ह्मंगतो" अशा "जी"— वडत्याल अन् व्हयिल न्याय अन् काय. ह्माराजांवर परसंग लै वंगाळ ह्येच मातर खर.

**गणपतराव.**— असें काय ह्मणताहो! च्छे: असें नाहीं होणार. अहो, हें इंग्रजी कोडत आहे. त्यामध्यें तो कोच ह्मणून मुख्य साहेब आहे तो महाविद्वान् आहे, निस्पृह आहे. दिनकर राव जयपुरचे व ग्वाल्हेरचे महाराजही व इतर मंडळी अशापैकीं नाहीं. त्यांच्या पूर्ण न्यायदृष्टीस येईल तसें ते करितील. सर्व चांगले आहेत हो.

**हरिपंत.**— तो विलायतेहून आलेला बालिष्टरही उत्तम आहे असें ह्मणतात. बोलणारा काय बृहस्पति आहे.

**भाऊसाहेब.**— सर्व कांहीं बरें आहे. महाराजांचे तोंडास नाहाक काळिमा आला आहे तेवढा नाहींसा होवो हेंच आमचें प्रभूजवळ पदर पसरून मागणें आहे.

---

# अंक ५.

## प्रवेश ३.

### सूटर साहेब.

**सूटर.**—( आपणाशींच ) असो, हीं एकेक कामें बरींच लागीं लागत चाललीं, पहिल्यानें हीं जप्तीचीं वगैरे कामें बरींच पार पडलीं. आतां पुढें मोकादम्याच्या पूर्व चौकशीचें काम करणें आहे. दामोदरपंत, नानाजी विठ्ठल, खानविलकर वगैरे सर्व मंडळीस धरून आणून गोरे लोकांच्या पहाऱ्यांत ठेवल्यास आज बरेच दिवस झाले, तरीं

पण कांहीं अजून पुढील सुगावा लागत नाहीं, काय करावें! पण काय हरकत आहे? लागेल हळुहळू.

( गजानन विठ्ठल येतात. )

**सूटर.**— रावसाहेब, आज कांहीं कमजास्त खबर.

**रावसाहेब.**—साहेब, पुढचें काम बरेंच लागीं लागेल असें दिसतें आतां.

**सूटर.**—कांहीं कमजास्ती सुगावा?

**रावसाहेब.**—साहेबांपुढें नानाजीची जबानी झालीच आहे. आज दामोदरपंतही एकदाचा कबूल झाला. पहिलेपासून अखेरपर्यंत सर्व हकीगत कशी अस्खलित सांगतो आतां!

**सूटर.**—काय, काय ह्मणतां! दामोदर झाला कबूल?

**रावसाहेब.**—फार प्रयास पडले साहेब, ह्यापासून एक एक गोष्ट काढून घेण्यास; पहिल्यानें तो कांहीं दिवस हेंच घेऊन बसला होता कीं मला कांहीं ठाऊक नाहीं, मग पुढें ह्मणूं लागला कीं हें सर्व कृत्य मीं केलें. महाराजांचें ह्यांत कोणचेंही प्रकारचें अंग नाहीं. मग मी नानाजीस ज्या तंबूंत दामोदर होता त्याचे बाहेर उभा करवून त्याजकडून सांगविलें कीं, "आह्मीं सर्व कबूल केलें, तुह्मीही करा, उगीच कशाला ठेवितां?" त्याच दिवशीं संध्याकाळीं पुन्हा त्यानें मला बोलावणें पाठविलें व ह्मणूं लागला कीं इतके दिवस जें मी ह्मणत होतों तें खोटें, आतां काय खरें

आहे तें मी कबूल करण्यास तयार आहें. मला आतां हा गोरे लोकांचा पहारा नको, ह्याला कंटाळलों मी. ह्यांनीं उठा ह्मटलें कीं उठावें, बसा ह्मटलें कीं बसावें, ही नशियत कोठपर्यंत सहन करावी! मी सांगणार मला काय सांगावयाचें तें. सोडवा मला ह्या त्रासांतून एकदाचें.

**सूटर.**—मग पुढें.

**रावसाहेब.**—मी त्याजकडे गेलों आणि ह्मटलें कीं आपण जर खरें सांगाल तर सरकाराकडून माफीचें सरटिफिकीट मिळेल. मी माफीचे सरटिफिकिटाविषयींचें कायद्यांतील कलम वांचून दाखविलें आणि मग लागला तो भडाभड कबूल करण्यास.

**सूटर.**—वा:, फारच उत्तम हें काम झालें.

**रावसाहेब.**—तो ह्मणाला, "हा विषप्रयोगाचा प्रकार तीन वेळ झाला. नुरुद्दिन बोहऱ्याकडून सोमल आणविला. हेमचंद जव्हेरी ह्याजकडून हिरे आणविले. ह्या जिनसा महाराजांचे आज्ञेवरून कापांत शिपायाकडे पाठवून दिल्या." आतां त्या हेमचंदास पकडून तावडतोब त्याच्या वह्या जप्तकरून त्यास ह्या हिऱ्यांबद्दल विचारावें. सर्व काम मुद्दापत्र्यासह झालें पाहिजे. त्या बोहऱ्याची पुढें जबानी घेतली पाहिजे व त्याच्याही वह्या जप्त केल्या पाहिजेत.

**सूटर.**—आपण सर्व हुषार हुषार माझे मदतीस आहांत, ह्मणूनच हा खटला ह्या पंथास आला.

**रावसाहेब.**— ह्यांत आमची मदत ती काय!

**सूटर.**—असो, आतां दामोदरपंताची जबानी उद्यां घेऊं, ती एक दिवसांत आटपणार नाहीं असें वाटतें.

**रावसाहेब.**—साहेब, चांगले दोनचार दिवस लागतील. त्याचें भारूड काय थोडें आहे! खटल्याचा पुरावा तर उत्तम नमणार.

( सर्व जातात. )

---

## अंक ५.

### प्रवेश ४.

रेसिडेन्सी.

**डाक्टर सीवर्डचा बंगला.**

**मल्हारराव महाराज.**

**महाराज.**— हर हर! काय माझी ही अवस्था? मला हा बंगला तुरुंगाप्रमाणें भासूं लागला आहे! पण हा तुरुंगच. तुरुंगांत व ह्यांत काय फरक आहे? मला हे सांगतात कीं बाहेर शहरांत फिरावयास जा; पण हें काळें तोंड घेऊन कसें बाहेर पडावें! माझे आतां का पहिल्याप्रमाणें बाहेर पडल्यावर मानमरातब रहाणार आहेत. कसें जावें हें काळें तोंड घेऊन रयतेपुढें! पण हा नाहाक काळिमा! हें मी मानितों, पण माझी रयत व इतर लोक असें मानीत असतील काय? मला येथें ह्यानीं पहिल्यानें रात्रीस निजावयास पुरता बिछाना देखील दिला नाहीं. यःकश्चित् माझा मनुष्य विहिरीवर पाणी

आणावयास गेला तरी त्याचे मागें पुढें गोरे लोकांचा पहारा तयारच. मी ह्मटलें कीं घटकाभर बागेंत जाऊन हवा खाण्यास बसेन, तरी देखील माझे पुढें मागें गोरे लोक असणारच. एखादा साधा कैदी तरी बरा असतो ! माझा ह्यांस इतका देखील विश्वास असूं नयेना ! मी ह्यांचे हुकुमाचे बाहेर काडीमात्र देखील गेलों नाहीं, तरी माझी ही अवस्था! येथें एक एक दिवस मला वर्षाप्रमाणें भासूं लागला आहे. आज इतके दिवसांत माझी प्राणप्रिया मला अंतरावीना ! काय तिची अवस्था झाली असेल ! बिचारीचे रात्रंदिवस रडरडून डोळे देखील सुजले असतील. काय हा प्रालब्धाचा महिमा ! ऐश्वर्य हें पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें आहे !

(इतक्यांत एक खिसमतदार येतो.)

**खिसमतदार.**— सरकार, जेफरसन साहेब व शांताराम वकील आले आहेत.

**महाराज.**— (मनांत) नको हें नांव. आतां ह्याची तूर्त लाज वाटते. (मोठ्यानें) बरें आहे, घेऊन ये त्यांस लौकर आंत.

**जेफरसन व शांताराम येतात.**

**जेफरसन.**— महाराजांची प्रकृति बरी आहेना?

**महाराज.**— हो, आहे ही दिसतेच आहे; बरी आहे.

**शांताराम.**— महाराज, संकटसमयीं धैर्य धरणें हेंच थोरांस उचित आहे. आलेला प्रसंग टाळण्याविषयीं

उद्योग करणें आपलें काम आहे, तें आपण करीतच आहोंत. पुढें यश देणें भगवंताधीन आहे.

**महाराज.**— बसा, कांहीं कमजास्त मजकूर आहे कीं काय?

**जेफरसन.**— महाराज, आह्मी हा आपला मोकद्दमा घेऊन मोठे अडचणींत पडलों. सरकारांतून पुरते खर्चाचे रुपये मिळण्याची देखील पंचाईत दिसते.

**महाराज.**— काय ह्मणतां आपण! सरकारांतून ह्या कामास पैसे देखील पुरते मिळत नाहींत?

**जेफरसन.**— भारी जिकीर चालविली आहे त्यांणीं. विलायतेहून जो बालिष्टर आह्मी बोलाविला आहे, तो इतक्यांत येथें येईल. सरकार तर ह्मणतें एक लाखांत सर्व काम उरकलें पाहिजे. आतां सुमारें एक लाख रुपये तर त्यास देण्यास पाहिजेत. तेव्हां आह्मी तरी इतका पैसा आणावा कोठून? मोठी पंचाईत झाली आहे. आह्मी तरी काय करावें ह्या भोगास.

**शांताराम.**— तेव्हां जेफरसन साहेबांनीं असा विचार केला आहे कीं, चालेल तोंपर्यंत खटला चालवावा. जे दिवशीं पैसे सरतील ते दिवशीं खटला सोडून चालतें व्हावें.

**जेफरसन.**—महाराज, सादर करण्यास परम दुःख वाटतें, येथें दुसरा उपायच राहिला नाहीं.

**महाराज.**—साहेब, नकाहो असें करूं. ह्या प्रसंगीं आपण सर्व मला माझे आप्तांप्रमाणें अहांत. खरे आप्त राहिले एकीकडे पण आपणांस माझी अभाग्याची दया येऊन मजकरितां इतके लांब धांवत आलां, हे केवढे आपले उपकार मजवर! आपण पहातच

आहांत कीं मी येथें रावाचा एक हॅजिन पडलों आहें!

**जेफरसन.**— काय करावें महाराज! आह्मांस इकडे आड आणि इकडे विहीर असें झालें आहे. आपली अवस्था आह्मी सर्व पूर्णपणें जाणतों; पण येथें करावें तरी काय?

**महाराज.**—मी आपले उपकार जन्मोजन्म विसरणार नाहीं. परमेश्वराचे कृपेनें आपल्या श्रमांचें सार्थक झालें तर मग काय! मजजवळ येथें आतां कांहीं एक राहिलें नाहीं.

**जेफरसन.**— काय ह्या वेळेस सरकारचे न्यायदृष्टीची तर कमालच झाली. फार तर काय, पण आह्मांस राजवाड्यांत राणी साहेबांकडे कांहीं पुराण्याचे कामाकरितां देखील जाण्याची मनाई. ह्यांना वाटतें कीं कदाचित् आह्मीं त्यांचे जवळून खर्चावयास पैसे घेऊं. त्या बिचाऱ्यांजवळ तरी राहिलें आहे काय! धुऊन घेतल्या आहेत जशा! ह्यांस आमचा देखील भरंवसा राहिला नाहीं. असा प्रसंग कधीं आला नव्हता!

**महाराज.**— मी तरी आतां येथें काय करावें? प्रालब्ध, प्रालब्ध माझें! माझा सर्व गोष्टींत नाइलाज आहे. आतां फार काय सांगूं, ही माझे गळ्यांत मोत्यांची कंठी मात्र कायती राहिली आहे. ही साहेब मी आपणास देतों. (त्यांचे गळ्यांत घालूं लागतात) हेंच कायतें माझें, असें मी या घटकेस ह्मणतों. ग्रहण करावी आपण, व मला ह्या प्रसंगीं अंतर देऊं नये.

**जेफरसन.**— (गहिंवरतात) काय करावें महाराज, ती कंठी आपणांजवळ असूं द्यावी, नको मला. आमचेकडून होईल तितकी आह्मी महाराजांचे कामांत मनोभावानें मेहेनत करितों. पैसे मिळविण्याचे कामांत आह्मी आणखीही प्रयत्न करून पहातों, मग आमचें व आपलें प्रालब्ध!

(इतक्यांत जेफरसनचे नांवाचा एक टेलिग्राम येतो.)

**जेफरसन.**— (पत्र फोडतात व वाचतात) "महाराजांस खर्चास पुरे इतके पैसे सरकार देत नाहीं, तरी एक रुपयापासून लाख रुपयेपर्यंत पैसे पुरविण्यास मी **गणेश वासुदेव जोशी, वकील, पुणें**, तयार आहें. चार दिवसांचे अंतरानें मात्र कळविण्यांत यावें." मोठा चमत्कार आहे. शाबास ह्या गृहस्थाची!

**महाराज.**— आली माझी देवास करुणा! ह्या पुणेंकर मंडळीचे उपकार मीं कोठें फेडूं?

**जेफरसन.**— येतों तर आह्मी आतां. महाराजांनीं काळजी करूं नये. स्वस्थ असावें.

**महाराज.**— ह्या जगांत आतां मला काय ते आपण सर्वजण आहां. मजवर आकाश तर कोसळलेंच आहे. खचीत मी निर्दोष आहें. परमेश्वरानें ह्या आपल्या श्रमांचें सार्थक करावें, हेंच त्याचे जवळ माझें पदर पसरून मागणें आहे.

(सर्व जातात.)

# अंक ६.

## प्रवेश १.

### रेसिडेन्सी.

### कमीशन.

कमीशनामध्यें मुख्य न्यायासनीं **महाराज शिंदे, कौच** (प्रेसिडेन्ट), **जयपूरचे महाराज, रिचर्डमीड, राजे दिनकरराव** व **मेलव्हिल** असे विराजमान होतात, खालीं बालिष्टराचे टेबलावर **स्कोबल** व **इनव्हऱ्यारिटी** (सरकारी बालिष्टर), **बालन्टाईन, ब्रानसन, परसेल, शांताराम नारायण** वगैरे (गायकवाडतर्फे) मंडळी मोठमोठे बालिष्टरांचे झगे घालून बसते. कमिशनरांचे डावे हातास **मल्हारराव महाराज** व उजवे हातास **पेली**साहेब बसतात.

( कमीशन सुरू होतें.)

प्रथम राणीसरकारचा जाहिरनामा वाचतात. महाराणी सरकाराकडील बालिष्टराचें संभाषण.

प्रेसिडेन्ट साहेब, राजेलोक व कमिशनामधील इतर गृहस्थ हो, मल्हारराव महाराजांवर क. फेयर साहेबांस विषप्रयोग केल्याचा दोष शाबित करणें आहे, तत्संबंधीं जो साक्षीपुरावा मजजवळ आहे तो गव्हरनर जनरल साहेबांचे हुकुमानें मी आपणांपुढें सादर करितों. आतां जो जाहीरनामा वाचला त्याप्रमाणें खरोखर ह्मटलें असतां दोन गुन्ह्यांचाच काय तो आपणांस येथें विचार करणें आहे. एक गुन्हा हा कीं, महाराज रेसिडन्टाच्या खासगत चाकरांपासून रेसिडेन्सीमधील बातम्या

मिळवीत असत कीं नाहीं, व दुसरा हा कीं महाराजांनीं खुद्द व आपले चाकर लोकांकडून बडोद्याचे रेसिडेंटास त्याचे शिपायांकडून विषप्रयोग करण्यास उघड रीतीनें मदत केली किंवा करविली कीं नाहीं? आतां ह्या खटल्यांत पहिल्याप्रथम फेर साहेबांची आया, इजशीं महाराजांचें दळणवळण सुरू झालें. एक पेद्रू ह्मणून फेर साहेबांचा बुटलेर ३५ वर्षांचा नोकर आहे. ह्यास महाराज बोलावणीं पाठवीत परंतु तो मी गेलों नाहीं असें ह्मणत आहे; तरी त्यास एकदा महाराजांनीं ६० रुपये लांचाबद्दल ह्मणून दिले. ह्यापुढें महाराजांनीं रेसिडेन्सींतील शिपाई लोकांशीं दळणवळण ठेवण्याचें सालम व यशवंतराव यांचे मार्फत सुरू केलें. रावजी हवलदार पुष्कळ वेळ सरकारवाड्यांत जात येत असे, व त्यास महाराज शेंकडो रुपये पोंहोचवीत असत. रावजी रेसीडन्सींत गुप्तरूपें काय होत जात असे तें महाराजांस कळवी. रावजीस पगार थोडा असे तरी तो हवेतसे पैसे उधळीत असे. ह्याप्रमाणें नरसू जमादारास व इतर लोकांसही महाराजांनीं आणखी शेकडों रुपये दिले आहेत. आतां विषप्रयोग करणारा रावजी हवालदारच. विषप्रयोग होतो हें तारीख ९ नव्हंबर ह्या दिवशीं उघाडीस आलें. कर्नल फेयूर साहेब हे रोज सकाळीं फिरून आले ह्मणजे डाळिंबाचें सरबत घेत असत. ह्या सरबतांत रावजीनें विष टाकलें. साहेबांस जेव्हां ह्या दिवशीं अंदेशा आला तेव्हां त्यांनीं डाकटराकडून तें विष तपासविलें तों त्यांत सोमल व हिऱ्याची भुकी आहे असें समजण्यांत आलें. आतां ह्या गोष्टीशीं महाराजांचा संबंध जुळतो तो

असा.— त्याच दिवशीं सकाळीं सालम व यशवंतराव हे कोठींत आले होते. दामोदर पंताचे जबानीवरून असें दिसतें कीं महाराजांनीं त्यांच्या जवळ सोमल मागितला. तो फौजदारींत मिळेना तेव्हां त्यानें एका वोहऱ्याकडून आणविला. हिऱ्याची चुकी महाराजानीं हेमचंद जव्हेऱ्यापासून घेतली, व ती यशवंतरावाजवळ दिली, व सोमल सालमाजवळ दिला. ह्यांनीं ह्या जिनसा नरसूचे हातीं रावजीजवळ दिल्या. दामोदरपंतास व रावजीस माफीचें सरटिफिकीट दिलें आहे. पण त्याचे जबानीचे स्वरूपावरून कमिशनाची खात्री होईल कीं ते जें सांगतात तें खरें आहे. रावजीजवळून एक सोमलाची पुडी पश्यांत विसरून राहिली. ती पुढें सांपडली. नरसू जमादारास माफीचें सरटिफिकीट दिलें नसतां तो कबूल जहाला, व त्याची जबानी रावजीचे जबानीशीं पूर्ण मिळते, हें कमिशनाचे लक्ष्यांत येईलच. दामोदरपंताजवळचा कागदपत्रीं पुरावाही चांगला उपयोगी पडेल. विषप्रयोगाचे दिवशीं चालीप्रमाणें महाराज फेर साहेबांचे भेटीस आले, तेव्हां साहेबांस जीं चिन्हें होत होतीं तशींच महाराजांसही होतात ह्मणून महाराज साहेबांजवळ ह्मणाले. असा ह्या खटल्याबद्दल पुरावा आहे. आतां पुढें साक्षीदार आणावयाचे.

## पेद्रु डिसोजाची जबानी. (सरकारतर्फे)

माझें नांव पेद्रु डिसोजा. फेर साहेबांचा मी बटलर आहें. सालमास मी ओळखतों. तो मला ह्मणे कीं तू महाराजांकडे येशील तर बरें होईल. मी ह्मणें

येणार नाहीं. मी गोंव्यास जाण्याचेवेळेस सालभा-
जवळ खर्चावयास रुपये मागितले. त्यानें मला बडोदी साठ रुपये आणून दिले, आणि सांगितलें कीं हे रुपये तुला महाराजांनीं बक्षीस दिले आहेत. मी साहेबांजवळ आज २५ वर्षें चाकरी करतों.

**उलट प्रश्न.** ( गायकवाडतर्फें )

**वालंटाइन.**—तुझी जबानी कोणापुढें झाली?

**पे० डिसोजा.**—मुंबईस एडिंगटन् साहेबांपुढें.

**वालंटाइन.**—ही खरी गोष्ट आहे कीं तूं कधीं महाराजांकडे गेला नाहींस ?

**पे० डिसोजा.**—हो कधीं गेलों नाहीं.

**वालंटाइन.**—रावजीस तूं ओळखतोस ?

**पे० डिसोजा.**—हो तो येथें बंगल्यांत चाकरीस असे.

**वालंटाइन.**—रावजी कधीं तूं मजबरोबर महाराजांकडे चल असें ह्मणाला होता काय ?

**पे० डिसोजा.**—नाहीं.

**वालंटाइन.**—तूं कधीं त्याला मी येईन असें वचन दिलें होतेंस काय?

**पे० डिसोजा.**—मी कधीं वचन दिलें नाहीं.

**वालंटाइन.**—तुह्मीं दोघांनीं आपण कधीं महाराजांकडे जाऊं असा बेत केला होता काय ?

**पे० डिसोजा.**—नाहीं. मी नाहीं.

**वालंटाइन.**—यशवंतराव कधीं सरकारवाड्यांत तुह्मांला भेटले होते काय ?

**पे० डिसोजा.**—जर मी वाड्यांत कधींच गेलों नाहीं तर मला ते कसे भेटतील.

**वालंटाइन.**—रावजी हजर असतांना कधीं कांहीं महाराज तुजजवळ बोलले होते काय?

**पे० डिसोजा.**—नाहीं, मी कधीं त्यांचेकडे गेलों नाहीं व ते कधीं मजजवळ कांहीं बोलले नाहींत.

**वालंटाइन.**—जर रावजी ह्मणेल कीं ते बोलले, तर ती गोष्ट खोटी?

**पे० डिसोजा.**— हो.

**वालंटाइन.**—बरें मी असें विचारतों कीं तुला असें तो बोलला तर मोठें आश्चर्य वाटेल काय? (हंसतात) जर रावजी ह्मणेल कीं तूं कधीं तरी महाराजांकडे गेला होतास तर ही गोष्ट खचीत खरी नाहींना?

**पे० डिसोजा.**—हो नाहीं. मी कध्धीं गेलों नाहीं.

**वालंटाइन.**—जेव्हां तूं गोव्याहून परत आलास तेव्हां तूं कधीं रावजीबरोबर महाराजांकडे गेला होतास?

**पे० डिसोजा.**—नाहीं. मीं गेलों नाहीं.

**वालंटाइन.**—तुला कधीं महाराजांनीं कागदाची पुडी किंवा दुसरी एखादी कसली पुडी दिली होती?

**पे० डिसोजा.**—नाहीं, मी जर त्यांचेकडे कधीं गेलों नाहीं तर मग ते मला पुडी ती कशी देतील.

## क. फेयूर साहेबांची जबानी. ( सरकारतर्फे )

माझें नांव राबर्ट फेयूर्. रावजी व नरसू हे माझे तैनातीस असत. विषप्रयोग झाल्याचे आधीं बरेच दिवस मी अजारी होतों. डोक्यास गळूं झालें होतें. हें बरें झाल्यावर माझें डोकें जड होत असे व रात्रीची झोंप येत नसे. डिसेंबरचे

९वे तारखेस सकाळीं मी सरबताचे दोन तीन घोट घेतले. कांहीं वेळानें मला सुस्ती आली. मला वाटलें हें सरबत वाईट आहे ह्मणून मीं तें खिडकीबाहेर फेंकून दिलें. तेव्हां त्याचे बुडाशीं मला कांहीं काळी भुकी दिसली. मला लागलेंच वाटलें कीं हें विष असावें. ह्या भुकीचें शोधन करण्यास हा गलास मी डा. सीवर्ड साहेबांजवळ दिला. त्यानीं विष ह्मणून सांगितलें. तें मग पुढें मुंबईस डा. ग्रे साहेबांकडे पाठविलें. मला माझ्या शिपायांचा संशय आल्यामुळें मी त्यांच्या जबान्या घेतल्या. महाराज व दादाभाई मला गुरूवारीं भेटावयास आले तेव्हां ह्मणाले कीं आपणांस कोणी विषप्रयोग केला असें आह्मीं ऐकतों. ह्यासंबंधी चौकशीचे कामांत आह्मांकडून पूर्ण मदत मिळेल असें ते ह्मणाले.

### उलट प्रश्न (गायकवाडतर्फे)

**बालंटाइन.**—तुह्मांला सिंधमधील नोकरीवरून दुर केलें त्यासंबंधी तुमचे जवळ एखादा कागद आहे काय?

**क. फेयूर.**—मजजवळ आहे का नाहीं हें ठाऊक नाहीं. कदाचित् असेल, पण मला ठाऊक नाहीं.

**बालंटाइन.**—गायकवाडाजवळ हा कागद किंवा त्याची नकल होती कीं नाहीं हें तुह्माला कांहीं माहित होतें?

**क. फेयूर.**—नाहीं. तो सरकारी कागद होता. अशा प्रकारचा कागद त्यांचे जवळ सरळ रीतीनें कसा आला असेल हें मला समजत नाहीं.

बालंटाइन.—सरळ रीतीनें येवो किंवा न येवो. आपण जाणतच असाल कीं ह्या जगांत सरळ रीति किती असते. पण तुह्मांला त्यांजवळ होता असें ठाऊक आहे कीं नाहीं?

क. फेयूर्.— नाहीं.

बालंटाइन.—बरें हें मजजवळ एक तुमचे हातचें पत्र आहे ह्यांतील शेवटलें वाक्य हें आहे कीं, "तुमचें पत्र येण्यापूर्वीं मला एक गुप्त व विश्वसनीय खबर समजली आहे कीं मला जें विष घातलें त्यामध्यें १ सोमल, २ हिऱ्यांची भुकी, ३ तांबें असे पदार्थ आहेत. हेच पदार्थ आहेत कीं नाहींत हें पाहाण्याचें मोठें महत्वाचें आहे हें उघड आहे." ही खबर तुह्मांला कोणाजवळून मिळाली?

क. फेयूर्.— कांहीं लोक मला नेहमीं खबरा देत असत त्यांचे जवळून.

बालंटाइन.— कोण खबरा देत असत?

क. फेयूर्.—मजकडे शेंकडो लोक गायकवाडाचे विरुद्ध अर्ज्या करीत असत ते.

बालंटाइन.—तुह्मीं कधीं त्यांस खबरा देण्याबद्दल पैसे देत होतां?

क. फेयूर्.—पैसे दिल्याखेरीज मला पुष्कळ बातम्या मिळत असत. पराकाष्ठेच्या त्रस्त झालेले लोकांस पैशांची गरज नाहीं.

बालंटाइन.—त्रस्त झालेले लोकांविषयीं मला येथें आपलें संभाषण नको. त्रस्त झालेले लोकांविषयीं जर आपण तोंडांतून ब्र काढाल तर मलाही गांजलेल्या

राजाविषयीं तितक्याच उघड रीतीनें बोलतां येईल. तर कृपाकरून अशा प्रकारचें कांहीं बोलूं नका. मला त्याची गरज नाहीं. फक्त मी विचारतों तेवढ्याचा जबाब द्या ह्मणजे झालें. ह्या खबरा सांगण्याबद्दल कोणांस कांहीं पैसे मिळत असत काय?

क.फेयूर.—नाहीं. कधीं नसत. कोणासही नसत.

वालंटाइन.—आपले पत्रावरून तर असें दिसतें कीं ज्यानें आपणांस ही वातमी दिली तो गृहस्थ आपणास ठाऊक आहे. तरही "गुप्त व विश्वसनीय वातमी" आपणांस कोणी दिली?

क.फेयर.—मला अमक्यानेंच दिली असें सांगतां येत नाहीं.

वालंटाइन.—इतकी महत्वाची गुप्त वातमी ज्यानें आपणांस दिली त्याची जबानी घेणें अवश्य असतांनां आपण कशी घेतली नाहीं?

क. फेयूर.—मला त्याची गरजशी वाटली नाहीं.

वालंटाइन.— भाऊ पुणेकराची व आपली खचीत ओळख असेलच?

क. फेयूर.—हो आहे.

वालंटाइन.—त्यानें ही वातमी आपणास सांगितली?

क. फेयूर.—त्यानेंच सांगितली कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. कदाचित् त्यानेंही सांगितली असेल.

वालंटाइन.—कर्नल फेर, भाऊनें सांगीतली?

क. फेयूर—मला कांहीं सांगवत नाहीं, आणखी दुसरेही पुष्कळ वातम्या देत असत.

वालंटाइन.—दुसरा कोण देत असे?

**क. फेयूर.**—बळवंतराव मुनशी ह्मणून दुसरा एक असे. ह्या दोहोंपैकीं एकानें दिली असेल.

**वालंटाइन.**—दोघांचीं नांवें तुह्मीं सांगितलींत ह्यांपैकीं एकानें दिली खबर तुह्मांस?

**क. फेयूर.**—मी सांगतों मला कांहीं सांगतां येत नाहीं.

**वालंटाइन.**—जो भाऊ पुणेंकर नुकतें जें कमीशन भरलें होतें त्यांत गायकवाडाविरुद्ध होता तोच का हा?

**क. फेयूर.**— कसें ह्मणतां?

**वालंटाइन.**— माझें विचारणें उघड आहे.

**क. फेयूर.**—तुमचे बोलण्यांतील आशय मला कळत नाहीं, आणखी उघड करून सांगा.

**वालंटाइन.**—मी विचारतों कीं भाऊ पुणेंकराचें गायकवाडाचे विरुद्ध वर्तन असे कीं नसे?

**क. फेयूर.**—मला तो खबरा वारंवार देत असे. राज्यसुधारणेच्या कामीं तो गायकवाडाविरुद्ध नसे. तो मोठा सचोटीचा गृहस्थ आहे, असें माझें मत आहे.

**वालंटाइन.**— असें आपलेंच मत आहे असें समजून मी त्याचा स्वीकार करितों. मी विचारतों कीं कधीं भाऊ पुणेंकर गायकवाडाविरुद्ध असे काय? फेयूरसाहेब माझे प्रश्न उघड आहेत. आपल्यासारख्या हुद्देदार व सुशिक्षित गृहस्थांस हे प्रश्न समजणें अवश्य आहे.

**क. फेयूर.**—मला वारंवार गायकवाडाविरुद्ध खबरा मिळत असत, मीं त्यांचे विरुद्ध नसें.

**प्रेसिडेंट.**—बालिस्टर जो प्रश्न विचारताहेत त्याचें उत्तर तुह्माला देतां येत नाहीं काय?

क. फेयूर.— त्या खबरा नेहमींच ह्मणजे गायकवाडाविरुद्ध असत असें नाहीं.

वालंटाइन.—भाऊ पुणेकरानें तांब्याविषयीं तुह्मांस काय सांगितलें होतें ?

क. फेयूर.— माझे आठवणींत इतकें आहे कीं त्यानें मला विषामध्यें सोमल, हि-याची भुकी व तांब्याची भुकी आहे अशी आह्मीं बाजारगप्प ऐकतों असें सांगितलें होतें.

वालंटाइन.—तुह्मीं त्यास विचारिलें काय कीं ह्यास काय मुद्दा आहे ?

क. फेयूर.— मीं नाहीं विचारलें, मीं ती गप्प आहे असें समजलों.

वालंटाइन.—आणि गप्पांना तुह्मीं "गुप्त व महत्वाची खबर" असें ह्मणतां काय ?

क. फेयूर.—जशी खबर असेल व जिकडून आली असेल त्याप्रमाणें.

वालंटाइन.—मग तुह्मीं तिला "गुप्त आणि विश्वसनीय" अशी कां ह्मटलीत ?

क. फेयूर.— कारण मला तिजविषयीं कोठें बोलावयाचें नव्हतें.

वालंटाइन.—मग कां बोललांत ?

क. फेयूर.— डाक्टरांजवळ खरें खोटें करण्याकरितां मात्र बोललों.

रावजीची जबानी. (सरकारतर्फे)

माझें नांव रावजी. रेसिडेन्सींत हवलदार होतों. मी महाराजांकडे एकंदर २०, २५ वेळ गेलों.

 मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे 

त्यानीं मला ५०० रुपये मा[illegible]करितां दिले. महाराजांचे सांगण्यावरून नरसू जमादारास मीं वाड्यांत घेऊन गेलों. पेद्रूबरोबर व जमादाराबरोबर ४ वेळ गेलों. महाराज ह्मणाले तुह्मी सालमाबरोबर बातमी पाठवीत जा. पेद्रूजवळ त्यांनीं एक विषाची पुडी दिली व साहेबाचे खाण्याचे पदार्थांत घालावयास सांगीतली. जमादाराच्या हातीं मजजवळ कए पुडी दिली त्याच्या मी ३ पुड्या करून थोडेंसें पांढरें औषध वगळून महाराजांचे सांगण्यावरून तीनदा, सरबतांत टाकल्या. पुन्हा आणखी एक काळ्या रंगाची पुडी दिली ती देखील मी सरबतांत टाकली. त्या दिवशीं बोभाटा झाला. माझी साहेबानीं जबानी घेतली. पोलिसानें धरल्यावर खान बहादुरांस मी सांगितलें कीं मला माफी देवाल तर मी खरें सांगेन. मग मी कबूल केलें. जें पांढरें औषध राहिलें होतें तें माझ्या पल्यांत सांपडलें.

उलट प्रश्न (गायकवाडतर्फे.)

**बालंटाइन.**—तुझे यजमानाची तुजवर मेहरबानी होती काय?

**रावजी.**—होय, त्यांची मजवर मोठी मेहरबानी होती.

**बालंटाइन.**—असें असतांही त्यांस तूं एकदम ठार मारण्याला तायार झालास अं!

**रावजी.**—कारण राजा मला पैसा देऊं लागला. त्यानें मला एक लाख रुपये देऊं केले. मी गरीब मनुष्य आहें.

**बालंटाइन.**—आणि गरीब असून, आणि लाख रुपये देऊं

केल्यामुळें तूं आपल्या दयाळू धन्याचा खून करण्यास प्रवृत्त झालास अं!

**रावजी.**— (कांहीं मनांत वडवडूं लागला.)

**वालंटाइन.**—असेंच. आतां कसचो ह्मणून लाज धरूं नको.

**रावजी.**— हो, मी कबूल झालों.

**वालंटाइन.**— बरें, तुला लाख रुपये मिळाले नाहींना?

**रावजी.**— नाहीं, मला कांहींएक दिलें नाहीं.

**वालंटाइन.**—तर आतां पहा कीं, तूं गरीब मनुष्य होतास, आणि गरीब होतास ह्मणून, व तुला उत्तेजन दिलें होतें ह्मणून, तूं आपल्या यजमानाचा खून करण्यास तयार झाला होतास; तर मग काम केल्याबद्दल पैसे कसे नाहीं मागीतलेस?

**रावजी.**— मी गेलों नाहीं त्यांचेकडे, कसा जाऊं?

**वालंटाइन.**— आतां जें हें आपण बाटलींतलें औषध फेंकून दिलें हें, महाराज, आपणांस फेर साहेबांस इजा करण्यासचना दिलें होतें. नाहीं का?

**रावजी.**— होय.

**वालंटाइन.**— तर मग त्याचा उपयोग कां केला नाहींस? तुला तर आढळलें कीं त्यापासून इजा होते. मग कां फेकून दिलेंस?

**रावजी.**— मी त्याचा उपयोग केला नाहीं.

**वालंटाईन.**— नरसूस सांगितलेंस पण, कीं मी त्याचा उपयोग केला ह्मणून.

**रावजी.**— हो, मी त्यास सांगितलें.

**वालंटाइन.**—तर मग तूं नरसूजवळ लबाडी बोललास?

**रावजी.**— हो, कारण तो माझ्या मागें लागला होता.

**वालंटाइन.**— तो तुझे मागें लागला होता ह्मणून तूं त्याला लबाडी सांगितलीस ?

**रावजी.**— होय, मी सांगितली ?

**वालंटाइन.**— तर मग सूटरही तुझे मागें लागले होते, त्यांस तर तूं शेंकडो लबाड्या सांगितल्या असशील ?

**रावजी.**— ते माझे मागें लागले नव्हते.

**वालंटाइन.**—फेयर्साहेबांजवळ तूं खरें सांगितलेंस?

**रावजी.**— खरें कसें सांगूं? त्यांनीं माझे बोलण्यावर विश्वास ठेवला नसता.

**वालंटाइन.**— पण सर्व गोष्टीबद्दल सूटरजवळ तूं खरें सांगितलेंस?

**रावजी.**— हो.

**वालंटाइन.**— पेद्रु तुजबरोबर कितीदां महाराजांकडे गेला होता?

**रावजी.**—एकंदर चार वेळा.

**वालंटाइन.**—आणि त्याजवळ महाराजांनीं पुडी देऊन त्यांत विष आहे असें सांगतांना ऐकिलेंस?

**रावजी.**—हो, ऐकिलें.

**वालंटाइन.**—तूं पेद्रूचें नांव फेर साहेबांपुढें ह्या खुनाच्या बाबतींत कां नाहीं घेतलेंस ?

**रावजी.**—मला भीति वाटली त्याचें नांव सांगावयाची.

**वालंटाइन.**—तुझे पक्ष्यांतून निघालेलें विष पाहून तुला आश्चर्य वाटलें असेल.

**रावजी.**—मला आश्चर्य वाटलें व मी गोंधळून गेलों.

**वालंटाइन.**—आणि तुला कधीं असें वाटलें नाहीं, कीं माझा

पट्टा जो दुसरा मनुष्य घालतो आहे त्यामध्यें विषाची पुडी आहे?

**रावजी.**—मला मुद्दल आठवण नव्हती.

**वालंटाइन**—बरें, आतां फेर साहेबांपुढें जबानींत तूं असें ह्मणालास काय कीं फैज्रूवर आमचा विषप्रयोगासंबंधी वहीम आहे?

**रावजी.**—माझा जीव बचावण्याकरितां असें ह्मटलें.

**वालंटाइन.**—मग तर तूं पहिल्यानें खून करण्याचा प्रयत्न केलास, आणि त्याबद्दल दुसऱ्या एका निरपराधी मनुष्यावर आळ घातलास.

**रावजी.**—ते शहरांत रहात होते ह्मणून त्यांवर मी आळ घातला.

**वालंटाइन.**—खरोखरच तर, हें काम तूं स्वतः केलेंस हें तूं विसरला नव्हतास; पण पट्ट्यांतील पुड्यांविषयीं मात्र तुला विसर पडला!

**रावजी.**—हो, मी केलें हें काम.

**नरसूची जबानी.** (सरकारतर्फे)

माझें नांव नरसू, मी शिपायांचा हवालदार होतों. रावजीबरोबर मी महाराजांकडे जात असें. महाराज ह्मणत, आह्माला कापांतील बातम्या सांगत जा. मला महाराजांच्या लग्नाबद्दल रावजीमार्फत ३०० रुपये मिळाले. महाराजानीं पहिल्यानें एक पुडी साहेबाचे सरबतांत टाकण्यास मजकडे रावजीस देण्याकरितां पाठविली. मी ती न उघडून पहातां रावजीजवळ दिली. दुसऱ्यानें एक पुडी पाठविली ती मी रावजीस दिली. हें विषाचें प्रकरण

उघाडीस आलें तेव्हां फेर साहेबांनीं माझी जबानी घेतली. पुढें मला धरिलें तेव्हां पहिल्यानें काळे व पुढें गोरे लोकांच्या पहाऱ्यांत होतों. मला माफी दिली नाहीं. रेसिडेन्सीचे बागेंतील विहिरींत माझें डोकें फिरलें होतें त्यामुळें पडलों.

उलट प्रश्न (गायकवाडतर्फे)

**बालंटाइन.**— कापांत किती वर्षे चाकरी केली?

**नरसू.**— बत्तीस किंवा जाजतीही वर्षे.

**बालंटाइन.**— तुझा फेर साहेबांशीं कधीं तंटा झाला नव्हता! किंवा त्यांचेबद्दल कांहीं कागाळयाही सांगायाचें कारण नव्हतेंना ?

**नरसू.**— नाहीं. ते माझे मस्बाप व अन्नदाते आहेत. माझें नशीब खोटें ह्मणून मी लोकांनीं सांगितलेलें ऐकिलें.

**बालंटाइन.**— तुझें खोटें नशीब असो किंवा कसेंही असो; पण तूं केवळ पैशांकरितां तुझ्या मावापास विष घालण्यास तयार झालासना ?

**नरसू.**— माझें मन रावजीनें वळविलें. माझें प्रालब्ध तसेंच होतें.

**बालंटाइन.**— पण हें पैशाकरितां काय ?

**नरसू.**— पैसा दिला तो तर लग्नाबद्दल. ह्याकरितां दिलाच नाहीं.

**बालंटाइन.**— तर मग ह्याबद्दल तुला काय मिळणार होतें?

**नरसू.**— हें काम केलें तर तुमचें चांगलें होईल व पैसे मिळतील असें सांगितलें होतें.

**वालंटाइन.**— आज जी हकीगत सांगितलीस हिजबद्दल कांहीं मिळालें नसेलच ?

**नरसू.**— नाहीं, कांहीं मिळालें नाहीं.

**वालंटाइन.**— तूं खोटी साक्ष देण्याकरितां पैसे घेणार नाहींस एकून ?

**नरसू.**— नाहीं, मी नाहीं घेणार.

**वालंटाइन.**— तर मग तूं खून केल्याबद्दल पैसे घेशील; पण खोटी साक्ष देण्याकरितां मात्र नाहीं घेणार?

**नरसू.**— काय करावें, माझें प्रालब्ध तसें होतें.

**वालंटाइन.**— कर्नलफेयूरपुढें तुझी जबानी झाली होतीना?

**नरसू.**— होय.

**वालंटाइन.**— आणि मला वाटतें कीं, तूं त्यांचे जवळ कबूल होतास कीं मला जेवढें ठाऊक आहे तेवढें खरें सांगेन ?

**नरसू.**— हो, पण मी खोटें सांगितलें.

**वालंटाइन.**— साहेबांस खोटें सांगितलेंस तें हें तूं काय ह्मणतोस, हें तुझें नशीबच असेल वाटतें ?

**नरसू.**— साहेबांला खोटें सांगितलें हें माझें नशीब.

**वालंटाइन.**—फेयूर साहेबांस तूं सांगितलेंस कीं नाहीं कीं फैजूवर माझा वहीम आहे ह्मणून ?

**नरसू.**— हो, मी सांगितलें.

**वालंटाइन.**— पण तुला माहित होतें कीं फैजू निरपराधी आहे?

**नरसू.**— दुसऱ्यानें त्याच्यावर वहीम घेतला ह्मणून मीही घेतला.

**वालंटाइन.**—महाराजांकडे तूं कितीवेळ गेलास ?

**नरसू.**—गेलों असेन चारपांच वेळ.

**बालंटाइन.**—असेन विसेन नको. किती वेळां गेला होतास?

**नरसू.**— पांच वेळ.

**बालंटाइन.**—विषासंबंधी गोष्ट भेटीचे चवथे वेळेसच पहिल्यानें निघाली ना?

**नरसू.**—होय.

**बालंटाइन.**—आणखी एक वेळ तूं गेला होतास ना?

**नरसू.**—होय, ह्यावेळेस आणखी एक पुडी दिली.

**बालंटाइन.**—तरमग एकंदर दोन पुड्या दिल्या?

**नरसू.**—होय, दोनच.

**बालंटाइन.**—त्रे चवथे वेळेस जी तुला पुडी मिळाली व तूं ती रावजीला दिलीस, ह्या पुडीचें तूं काय केलेंस असें तूं रावजीस विचारलेंस काय?

**नरसू.**—हो, रावजी ह्मणाला मी टाकली, पण कांहीं झालें नाहीं.

**बालंटाइन.**—त्याणें तुला सांगितलें कीं थोडीशी पूड मागें ठेविली आहे ह्मणून?

**नरसू.**—मी त्यास विचारिलें नाहीं आणि त्यानें सांगितलेंही नाहीं.

**बालंटाइन.**—महाराजांनीं शेवटल्या भेटीचे वेळेस रावजीस बाटली दिली हें तूं पाहिलेंस ना? पाहिलें नाहींस?

**नरसू.**—एक बाटली आमचे बंगल्यांत पेटीखालीं ठेविली होती खरी.

**दामोदरपंताची जबानी** (सरकारतर्फे.)

माझें नांव दामोदर त्रिंबक. मी गायकवाडाचा प्रायव्हेट सेक्रेटरी होतों. यशवंतरावांस व सालमास मी ओ-

ळखतों. महाराजांनीं मला सोमल आणावयास सांगितला. (बालंटाइन.– (दुभाष्यास) त्यांस वर महाराजांकडे पाहून बोला ह्मणावें, ह्मणजे त्यांस ऐकूं येईल.) मी फौजदारींत चिठ्ठी लिहिली पण तेथें सोमल मिळाला नाहीं. मग सोमल नुरुद्दिन वोहोऱ्याकडून आणिला व मी त्याची पुडी सालमास दिली. हिरे हेमचंदाजवळून आणले व यशवंतरावाजवळ दिले. यशवंता ह्मणाला, हे हिरे वाटून फेयूर साहेबांस द्यावयाचे. मी ह्मणालों, हें वाईट आहे. आश्विन वद्य १ सोमवार ह्या दिवशीं मीं हा विषप्रयोगाचा गवगवा ऐकला. मला ही वातमी महाराजांनीं सांगितली. ते ह्मणाले, ही गोष्ट वाईट आहे. आतां जर चौकशी चालली तर कोणी कबुल करूं नये. मला धरल्यावर सोजरांच्या पहाऱ्यांत ठेविलें, तेथें मी कंटाळल्यावरून कबूल झालों. मी जबानी देण्याचे पूर्वीं मला माफीची कबूली पेली साहेबानीं केली होती. रावजीला एक वेळ मी नवसरीस पाहिला. त्यास मी बडोद्यांत हवेलींत आलेला कधीं पाहिला नाहीं. हकीमजीकडून मकड्यामाशा, सापाचें विष व घोड्याचें मूत ह्याचें जें औषध आलें तें मी एका अत्तराचे शिशींत घालून सालमास दिलें. (कागद दाखविले) ह्या कागदांवर एके जागीं शाई सांडलेली आहे ती मी माझ्या कारकुनाकडून कांहीं कारणाकरितां सांडविली; ज्या भागावर सांडली ती सालमास दिलेली हजार रुपयांची रक्कम आहे.

**उलट प्रश्न** ( गायकवाडतर्फें. )

**बालंटाइन.**– आतां हे जे सर्व हिशेब तुह्मी सांगितलेत, हे सर्व खोटे केलेले आहेत ना ?

**दामोदरपंत.**— सर्व खोटे नाहींत; पण ह्यांपैकीं बहुतेक तसे खरे.

**वालंटाइन.**— आणि तुमच्या ह्मणण्याप्रमाणें हे खोटे हिशेब तुह्मी महाराजांच्या सांगीवरून लिहिले?

**दामोदरपंत.**— हो, महाराजांजवळ मी परवानगी मागत असें, आणि ते देत असत.

**वालंटाइन.**— आतां जर महाराजांनीं तुमच्यावर "तूं चोरी केली आहेस आणि त्याबद्दल हे खोटे हिशेब केले आहेस" असा आरोप आणिला असता तर असें करण्यास महाराजांची परवानगी आहे अशाबद्दल कांहीं पुरावा आपणांजवळ आहे का?

**दामोदरपंत.**— हो, ह्या यादी आहेत, भरपाया आहेत. ह्यांत कांहीं सर्व आहे.

**वालंटाइन.**— पण ह्या कागदांवर महाराजांची सहीबिही कोठें आहे?

**दामोदरपंत.**— मागल्या चार वर्षांत महाराजांनीं माझ्या खात्याकडील कोणच्याही कागदावर सही केली नाहीं.

**वालंटाइन.**— रावजी व नरसू यांनीं सूटर साहेबांपुढें जबानींत काय सांगितलें होतें हें तुह्मांला समजलें होतें काय?

**दामोदरपंत.**— होय, मला बातमी लागत असे, व ती मी महाराजांस सांगत असें.

**वालंटाइन.**— आतां ह्या विषप्रयोगाचे कामांत तुमचें अंग होतें, व रावजी वगैरे मंडळीस ह्या कामांत पकडलें होतें, हें तुह्मांस ठाऊक असतांनां तुम-

चा स्वतांचा व महाराजांचा बचाव करण्याकरितां, तुमचे जवळ ह्या विषप्रयोगासंबंधी जे कागद होते ते सर्व तुह्मी फाडून कां नाहीं टाकलेत? हे कागद तर तुमचे ताब्यांत होते.

**दामोदरपंत.**— हे फाडून टाकण्यास फुरसत नव्हती; कारण ते निरनिराळे ठिकाणीं होते.

**वालंटाइन.**— आतां जेव्हां एखादा कोणी विषप्रयोगाचा गुन्हा करितो त्याचें ह्या देशांत काय करितात? आमच्या देशाप्रमाणें त्यास येथें फांशी देतात काय?

**दामोदरपंत.**— कांहीं तरी शिक्षा त्यास देत असतील.

**बालंटाइन.**— पण अशा लोकांस कधीं फांशी देतात?

**दामोदरपंत.**— नाहीं, वडोद्यांत नाहीं. मी कधीं फांशी देतांना पाहिलें नाहीं.

**बालंटाइन.**— ह्या कागदांच्या योगानें तुमचा स्वतःचा व महाराजांचा जीव धोक्यांत होता, तर अशाप्रकारचे हे कागद कां फाडले नाहींत ह्याविषयीं तुह्मी बरोबर उत्तर कां देत नाहीं?

**दामोदरपंत.** मी उत्तर दिलें आहे. तसें करण्यास फुरसत नव्हती.

**बालंटाइन.**— हे कागद तुमचे ताव्यांत होतेना?

**दामोदरपंत.**— होय.

**बालंटाइन.**— तर मग कां फाडून टाकले नाहींत?

**दामोदरपंत.**—. जप्तीच येईल आणि असा प्रसंग येईल हें त्यावेळेस माहीत नव्हतें.

**बालंटाइन.**— आतां कृपाकरून ह्या प्रश्नाचें उत्तर द्या.

आपल्याच्यानें कागद फाडवले नाहींत तर मग त्यांचे काहीं भागांवर शाई कां सांडलीत?

**दामोदरपंत.**— ह्या मुकद्दम्यासंबंधी काहीं गोष्टी छपवण्या-करितां.

**दिनकरराव.**— कागद जसेचे तसेच असते तर महाराजांवर कोणचेही प्रकारचा वहीम आला नसता; पण जागोजाग शाई टाकली आहे ह्मणून वहीम आला आहे. तर ही शाई कां टाकली?

**दामोदरपंत.**— महाराजांनीं टाकण्यास सांगितली ह्मणून.

**वालंटाइन.**— अशी शाई टाकणें हें मूर्खपणाचें काम आहे असें तुह्माला पहिल्यानें वाटलें नव्हतें काय?

**दामोदरपंत.**— आतां मला असें वाटतें. आतां परिणामीं वाटतें.

**वालंटाइन.**— तुह्मीं काहींतरीं कबूल केलें नसतें तर तुमची तुरुंगांतून सुटका झाली असतीका?

**दामोदरपंत.**— झाली नसती.

**वालंटाइन.**— आतां तुह्मी येथून गेल्यावर कोठें असतां?

**दामोदरपंत.**—येथून नेतात. तंबूंत नेतात. ऊठ ह्मटलें कीं उठावयाचें, बस ह्मटलें कीं बसावयाचें.

**वालंटाइन.**— आतां हा वाटलींतील विषाचा प्रयोग केव्हां झाला?

**दामोदरपंत.**— मला आठवण नाहीं.

**वालंटाइन.**— सांगा, सांगा. तुमची आठवण धड आहे. ही वाटली रावजीजवळ तुह्मी केव्हां दिली?

**दामोदरपंत.**— मला आठवण नाहीं.

**वालंटाइन.**— तुह्मी सालमास विचारलें नाहीं काय कीं

साहेबांस मारावयास वाटली पाठविली त्याचें काय झालें ह्मणून?

**दामोदरपंत.**— नाहीं.

**हेमचंदाची जबानी** ( सरकारतर्फे )

माझें नांव हेमचंद. धंदा जवाहिऱ्याचा. नानाजी विठ्ठल ह्यांनीं मजजवळून हिरे घेतले नाहींत. मी एकदां त्यांचेकडे नेले होते ते त्यानीं परत दिले. नानाजी यानीं मला रुपये दिले ते माझ्या त्यांच्या स्वतःच्या देण्याघेण्याबद्दल. दामोदरपंतास मी कधीं हिरे दिले नाहींत. सूटर साहेबांनीं जबानी घेतली ती मला वाचून दाखविली नाहीं. जबरदस्तीनें सही करून घेतली. गजानन विठ्ठल ह्मणाले, "गप्प बैस, सही कर." जुलमानें घोटाळून गेलों ह्मणून सही केली. ( जबानी वाचून दाखविली) हें मीं बोललों नाहीं. सूटर साहेबांला वाटलें तें त्याणीं लिहिलें. ( चोपडीचें पान दाखविलें ) हें माझे हातचें आहे. गजानन विठ्ठलानीं जुलमानें मला तें लिहिण्यास लाविलें माझ्या चोपड्या दीडमहिना सूटर साहेबांकडे आहेत.

**उलट प्रश्न**—(गायकवाडतर्फे)

**बालेंटाइन.**— कधीं तुह्मी गायकवाडांस हिऱ्यांचे खडे दिले होते काय?

**हेमचंद.**—नाहीं, कधीं नाहीं.

**वालेंटाइन.**—कधीं हिऱ्याची भुकी करितांना पाहिलें आहे का?

**हेमचंद.**—नाहीं.

**वालंटाइन.**—ही जी जबानी लिहिली आहे ही तुह्मीं गजानन विठ्ठलापुढें दिली आहेका?

**हेमचंद.**—गजाननानीं हवें तसें लिहून घेतलें.

**वालंटाईन.**—तुह्माला वाचून दाखविली का?

**हेमचंद.**—नाहीं.

**वालंटाइन.**—आणि गजानन विठ्ठल ह्मणाले कीं जर तुह्मी सही न कराल तर तुह्मांला तुरुंगांत पाठवूं?

**हेमचंद.**—हो, आणि आजपर्यंत रोजच्यारोज मला त्रास देत आहेत.

**वालंटाइन.**—गजानन विठ्ठल आजकाल कधीं भेटले होते का?

**हेमचंद.**—हो, काल जबानीचे पूर्वी भेटले होते.

**वालंटाइन.**—काय ह्मणत होते?

**हेमचंद**—ते ह्मणाले, तीन लाख रुपयांचा तुझ्या नांवानें जमाखर्च केला आहे तो खोटा आहे.

**वालंटाइन.**—(चोपडी दाखवून) त्यांस रोजकीर्दींतील १० व २४ पान काढा ह्मणावें. (साक्षीदारास) ह्या दाहाव्या पानांत कांहीं रुपये जमा आहेत काय?

**हेमचंद.**—होय, नानाजी विठ्ठलाकडून २,००० जमा आहेत. हे ७,००० रुपये हुंडीचे येणें होते त्यांपैकीं आहेत. शिवचंद खुशालचंद यांवर हुंडी दिली होती त्याबद्दल हे आहेत.

**वालंटाइन.**—ही हुंडी कोठें आहे?

**हेमचंद.**—भरपै झालेली हुंडी आहे, व ती गजानन विठ्ठलाचे ताब्यांत आहे.

**वालंटाइन.**—गजानन विठ्ठलाचे हातीं ही कशी आली?

**हेमचंद.**—त्यांनीं मजकडून मागून घेतली.

**वालंटाइन.**–( हुंडीचा खोका आणवून ) त्यापैकीं ही एखादी आहे ?

**हेमचंद.**—हो, हीच. हिचे मागें भर्णपायी आहे.

**सार्जंट् वालंटाइन साहेबांचें भाषण** (गायकवाडतर्फे.)

**चिफ जस्टिस साहेब, राजेसाहेब व कमीशनाचे इतर सभासद्हो,**

मल्हारराव महाराज गायकवाड यांजवर नाहक विलक्षण जुलूम तर होऊन चुकलाच आहे. इतर ठिकाणीं महाराजांस इनसाफ मिळाला नाहीं परंतु आतां तरीं तो मी आपणांजवळ पदर पसरून मागतों. महाराजांवर हा फिर्यादीचा नाहक प्रसंग गुदरला आहे त्यास आधार काय, ही फिर्याद चालविली आहे कोणी, पुरावा काय आहे, साक्षीदार कोण आहेत, हा सर्व प्रकार आतां आपणांस समजून चुकला आहे. अशा प्रकारचा विलक्षण खटला निदान अर्वाचीन काळांत तर खचीतच कधीं न्यायकोर्टापुढें आला नाहीं, हें मी विनधास्त आपणांस कळवितों. ज्यांणीं हा पुरावा ऐकला असेल त्यांस दिसून आलेंच असेल कीं अत्यंत नीचपणाच्या खोट्या प्रतिज्ञादिकांनीं हा पुरावा भरला आहे. मजला असें ह्मणणें भाग पडतें कीं या अभाग्य व दुःखी राजाचें स्वातंत्र्य अशा प्रकारच्या पुराव्यावरून नाहींसें केलें, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. ज्या दुष्टांहीं ह्या खटल्यांत विनदिकत् खोट्या गोष्टी सांगितल्या, त्यांस असें वाटलें असावें कीं, इंग्रेज सरकाराची ज्यावर इतराजी झाली आहे, अशा ह्या मनुष्याविषयीं

आपण आतां कांहीं जरी बोललों तरीं तें पसंत होईल. आतां मी फार काय सांगूं, पण मला असें वाटतें कीं इंग्रेज लोकांतील प्राचीनकाळचे दुष्ट ओट्स् व डेंजरफिल्ड वगैरे मंडळी होऊन गेली त्यांचे प्राणांनीं भ्रमण करितां करितां या खटल्यांतील अति दुष्ट साक्षीदार रावजी व नरसू प्रभृति यांच्या कुडींत प्रवेश केला असावा; नाहीं तर आपणासारख्या अशा अत्यंत प्रामाणिक न्यायाधिकाऱ्यांसमोर ज्या ह्या दुष्टांनीं असत्यप्रतिज्ञापूरित जबान्या दिल्या, त्या देण्याची त्यांची छाती झाली नसती.

आतां या प्रकरणांत मुद्दे दोन. एक कापांतील शिपायांशीं महाराजांचा बेकायदा गुप्त संबंध, व दुसरा विषप्रयोगसंबंधी महाराजांवर आणिलेला आरोप. ह्या दोन मुद्यांवरच मात्र आपणास लक्ष द्यावयाचें. राजे लोक लहनाचे थोर कसे होतात, ह्यांजला खरें स्वातंत्र्य किती असतें, ह्यांचे विचार थोडेबहुत तरी कसे दुसऱ्याच्या शिकविण्यास अनुसरून असतात, हे सदोदित कसे नीचाहून नीच अशा चाकरांहीं घेरलेले असतात, व हे चाकर लोक जरी त्यांनां लुटीत व फसवीत असतात तरीही हे राजे लोक त्यांजवर कसा विश्वास ठेवितात हें सारें जगजाहीर आहेच. मी ह्या कमीशनांतील न्यायाधीशांस विनयपूर्वक सांगतों कीं महाराजांच्या पूर्वींच्या कृत्याविषयीं आपणांपैकीं कोणी आपल्या मनावर जो ग्रह केला असेल तो आपण आपल्या मनांतून काढून टाकावा. असें करणें हें न्यायास अनुसरून होईल व असें कराल तरच आपण गायकवाडाशीं व आपल्या देशाशीं न्यायानें वागलां असें होईल. या न्यायमंडळींतील राजे लोकांच्या सत्यप्रीतीवर व

सुज्ञपणावर विश्वास ठेवून जो त्यांजला या प्रसंगीं अधिकार दिला आहे तो त्यांणीं कसा वजाविला याविषयीं त्यांस या विस्तीर्ण भरतखंडांत जबाब देणें आहे. या मंडळीपैकीं महेशबांधव जे आहेत, त्यांजपाशीं माझें इतकेंच मागणें आहे कीं त्यांणीं पक्षपातरहित व योग्य रीतिचा अभिप्राय द्यावा.

आतां पुराव्याविषयीं विवेचन करितांना प्रथम पोलीसासंबंधी विचार करण्याचा माझा हक्क आहे. या देशांतील ह्या लोकांसंबंधी कायद्यावरून असें दिसतें कीं, ह्या लोकांच्या समोर झालेल्या जबान्यांवर विश्वास ठेवितां येत नाहीं. त्यांजला प्रत्यंतरीं पुराव्याची वळकटी असलीच पाहिजे. परंतु असें दिसतें कीं ह्या वडोदे शहरास पोलिसासंबंधी कायदे मुळींच लागू नाहींत. पोलिसाचा शिपायी, हा यथेच्छ वागूं शकतो. हे लोक हवा त्याला, हवें त्या ठिकाणाहून ओढून आणितात व हवे तितके दिवस त्याला अटकेंत ठेवितात; पण कोणी त्यांस ह्याबद्दल कांहींच विचारीत नाहीं. ही स्थिति माझ्या समजुतीप्रमाणें तर केवळ राक्षसकृतीसारखी दिसत आहे व तिच्यापासून घोर अन्याय होत असतील.

आतां ह्या खटल्यांत खुद्द गायकवाड मल्हारराव यांच्या हातून अमुक एक गोष्ट घडली, किंवा अमुक कृत्य त्यांनीं केलें, असें सामील साक्षीदारांच्या सांगण्याखेरीज अव्वलपासून अखेरपर्यंत कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराच्या तोंडांतून निघालें नाहीं.

ज्या स्थितींत महाराजांस हल्लीं ठेविलें आहे तिजविषयीं मी आतां ज्यास्त कांहीं ह्मणत नाहीं. महाराजांची सर्व

जिनगी याचे लोकांच्या रीतीप्रमाणें हरण करण्यांत आली आहे असें मी ह्मणतों. गायकवाडांची अशी स्थिति हल्लीं झाल्यामुळें, त्यांच्या स्वसंरक्षणाचें साधनही त्यांच्या हातीं राहिलें नाहीं. सारांश, ते अशा दुःखसागरांत पडले आहेत कीं हा त्यांजवर जो आरोप ठेविला आहे तो उडवून देण्यास त्यांस सहजच फार अडचणी उत्पन्न झाल्या आहेत.

आतां ह्या प्रकरणांत पहिल्यानें एक मोठी महत्वाची गोष्ट आहे ती ही कीं, ह्या मोकदम्याच्या संबंधानें अव्वलपासून अखेरपर्यंत महाराजांची वर्तणूक कशी रास्त, सरळ व सचोटीची आहे, ह्या गोष्टीकडे आपण मनापासून लक्ष्य द्यावें हें माझें आपणांजवळ मागणें आहे. गायकवाडांच्या वर्तणुकीविषयीं सर लुईस पेली याणीं आपला अभिप्राय दिलाच आहे. त्यांचे सांगण्यांत गायकवाड हे सर्व रीतीनें समजुतीचे गृहस्थ आहेत, त्यांच्या राज्याच्या हिताची व्हाइसराय यांच्या मर्जीला अनुसरून असणारी अशी कांहीं गोष्ट त्यांनां सुचविली तर त्याप्रमाणें करण्यास ते अगदीं तयार असत. अशी तर ह्या राजाची वर्तणूक आहे. असें असतांनां फेयूरसाहेबांशीं वेबनाव कसा उत्पन्न झाला? जें जें महाराज करीत गेले त्या त्यास फेयूरकडून हरकतच होत गेली. फेरसाहेबांची वर्तणूक अगदी अविचाराची होती. जो मनुष्य गायकवाडाचा कट्टा दुस्मान त्याच्याशीं फेयूरचीं दररोज तर काय, पण अहोरात्र खलबतें होत असत. असा हा ( फेयूरसाहेबांचे मताप्रमाणें ) सचोटीचा गृहस्थ भाऊ पुणेंकर हा त्यांचा हेर होता. जशी गुप्त बातमी मिळविल्याबद्दल गायकवाडांवर आरोप ठेविला आहे

तशीच बातमी मिळविण्याचें काम आपल्या अनेक सोबत्यांस घेऊन रात्रंदिवस हा पुणेंकर करीत असे. अशा प्रकारें ह्या गृहस्थाच्या मुठींत कर्नलफेयूर असतांनां गायकवाडानें तारीख २ नवंबर रोजीं खरीता लिहून पाठविला यांत काय आश्चर्य वरें. आतां हें विषप्रयोगाचें काम करण्यास गायकवाडांस हेतु काय. कर्नल फेयूर साहेबांस दूर करण्याबद्दल खरीता लिहिणें व विषप्रयोग करणें हे दोन्ही प्रयत्न एकमेकांशीं जुळत नाहींत. ह्या सर्व विषप्रयोगाचे प्रकरणांत महाराजांची वर्तणूक कशी एखाद्या निरपराधी मनुष्यासारखी होती. त्यांच्या बैठकीखालीं जसा काय दारूचा सुरुंगच तयार केला होता व त्याला पेटविण्याचाच मात्र अवकाश. तो पेटला कीं आपण एकदम जळून खाक होऊन जाऊं, असें त्यानां ठाऊक असतां ते निश्चित त्या बैठकीवर स्वस्थ बसले होते व आपल्या नित्यक्रमाप्रमाणें उद्योग करीत होते. ह्या खटल्याच्या चौकशीचे कामीं सर्व प्रकारें जी मदत लागेल ती करण्यास महाराज तयार झाले. अशी वर्तणूक व हिंम्मत, खुनी मनुष्याची असेल काय? मला तर ह्यावरून असें वाटतें कीं, महाराजांचे मनांत विषप्रयोग करण्याचें बिलकुल नव्हतें व त्यांची वर्तणूक पाहिली असतां निःसंशय असें दिसतें कीं, त्यांत ते बिलकुल सामील नव्हते.

ह्या खटल्यांत साहेबाचा खून करण्याचा विचार गायकवाड शेकडों मनुष्यांस कळवून त्यांचे हातीं आपली मान देतील काय? असें असतां कर्नल फेयूर साहेबांचा जीव घेण्याचा महाराजांनीं उघड बाजार मांडला होता! हें कशाकरितां तर आपले विरुद्ध मजबूत पुरावा मिळण्याकरितां!

आतां ह्या खटल्यांतील मुख्य साक्षीदार दामोदरपंत. ह्यांच्या जबानीविषयीं मी पहिल्यानें आपले विचार सादर करितों. खरोखरी पाहिलें असतां ह्या खटल्याचा उद्भव प्रथम दामोदरपंतापासूनच. ह्या कामांत हे गायकवाडाचे मुख्य कारभारी. आतां ह्यांचे जबानी घेण्याचा प्रकार असा. प्रथम सोळा दिवस ह्यांस गोरेलोकांचे पाहाऱ्यांत ठेविलें. ह्यानीं असें प्रत्यक्ष कबूल केलें कीं मी ह्या गोरे लोकांचे पहाऱ्यांतून मुक्त होण्याकरितां मला जें सांगावयाचें तें सांगितलें. पुढें त्यांस पोलिसाचे ताब्यांत दिलें. त्यावेळीं रावजीची व नरसूची जबानी झाली, हें त्यांस ठाऊक होतें. मग पुढें हें सर्व ठाऊक झाल्यावर सोमल व हिऱ्याची भुकी, ह्यांसंबंधी कशी तरी जुळवा-जुळव करण्याची, हें ह्याचें काम राहिलें. ह्या साक्षीदाराची अशी स्थिति होती कीं, "बाबारे, गायकवाडांवर तोहोमत घालशील तर तूं आपला मोकळा होशील. जर गायकवाडांला मोकळा करशील तर तूं आपला गळा गुंतवून घेशील."

आतां हे दामोदरपंत आपल्या जबानींत पहिल्यानें असें ह्मणतात. फौजदारींतून सोमल मिळेना. फौजदार तर ह्मणतात हा मिळण्यास पंतास काडीची देखील हरकत झाली नसती. कदाचित् हा सोमल मागविण्यांत दामोदरपंताचा कांहीं स्वतांचा मतलब असावा. बोलून चालून पंतास रेसिडेन्सींत कोणी जोड्यापुढें देखील उभा करीत नसे, व महाराजांनींही त्यास आपलेबरोबर कधीं कापांत नेऊं नये असें होतें. ह्यावरून दामोदरपंतास असें करण्यास कांहीं तरी हेतु होता पण महाराजांस तर

मुद्दल नव्हता. बरें, पुढें दामोदरपंतांनीं नुरुद्दीन वोहोरी ह्याजकडून सोमल आणविला. आतां हा येथें आणखी एक पोलीसाचे तयारीचा व जुळवाजुळवीचा विलक्षण मासला आहे. नुरुद्दीन हा गायकवाडाचा हाडवैरी आहे. तेव्हां पंतानीं हा मनुष्य उत्तम शोधून काढला. आतां येथें पोलीसानें ह्याच्याशीं काय प्रकार केला आहे! हा मनुष्य जें दामोदरपंत ह्मणतो त्याप्रमाणें ह्मणत नाहीं ह्मणून ह्यास पोलीसानें मला वाटतें तुरुंगांत पाठविला, हवा तितका ह्याचा पिच्छा पुरविला, ह्यावर जुलूम केला परंतु त्यांच्याच्यानें ह्याला वळवून घेववलें नाहीं. तर आतां ह्यावरून हें निःसंशय सिद्ध होतें कीं दामोदरपंतानें कधीं कोणाजवळून सोमल आणविल्याचा मुद्दल पुरावा नाहीं.

असो, आतां पुढें हिऱ्याचे भुकीविषयीं विचार करावयाचा. आतां ही हिऱ्याची भुकी ह्मणजे विष हें, व कधीं हिरे फोडून त्यांची भुकी होते हेंही मी जन्मांत ऐकिलें नव्हतें. बरें घटकाभर ही गोष्ट घेतली तर, गायकवाडास एवढा द्राविडीप्राणायाम करण्यांत काय अर्थ? मुद्दाम चोपड्यांत खोट्या रकमा घालण्यास सांगून हिरे विकत घेण्यास कशाला? नामदारखान्यांत जडावाचें वगैरे काम चाललें होतें, त्यापैकीं थोडासा हिऱ्याचा कीस त्यांस मिळणें अशक्य होतें काय? जशी सोमलाची गोष्ट तशीच ही हिऱ्याची. या खटल्याच्या पुराव्यावरून असें खचीत दिसून येतें कीं हा सर्व खटला गायकवाडाविरुद्ध बनावट रचला आहे.

आतां हा मी आपणापुढें दामोदरपंताविषयीं माझ्या विचारासह पुरावा सादर केला आहे. याविषयीं आपण

निस्पृहतेनें उत्तम प्रकारचें मत ठरवावें ही माझी आपणांस प्रार्थना आहे.

आतां पुढें हेमचंदाचे जबानीविषयीं विचार करीत असतां, महाराज, हा दुर्दैवी मनुष्य आपली जबानी पहिल्यानें पोलिसापुढें दिली, ती खोटी आहे असें ह्मणण्यास तयार झाला. हा ह्मणतो कीं ही जबानी पोलिसानें जबरदस्तीनें मजजवळून लिहून घेतली, मजवर जुलूम केला, मी कबूल होईपर्यंत मला अटकेंत ठेविलें, मजकडून मी वहीचीं पानें फाडून टाकून खोट्या रकमा लिहिल्या असें कबूल करून घेतलें, आणि मला सूटर साहेबांपुढें जाण्याचे पूर्वीं असेंही सांगितलें कीं जर तूं कबूल न करशील तर तुला तुरुंगांत टाकूं. ही याची हकीगत आहे. हा ह्मणतो, मजजवळून पहिल्यानें हिरे नेले होते पण पुन्हा परत दिले. माझ्या चोपडींतील जरी पोलिसानें मजकडून पानें फाडविलीं तरीं त्या पानांतील हिशेब मजजवळ दुसरे चोपडींत आहेत. या फाडलेल्या पानांत गायकवाडांस दिलेल्या हिऱ्यासंबंधी जमाखर्च नव्हते, पण दुसरे कांहीं होते, हें, जेव्हां गजानन विठ्ठलाजवळून हुंड्यांचे त्यानें छपविलेले खोके मी बाहेर काढविले तेव्हां पूर्ण उघाडीस आलें. बरें इतकेंही असून हेमचंदाचे चोपडींत गायकवाडांच्या खात्यास लिहिलेली एक रकम सांपडते व ती हे लोक खरी आहे असें ह्मणतात. आतां ह्या हिशेबाच्या चोपड्या आपणांसमोर आहेत, हे हुंड्यांचे खोके आहेत, व हेमचंदाचे जबानीविरुद्ध बोलणारा एक साक्षीदारही नाहीं, नानाजी विठ्ठलाचा व हेमचंदाचा ह्या कामीं बराच व्यव

हार असतांही त्याचे जबानीचे वेळेस त्यास ह्यासंबंधी एकही प्रश्न विचारण्यांत आला नाहीं, ह्या सर्व गोष्टींवरून हेमचंदाचा व्यवहार चोख आहे, त्याजवळून हिरे मुद्दल ह्या विषप्रयोगाकरितां खरेदी केले नाहींत, पोलीसानें त्याजवर जुलूम करून हवेंतसें कबूल करून घेतलें होतें व त्याजकडून मुद्दाम भीति घालून वहीचीं पानें फाडविलीं, व सूटरसाहेबापुढें लबाड्या सांगविल्या हें निःसंशय सिद्ध होतें. या पोलिसचे लोकांचा निर्दयपणा इतक्या थरास पोहोंचेल, हें मला पहिल्यानें वाटलें नव्हतें, पण ह्या कामीं मी जेव्हां पूर्ण विचार केला, व माझी खातरी झाली, तेव्हां ही गोष्ट मी आपणांस कळविली व मी न कळवितांही आपल्या ध्यानांत आलीच असेल. आतां या खटल्यामध्यें प्रत्यक्ष साक्षीदाराचे तोंडानें निष्फळ हें झालें कीं, सोमल नाहीं, हिऱ्याची भुकी नाहीं, हिरे कधीं विकले होते कीं नाहीं ह्याविषयीं संशयच, नुरुद्दिनाजवळून सोमल विकत घेतला याविषयीं काडीचाही पुरावा नाहीं. ज्या चोपड्यांमध्यें याविषयीं जमाखर्च सांपडावयाचे त्यांस ठिकाण नाहीं, सारांश ज्यावर हा सर्व विभू रचला व ज्यावर हा मोकद्दमा पूर्ण अवलंबून आहे, त्याचे अव्वलपासून अखेरपर्यंत, तुकडे तुकडे उडाले व सरतेशेवटीं राहिलें काय, तर दामोदरपंतानें सांगितलेली अविश्वसनीय गोष्ट. दामोदर पंतानें पहिल्यापासून शेवटपर्यंत एक लबाड्या सांगितल्या असतील, किंवा त्याचा बेत विषप्रयोग करण्याचा असेल. आतां रावजीचे जबानीविषयीं विचार करीत असतांना पहिल्यानें हा बाटलीचा प्रकार मोठा विलक्षण आहे. अव्वलपासून अखेरपर्यंत बाटली एक. ती सुमारें अर्ध्या बोटायेवढी. तेव्हां त्यांत सोमल

कसा घालतां येईल, पाणीं कसें घालतां येईल. हा प्रकार येथून तेथून सर्व झूट आहे. ह्या बाटलीचे प्रकरणांत कोणच्याही गोष्टीचा मेळ ह्मणून नाहीं. या प्रकरणांत दोन बाटल्या होत्या काय? होत्या असें ह्मटलें तर अत्तराच्या कुपीची काय वाट? रावजीनें दुसरी बाटली पैदा केली होती काय? तर मग ह्यासंबंधी त्याचे जबानीची काय वाट? रावजी ह्मणतो कीं, ही बाटली मला महाराजांकडून ह्या सोमलाच्या पुड्या मिळाल्याच्या एक महिना पूर्वी मिळाली. नरसू ह्मणतो कीं, विषप्रयोगाचे आधीं दोनचार दिवसांवर मिळाली. दामोदरपंत ह्मणतो, मीं त्याजकडे बाटली पाठवून दिली. आतां ह्यांत कोणती गोष्ट खरी! बरें, ह्या बाटलीस कापसाचें व मेणाचें बूच होतें, तरीं देखील त्यांतून हें विष बाहेर निघालें व त्याचे योगानें रावजीचे पोटास फोड झाला व असा होऊं शकेल असें डाक्टर ग्रे साहेबांसारखे अनुभविक गृहस्थ ह्मणतात. आतां हा अप्रयोजक व मूर्खत्वाचा प्रकार जर साधारण बाबतींत असता तर फक्त हास्योत्पादक ह्मणून सोडून दिला असता, पण जो मनुष्य हा पुढें आणतो त्याच्या पुराव्यावरून साधारणरीत्या जर एखादा राजा राज्यास मुकणार आहे तर मात्र हा सर्वांनी विचारणीय आहे.

आतां ह्या सोमलाचे पुड्यांविषयीं रावजी सूटर साहेबांपुढें असें ह्मणतो कीं, काळी व तांबडी पुडी मीं एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें मिसळली. आतां येथें प्रतिज्ञेवर ह्मणतो कीं एका पुडीपैकीं थोडा भाग मी आपल्या पल्यांत ठेविला. ह्या दोन गोष्टी एकमेकींशीं जुळतात काय? आतां ही एक भुकी वगळण्यास यास हेतु काय असावा? हा ह्मणतो कीं

दोन पुड्यांपैकीं एकींतील भुकी जास्ती विषारी होती.” कशावरून? ह्यास हें कसें समजलें? ह्याच्या ह्मणण्याप्रमाणें फेयूर साहेबांस विषप्रयोग करण्याकरितां तर यानें ह्या पुड्या सरबतांत टाकल्या, तर मग ह्यानें जी जास्ती विषारी पुडी होती ती घालावयाची टाकून, कमी होती ती कां घातली? याप्रमाणें हा प्रकारही येथून तेथून सर्व असंगत आहे. परंतु खचीत ह्या पञ्चांतील राहिलेल्या सोमलाचे पुडीचा पुढें उपयोग होता. रावजीला ह्या पञ्चांतील पुडीविषयीं विस्मरण झालें! परंतु अकबरअल्लीची बुद्धि विलक्षण होती. त्यांना वाटलें कीं जसें बाटलींतील औषध बुचांतून बाहेर येऊन त्याचे योगानें पोटास फोड झाला, त्याप्रमाणेंच पञ्चांतून सोमल कदाचित् बाहेर पडून त्याचे योगानें पञ्चावर वण उठतील. अकबरअल्ली पट्टा चांचपून पहात असतां त्यांस त्यांत पुडी आहे असें वाटतें, आणि लागलाच त्यांस ईश्वरी दृष्टांत होतो कीं या पुडीमध्यें सोमल आहे. असें होण्याबरोबर हे सूटर साहेबांस बोलावणें धाडतात. सूटर येतात व ह्मणतात “गॉड् ब्लेस्मी” ह्यांत तर हा सोमल आहे! हा पट्टा मोठ्या विलक्षण प्रभावाचा आहे, व पदार्थसंग्रहालयांत ठेवण्यास योग्य आहे. ह्याकडे पाहून लोक आश्चर्यच करून राहतील. सारांश, ह्या सर्व पञ्चाच्या हकीगतीवर कोणीही विश्वास ठेवणार नाहीं, आणि जेव्हां ही हकीगत अकबरअल्लीसारख्याच्या तोंडांतून येते तेव्हां तर ह्यांत तथ्य किती आहे हें सहज दिसून येतें. मी ह्या कमीशनापुढें व सर्व जगापुढें असें ह्मणतों कीं ह्या पट्यांत सोमलाची पुडी अकबरअल्लीनें पहिल्यानें घालून ठेविली, व मग

पुढें सूटर साहेबांस बोलावून आणून त्यांस काढून दाखविली.

आतां पुढें रावजीची आणखी एक लबाडी. पेद्रू हा प्रतिष्ठित साक्षीदार आहे. हा जातीचा पोर्टुगीस आहे, ह्याची जबानी मुंबईस एडिंगटन् साहेबांपुढें झाली. हे मोठे प्रतिष्ठित गृहस्थ आहेत. पेद्रू हा साहेबांचा २५ वर्षांचा नोकर आहे. तो कांहीं हेतूशिवाय साहेबांस विषप्रयोग करण्याचें मनांत आणील काय, हें आपण जाणतच असाल. हा मनुष्य प्रतिज्ञेवर सांगतो कीं मीं कधीं महाराजांकडे गेलों नाहीं व त्यांची माझी बोलाचाली झाली नाहीं, व रावजी तर कांहीं निराळेंच सांगतो.

आतां या मोकद्दम्यांत नरसूला उगीच ढकलून दिला आहे. याच्या जबानीवरून दिसतें कीं या गुन्ह्यासंबंधी याला फारशी कामगिरी कधींच करावी लागत नसे.

रावजीचे जबानीस पडताळा मिळावा ह्मणून ह्यास आणिला आहे, परंतु ह्याच्या व रावजीच्या जबानीमध्यें मेळ आहे काय? रावजी ह्मणतो, महाराजांनीं लाख रुपये देऊं केले. नरसू ह्याबद्दल कांहीं सांगत नाहीं. ह्मणतो, तुमचें बरें करूं असें महाराज ह्मणाले. ह्या मनुष्याची जबानी घेण्याचाही प्रकार मोठा विलक्षण आहे. खटल्यांतील मुख्य मुख्य गुन्हेगार यांस माफी दिली आहे व ह्या दुर्दैवी मनुष्याचा त्यांत फारसा संबंध नसतांनाही त्याला माफी कबूल केली नाहीं. ह्याचे जबानींतील विहिरीचें प्रकरणही मोठें चमत्कारिक आहे. नरसूला केलेल्या कर्माचा पश्चात्ताप झाल्या कारणानें पोलिसाच्या पहाऱ्यांतून पळून जाऊन त्यानें विहिरींत उडी घातली अशा प्रकारचा पुरावा पाहिजे होता पण नरसू

स्वतः कबूल करितो कीं माझें डोकें फिरून मी विहिरींत पडलों. ह्यामुळें सर्व फसलें. आतां हा पोलिसाच्या पहाऱ्यांतून सुटला कसा, त्यांनीं ह्याला विहिरींत उडी घालूं दिली कशी, वगैरे सर्व प्रकार चमत्कारिक आहे. बरें, ह्या शिपायांस कोठें या कोडतापुढें प्रत्यंतरीं पुराव्याकरितां आणिलें नाहीं. हा प्रकार सारा खोटसाळ दिसतो. ह्याप्रमाणें नरसूचे पुराव्यासंबंधी थोडक्यांत हकीकत आहे.

सारांश, ह्या खटल्यांत दामोदरपंतास सोमल मिळाल्याचा पुरावा नाहीं, हिऱ्याचीही भुकी मिळाल्याचा पुरावा नाहीं, पत्र्याचें प्रकरण तर सब झूट असून हास्योत्पादक आहे, आणि बाटलीविषयीं विचार केला असतां दामोदरपंतानें हिजविषयीं हकीगत सांगितल्याचे पूर्वी रावजीचे तोंडून एक अक्षर देखील निघालें नाहीं. सोमलाविषयीं रावजी ह्मणतो कीं, मी एकदां त्याचा अशा एक रीतीनें उपयोग केला व येथें प्रतिज्ञेवर कांहीं निराळेंच सांगतो. ह्याच्या पट्यांतून सोमलाची पुडी निघाली त्याचीही हकीगत सांगितलीच आहे. नरसूची जबानी रावजीच्याशीं किती मिळते, नरसूचें नशीब प्रत्येक गोष्टींत अडवें कसें येत असे, रावजीनें व नरसूनें फेयूर साहेबांजवळ व एकमेकांजवळ लबाड्या कशा सांगितल्या आहेत, व ह्या सर्व प्रकरणांत पोलिसाचा कशा रीतीचा उद्योग आहे वगैरे, हे सर्व प्रकार मीं आपणांपुढें निवेदन केलेच आहेत. हा विषप्रयोग जर झाला असेल तर तो करण्यास दामोदरपंतास कांहीं हेतु होता, पण महाराजांस मुद्दल नव्हता. रेसिडेन्सींतील चाकर लोकांस इतर कामीं महाराजांनी पैसे देणगीदाखल दिले आहेत पण ह्या विष-

प्रयोगाचे कामांत एक छदामही त्यांस मिळाला नाहीं. महाराजांवर कापांतील चाकर लोकांशीं गुप्त बातम्या मिळविण्याविषयीं तोहोमत ठेविली तर, फेयूर साहेबांवरही त्याप्रमाणेंच ठेविली पाहिजे. ह्यांस तर प्रतिक्षणीं हेराकडून दरबारांतील खबरा मिळत असत. ह्या खटल्यामध्यें एखादा इमानी व निस्पृह साक्षीदार येऊन ह्मणजे त्यानें कोणच्याही रीतीने गायकवाडावर तोहोमत ठेविली आहे असा मुद्दल प्रकार झाला नाहीं. ह्या खटल्यांतील पुरावा सर्व अविश्वसनीय आहे, आणि ह्यावरून आणिलेला गायकवाडावर आरोप मुद्दल शाबीत होत नाहीं, हें मीं विनयपूर्वक कोर्टापुढें सादर करितों. ह्या पुराव्याविषयीं आपण आणखी फार बारकाईनें विचार करावा ही माझी आपणास प्रार्थना आहे. हा असा बारकाईनें विचार करून पाहिला असतां, मी सांगितल्या नाहींत अशा देखील कांहीं गोष्टी ह्यांत आढळतील आणि त्यावरून गायकवाड ह्या कामीं निर्दोषी आहेत अशी आपली खातरी होईल. महाराजांस राज्यावरून दूर केले आहेत, त्यांच्या प्रजेपुढें त्यांची विटंबना झाली आहे, त्यांच्या तर्फे एकही मनुष्य ह्या खटल्याचे पूर्व चौकशीचे वेळीं साक्ष देण्यास धजत नव्हता, असा प्रकार असतानां ह्यानीं प्रतिज्ञेवर मी निरपराधी आहें असें कोर्टापुढें सांगितलें आहे, आणि मी महाराजांच्या वकीलाच्या नात्यानें ह्या पुराव्यावर बोलावयाचें तें बोललों आहें. आतां शेवटीं ज्या पुराव्यावरून ह्या राजास गादीवरून दूर करावयाचा उद्योग केला होता त्या पुराव्यावरून यःकश्चित् एखाद्या खिसेकाप्याचीही सुटका होऊं शकेल असा

ह्या न्यायी कोर्टानें निर्णय करावा अशी मी विनयपूर्वक प्रार्थना करितों.

---

## अंक ७.

### प्रवेश १.

डाक्टर सीवर्डचा बंगला.

मल्हारराव, सार्जंट वालंटाइन. शांताराम नारायण.

**शांताराम.**— महाराज, बालिष्टर साहेब आले आहेत. ते जाणार ह्मणतात येत्या सोमवारीं विलायतेस.

**महाराज.**— ( सा. वालंटाइन यांस ) आपले मजवर पूर्ण उपकार आहेत. आपणांस मजकरितां इतके पांच हजार कोस धांवत येण्यास परमेश्वरानेंच बुद्धि दिली असें ह्मटलें पाहिजे; नाहीं तर आपणांसारख्यांचें कसलें इतकें लांब येणें व्हावयाचें.

**वालंटाइन.**—महाराजांसारख्यांच्या वर असा नाहक प्रसंग गुदरल्यावर आमच्या सारख्यांनीं जर मेहनत करूं नये तर काय आमचें जिणें.

**महाराज.**—आपण जाणार इतक्यांत? माझे मनांत होतें कीं साहेबांनीं कांहीं दिवस आणखी राहून मला ह्या खटल्यांतून पूर्णपणें बाहेर काढावें आणि मग जाण्याचा बेत करावा.

**वालंटाइन.**—महाराजानीं आतां काळजी करूं नये. परमेश्वराचे कृपेनें महाराजांवरून खचीत आतां हा प्रसंग लवकरच दूर होईल असें मला वाटतें. मीं

आणखीही राहिलों असतों, पण ह्या तुमच्या देशांतील हवा फार उष्ण, मला मानत नाहीं, काय करावें, शिवाय विलायतेंत आणखी दुसरे खटले मागें आहेत.

**महाराज.**— खुशाल जावें साहेबांनीं. पुनः पुनः मी सांगतों, साहेब, आपले मजवर फार उपकार आहेत. ह्या माझ्या कामांत साहेबांनीं भारी मेहनत घेतली. काय गंभीरपणा ! किती हा सुशील स्वभाव! काय ही परोपकार करण्याची इच्छा ! कोण ही विद्वत्ता! गुण वर्णन करावे तेवढे थोडेच; पण ह्याचें योग्य मजकडून जसें व्हावें तसें झालें नाहीं. फूल ह्मणून फुलाची पांकळी ग्रहण करावी साहेबांनीं. आपले प्रयत्नानें व माझे सुदैवानें जर परमेश्वरास मज गरीबाची दया आली तर मीं आपले उपकार फेडीन. माझी स्थिति तर साहेब पहातातच आहेत !

**वालंटाइन.**—( गहिंवरून ) महाराजांस एकदा पूर्ववत् राज्यपद मिळावें व आह्मी असें कानानीं ऐकावें, येवढेंच आतां ऐकण्याची इच्छा; तेवढें एकदां ऐकिलें कीं आमचे श्रमांचें व मेहनतीचें सार्थक झालें.

**शांताराम.**— महाराज, मेहेनत अशीच साहेबांनीं केली आहे. ह्या देशाची, किंवा येथील लोकांच्या रीतिभातींची माहिती नसतांनां देखील ह्या खटल्यांत ह्यानीं बहार करून सोडली. विद्वत्ताच विलक्षण !

**वालंटाइन.**—महाराज, ह्या इतर मंडळीची मदत होती ह्मणूनच ह्या गोष्टी ह्या थरास पोंहचल्या, नाहीं

तर मी एकटा काय करणार होतों. येतों तर मी आतां ( सलाम करितात. )

**महाराज.**—यावें साहेब, (दोन पावलें पोहोंचविण्यास येतात. पण पाहऱ्यावरील सोजीर पाहून खिन्न होऊन मागें परततात.)

( सर्व जातात.)

---

## अंक ७.

### प्रवेश २.

दरकदार मंडळी.

**तात्यासाहेब, आपासाहेब, अण्णासाहेब, रामभाऊ, गंगाधरपंत.**

**तात्यासाहेब.**— कां अण्णासाहेब, हें कमीशन तर अटोपलें. आतां आपणांस कसें काय वाटतें ह्या प्रकरणाबद्दल ?

**आपासाहेब.**—कायहो, माझी तर खातरी होते कीं महाराज खचीत पुन्हां गादीवर येतात. मोकद्दम्यांत कांहीं हशील नाहीं.

**अण्णासाहेब.**—हां ! मी तर ह्यानां हेंच सांगतों तरी ह्यांची खातरी होत नाहीं. अहो, त्या बालिष्टरानें खटल्याचे तुकडे तुकडे उडवून दिले किहो. जाडा विद्वान् तो!

**गंगाधरपंत.**—खरेंच. अहो, काय एकसारखा तीन दिवस कसा बृहस्पतीसारखा बोलत होता. एक दो-

न वेळां तर त्यानें मंडळीच्या डोळ्यांतून टिपें काढिलीं.

**रामभाऊ.**—पण तात्या साहेब, माझी तर अशी मनदेवता साक्ष देत नाहीं. जबान्या जबर पडल्या आहेत, दामोदरानें शेवटीं कमाल करून सोडली. महाराजांवर प्रसंग कठीण तर खराच!

**तात्यासाहेब.**—मलाही बेटें असेंच वाटतें, मोठा बृहस्पति उतरला तरी काय होणार आहे? अहो, काय एकापेक्षां एक वीर महावीर जबानी देण्यास आले होते. त्यांनीं सांगितलें तें सगळेंच कसें खोटें असेल?

**हरीपंत.**—काय आपण ह्मणतां! एवढे चाळीस साक्षीदार झाले, तितक्यांमध्यें गायकवाडाचें नांव घेणारे तिघेच कीं नाहीं. त्यांमध्यें दोघांना माफीचीं सरटिफिकिटें मिळालेलीं.

**गंगाधरपंत.**—महाराज खचीत ह्या प्रसंगांतून मुक्त होतील. तो कोच साहेब फार निःस्पृह, त्यानें कसा मोठ्या बाण्यानें पूर्ण लक्ष देऊन खटला ऐकून घेतला. आपले बालिष्टरास तरी किती मान देत होताहो तो.

**अण्णासाहेब.**—ह्या साहेबलोकांची निःस्पृहपणाविषयीं कमाल आहे मोठी. भारी मेहेनती व मोठे वस्ताद, पुष्कळ कामांत न्यायीही खरेच. त्यांची ती व्यवस्था, शांतपणा व विद्वत्ता कांहीं खेरीज आहेत. आमचे राज्यांत असें होणें स्वप्नींही नाहीं. आहे का कधीं?

**तात्यासाहेब.**—ही गोष्ट मात्र खरी. नाहीं तर आमचें कोर्ट रुपये व नजराणे उकळण्याचें!

**अण्णासाहेब.**—आह्मी तर आपले या कामीं अडाणी आहोंत, पण तुमचीं हीं सर्व संभाषणें ऐकून मनदेवता पूर्ण साक्ष देते कीं सरकार गादीवर खचीत येणार. अहो, काय सांगावें. महाराजांकरितां सगळें हिंदुस्थान हळहळतें आहे. पण जोशीबावा सांगतात कीं महाराजांवरचें अरिष्ट महिना पंधरा दिवसांत पार होणार आहे. परमेश्वर करो आणि असेंच होवो.

**गंगाधरपंत.**—हिंदुस्थानांतील इंग्रजी व एतद्देशीय सर्व वर्तमानपत्रेंही आपलेकडचीं आहेत. फार तर काय, पण विलायतेंतील मोठें राज्यकारस्थानी पत्र "टाइम्स" हेंही महाराजांकडचें आहे.

**तात्यासाहेब.**—कोण विचारतो या वर्तमानपत्रांस—बडबडतात आपलीं हवीं तशीं.

**गंगाधरपंत.**—काय ह्मणतां आपण तात्यासाहेब. अहो, हीं वर्तमानपत्रें तर इंग्रजी राज्यसुधारणेचे ध्वजस्तंभ आहेत. सरकारांतही त्यांचें वजन मोठें असतें. टाईम्स पत्र तर विलायतेचें सर्व राज्य चालवितें असें ह्मटलें तरी चालेल.

**अण्णासाहेब.**— हां ! इतकें का ह्या पत्रांचें महत्त्व आहे !!

**गंगाधरपंत.**— ह्यांत काय संशय, आणखी एक दुसरी वातमी आहे कीं विलायत सरकारामध्यें व हिंदुस्थान सरकारामध्यें मोठा मतभेद पडला आहे. ह्मणून निकालास उशीर.

**तात्यासाहेब.**— हां ! तो कसा काय, एक ह्मणत असेल महाराजांस गादीवर बसवूं नये ह्मणून. तसें झालें तर बरें.

**गंगाधरपंत.**— पण विलायतसरकार ह्मणतें कीं वसवावें. गायकवाडाचें अन्न खाऊन त्याचें अनिष्ट चिंतणारे असेही ह्या बडोद्यांत कांहीं आहेत एकूण !

**अण्णासाहेब.**— पण काय हो, कमीशनरांचीं काय मतें आहेत ?

**गंगाधरपंत.**— ह्मणतात कीं, तिघांचीं एकीकडे व तिघांचीं दुसरेकडे पडलीं आहेत.

**अण्णासाहेब.**— मोठा बेटा गोंधळच आहे हा. निकाला-कडेस कसे सर्वांचे डोळे लागले आहेत. हा आनंदाचा दिवस लवकर येवो. सर्व बडोदें कसें वाट पाहत आहे. आज हा घोंटाळा दोन तीन महिने चालला आहे, कोणास काम सुचत नाहीं, धंदा सुचत नाहीं, सर्व जेथचे तेथें कसे थबकून राहिले आहेत. अहो, प्रभूशिवाय सर्व व्यर्थ आहे. कसा झाला तरी राजा आहे. आतां ह्या जवळच्या पीडा आपोआप जातील व राज्यव्यवस्था उत्तम चालेल खचीत. देवा, आण असा सुदीन एकदांचा.

( सर्व जातात.)

---

## अंक ७.

### प्रवेश ३.

डाक्टरसीवर्डचा बंगला.

**डा० सीवर्ड.**—(इकडे तिकडे फिरतात) आजचा दिवस मोठा गडबडीचा आहे. हें आजचें काम सर्व यथा-

स्थित लागीं लागेपर्यंत मोठी काळजी आहे. (घड्याळ काढून पहातात.) अहो, तीन वाजले! चला तर, आतां तयारीस लागलें पाहिजे. विनायक, विनायक.

**विनायकराव.**— सर, (घावऱ्या घावऱ्या येतो)

**डा० सीवर्ड.**—(विनायकरावाचे कानाशीं लागून) आजचा हुकूम कळला का? महाराजांस संध्याकाळीं तावडतोव मद्रासेची वाट दाखवावयाची. करा तर तयारी आपली आतां.

**विनायकराव.**—मलाही बरोबर आलें पाहिजे?

**डा० सीवर्ड.**—अडचणीचे वेळेस विचार नको. तुझें त्यांत कल्याणच होईल. गेलेंच पाहिजे तुला.

**विनायकराव.**—जसा हुकूम. मी तयार आहें.

**डा० सीवर्ड.**—महाराजांचे खिसमतदारांस तयारीची वर्दी दे तर. सर्व सामानसुमान गाड्यांत भरून पुढें त्या जुन्या स्टेशनावर पाठवून द्यावें, महाराजांचें जेवण खाण आज ५ वाजावयाचे आंत आटपावें. मीडसाहेव सहा वाजतां येणार आहेत, त्यांचे अर्धीं सर्व तयारी झाली पाहिजे. परंतु मुख्य गोष्ट ही कीं ह्यांतील कांहींएक महाराजांचे किंवा इतरांचे कानीं अखेरपर्यंत जातां कामास नये.

**विनायकराव.**—हां साहेव, करतों तर मग तयारी.

(विनायकराव जातात.)

**डा० सीवर्ड.**—कोण आहे वाहेर, सीपाय्.

**श्रीपनराव.**—जी साहेव, मी आहें तो श्रीपत. (आंत येतो)

**डा० सीवर्ड.**—काय आहे? मी कामांत आहें, भेटण्यास फुरसत नाहीं.

**श्रीपतराव.**—नाहीं साहेब, दुसरें कांहीं नाहीं. येकदां महाराजांची भेट घेणें आहे.

**डा० सीवर्ड.**—नाहीं, आतां हुकूम नाहीं. महाराज भेटावयाचे नाहींत.

**श्रीपतराव.**—साहेब, कां वरें, मीं नेहमीं येणारांपैकीं आहें.

**डा० सीवर्ड.**—आज कलकत्याहून हुकूम आला आहे त्यावरून संध्याकाळीं महाराजांस दुसरीकडे वडोद्यांतून—आतां मला बोलण्यास फुरसत नाहीं. ( जाऊं लागतात.)

**श्रीपतराव.**—( धावरून ) महाराजांस बडोद्यांतून सरकार नेणार दुसरीकडे. कृपाकरून एकदां महाराजांस भेटण्यास हुकूम व्हावाच (मनांत) हर हर! इतकेंही करून शेवटीं हेंच कपाळीं आलेंना?

**डा० सीवर्ड.**— आपण जावें आतां. मीं फार गडबडींत आहें, महाराजांची भेट होणें नाहीं.

( श्रीपतराव जातात. )

**विनायकराव.**—साहेब, सामानाची बांधाबांधी झाली, दाराजवळ गाड्या आणल्या आहेत, सामान न्यावयाचें का आतां?

**सीवर्ड.**—हो, चला भरा गाड्यांत आणि गाडीवर पोंचतें करून द्या. कांहीं शिपायांस वरोवर जाण्यास सांगा ह्मणजे झालें.

( **सर रिचर्ड मीड** येतात )

**सीवर्ड.**—(मीडसाहेबांस) झाली सर्व तयारी. महाराजांचें

भोजन आटपलें, गाडीवर सामान पाठविलें. सर्व कांहीं तयारी आहे. आतां निघण्याचाच मात्र उशीर.

**मीडसाहेब.**—फार चांगलें. चला आतां महाराजांकडे जाऊं.

( दोघे महाराजांकडे जातात )

**मीडसाहेब.**—महाराज, सांगण्यास मोठी दिलगिरी वाटते. नाइलाज आहे. कलकत्याहून हुकूम आला आहे कीं महाराजांची आतांचे आतां बडोदें सोडून जाण्याची तयारी केली पाहिजे. चलावें तर, सर्व तयारी आहे.

**महाराज.**—(एकदम धसका बसतो) काय! काय ह्मणतां हें आपण! बडोदें सोडून दुसरीकडे सरकार मला पाठविणार ! मला सरकारानें राज्यास मुकविलें ! ( रडूं लागतात.)

**मीडसाहेब.**—महाराज, हुकूम आला आहे तो खरा. आह्मी सरकारचे चाकर. हुकुमाप्रमाणें काम करण्याचें आमचें कर्तव्य आहे.

**महाराज.**—मी विष घातलें अशी सरकारची खात्री झाली ! खटल्याचे स्वरूपावरून मला वाटलें होतें कीं मला पुन्हा पहिले दिवस खचीत येणार. मला प्रत्येकजण असें आश्वासनही देत होता. मी पुढल्या सुखाचें रोज चिंतन करीत बसत होतों. राज्यपद केव्हां पुनः प्राप्त होईल ह्मणून दिवस मोजीत होतों. सर्व हें शेवटीं स्वप्नासारखें झालेंना! हर हर! साहेब, मी पुनःपुनः निक्षून सांगतों कीं मी खचीत निरपराधी आहें. माझे दुस्मान हात धुऊन पाठीस

लागले होते त्यांचें हें सर्व कृत्य आहे. सरकारांनीं असा निकाल केला कीं मी खचीत अपराधी आहें? असें कधीं होणें नाहीं! साहेब, जाहिरनामा तरी काय सरकारचा आहे? ( डोळे पुसतात. )

**मीडसाहेब.**— (वाचून दाखवितात) महाराज, आतां कांहीं होणें नाहीं, सरकारानें ह्या कामीं पूर्ण विचार केला आहे.

**महाराज.**—हर हर! माझेंच नशीब खोटें, मीच अपराधी, मीच अभाग्य, सरकाराकडे तरी काय दोष! कसेंही असो, पण ह्या सर्वांत मला समाधानाची गोष्ट ही कीं सरकारानीं मला विषप्रयोगासंबंधीं तरी निरपराधी ठरविलें. हो तर, असें ह्मणण्यास काय हरकत आहे? जाहिरनामा असें स्वच्छ सांगतो. पण सरकारानीं मला दयाळू होऊन राज्य सुधारण्याकरितां तर १८ महिन्यांची मुदत दिली होती, आणि हा मध्येंच प्रकार! माझे राज्यांत नव्हती का सुधारणा होत? पण त्याचें आतां काय! (पुनः रडूं लागतात.) साहेब, मीं हात जोडून प्रार्थना करितों कीं आणखी एकदां माझे तर्फे सरकारास तार करावी व कळवावें कीं मी सर्वस्वी अपराधी तर आहेंच, पण ह्यापुढें सरकार सांगेल त्याप्रमाणें मीं राज्यांत व्यवस्था ठेवीन. सरकाराचे मर्जीबाहेर कांहींमात्र वागणार नाहीं. एक वेळ सरकारांनीं माफी करावी.

**मीडसाहेब.**—( वाईट वाटतें ) सर्व व्यर्थ आहे, व मलाही आतां तसें करितां येत नाहीं. माझा नाइलाज आहे.

आपली इच्छा असेल तेथें सरकार विचार करून आपणांस रहाण्याची परवानगी देतील व योग्य वेतनही देतील.

**महाराज.**– हर हर ! कोण हा प्रसंग मजवर ! माझ्याकरितां माझ्या मुलांबाळांचाही हक्क नाहींसा झाला एकूण अं ! त्यानीं विचाऱ्यांनीं काय केलें. चांडाळ मीं ! कशाला तरी जन्मास आलों. कुळास वट्टा लावण्यास ! धिक् माझें जिणें ! मला वाटलें होतें कीं सरकार माझ्या कामांत उत्तम प्रकारचा न्याय करतील व ह्या दुःखसागरांतून मीं लवकर मुक्त होईन. पण नाहीं परमात्म्याचे मनांत ! अशा ह्या मानहानीपेक्षां मरण पुरवतें. पण तें यायाचेंच नाहीं. (रडूं लागतात) माझ्या मुलांबाळांची तरी एकदां शेवटली भेट घेऊंद्या. येवढें तरी मला देणें द्या साहेब. मला एकदां तरी सर्वांस डोळे भरून पाहून घेऊंद्या. माझें दुसरें कांहीं आतां मागणें नाहीं. एवढी मेहेरबानी करावीच मजवर.

**मीडसाहेब.**–महाराज, तें कांहीं होणें नाहीं. आतां गाडीचा वेळ चालला. चलावें आतां महाराज.

**महाराज.**–शेवटीं माझें कोणतेंही मागणें पसंत पडत नाहींना ! चला, न्याल तिकडे येण्यास मी तयार आहें. हर हर ! प्रभो ! काय ही माझी अवस्था ! मी जन्मास येऊन काय केलें ! गायकवाडाचे कुळांत कशाला जन्म घेतला. एखादा साधारण लंगोट्या झालों असतों तर काय गेलें असतें ! जन

ह्मणतेना, कीं राजा सुखी. यावा तर जन्म राज्यकुळांतच यावा. पण कसलें राजास सुख! मजवरच पाहाना कसे दुःखाचे डोंगर कोसळले. पहिल्यानें आठ वर्षे तुरुंगांत काढिलीं. पुढें देवाजीस करुणा येऊन एकदां राज्यपद प्राप्त झालें. पुढें तरी मला सुख झालें काय. आज हें लचांड, उद्यां तें अरिष्ट, परवां दुसरेंच एखादें कांहीं संकट. राज्यावर बसल्यापासून एक दिवस तरी सुखाचा गेला काय! रात्रंदिवस एकसारखे काळजींतें कोंदिलें, आणि एवढें सर्व हें, माझ्या दुसमानांचे माझ्याविरुद्ध सतत प्रयत्नानें. नाना प्रकारचे दुष्ट लोक माझे भोंवतालीं जमले. आपमतलबीपणाच्या गोडगोड भाषणांनीं त्यांनीं माझे डोळ्यांवर भुरळ घातलें व मला आपलासा करून घेतला. माझ्या जिवावर हवींतशीं दुष्ट कृत्यें त्यांनीं केलीं. माझ्या राज्याची, माझ्या संपत्तीची, धुळधाणी उडविली, माझ्या सुदैवानें कांहीं खरोखर निरापेक्ष व देशहितचिंतक मंडळीस माझी करुणा आली, माझेकरितां ते दूरदेशांतून धांवत आले, पण त्यांचाही ह्या लुच्चे व आपमतलबी लोकांनीं येथें पाय टिकूं दिला नाहीं. बरें, तितक्यांत साहेब जे मिळाले ते तरी कसे? माझे हाडवैऱ्यांस त्यांनीं आपले स्नेही करून घेतलें, मजवर नानाप्रकारच्या फिर्यादी माझे रयतेकडून तयार करविल्या व माझी रयत मला जुमानीनाशी करून टाकिली, आणि आज दयाळू इंग्रेज सरकार व गायकवाड ह्यांचा जो पिढ्यान-

पिढ्या स्नेह, त्यामध्यें व्यत्यय आणिला. ह्या सर्वांचे योगानें हें आकाश मजवर कोसळलें. फार तर काय, ज्या धरणीमातेवर मीं चालतों ती देखील मजवर उलटली. मला जें मागें स्वप्न पडलें त्याचा ठोका पूर्ण आला, पूर्ण ठोंकर लागली, डोळे उघडले! जग कसें आहे ह्याविषयीं पूर्ण खातरी झाली. खऱ्यापेक्षां खोट्यास लोक ज्यास्ती चाहतात हें पूर्ण माझे मनांत ठसलें. प्रसंग आला असतां प्रत्यक्ष आई देखील कानाडोळा करिते ही माझी खातरी झाली. राजा आणि रंक ह्यांची किंमत सारखी आहे असें भासूं लागलें. इसपनीतींतील "करडूं आणि लांडगा" ह्या कथेचें तात्पर्य माझे मनांत पूर्ण ठसलें! पण काय उपयोग! डोळे फार उशीरां उघडले, ताहान लागल्यावर विहीर खणावीशी वाटली, त्रिदोषापर्यंत मजल येऊन ठेपल्यावर औषध घेण्याची इच्छा झाली! चला आतां, सर्व व्यर्थ आहे! हं, मग चला, आतां उशीर कशास पाहिजे!!

( गाडींत बसण्यास जातात. )

---

# अंक ७.

## प्रवेश ४.

राजवाडा.

म्हाळसाबाई साहेब.

**म्हाळसाबाई.**—कापांतील कोडत उठून तर आज बरेच दिवस झाले. आतां मग निकालास कां बरें इतका उशीर लागावा! लागला असेल झालें. तें भारूड कां थोडें आहे. ज्याला विचारावें तो असें ह्मणतो कीं गादीवर लौकर येणें होणार. पण मला बाई केव्हां एकदां डोळे भरून पाहीन असें झालें आहे, किती दिवस हा वियोग सहन करावा! आतां उद्यां येणें होईल काय? देवा, दाखीव एकदांचा सुदिन. नको अंत पाहूं!

(इतक्यांत श्रीपतराव घाबऱ्या घाबऱ्या येतात.)

**श्रीपतराव.**— (गोरें मोरें तोंड करून) सरकार, महाराज— (रडूं लागतात.)

**म्हाळसाबाई.**— (एकदम धसका बसतो) कांहों कां, श्रीपतराव! काय झालें?

**श्रीपतराव.**— (खालीं पहातात) हर हर! ह्या अधमानें आतां काय सांगावें. महाराजांस बडोद्यांतून दुसरी-कडे नेण्याची कडेकोट तयारी— (डोळे पुसतात) देवा! काय हा दिवस दाखविलास!

(म्हाळसाबाई मूर्च्छित होऊन धरणीवर पडतात)

**दासी.**— हाय हाय! अव पाणि आणा कि, शिरिपतराव. बयासाव, म्हाराज,' हे काय! (डोकें फोडते.)

(श्रीपतराव घात्र्या घात्र्या पाणीं आणतात व म्हाळसा- बाईचे तोंडांत घालतात व डोळ्यांस लावितात.)

**म्हाळसाबाई.**—( थोड्याशा सावध होऊन) हर हर ! देवा, आलाना शेवटीं हा प्रसंग! ( रडूं लागतात) काय करूं आतां मी, का डोकें फोडून घेऊं, का जीव देऊं, मेल्या जिवा, जाईनासकां एकदांचा, कशाला राहिला आहेस! आतां मी हे दिवस कसे कंठूं. नाहींग बाई मला वाटलें. असें होईल म्हणून. देवा, तूं सुद्धां माला ह्या वेळेस पाठमोरा झालास ना! असें मी काय तुझे घोडे मारिले होते ! मी आपले म- नांत मेली म्हणत होतें, आज येणें होईल, उद्यां येणें होईल, मग मीं डोळेभरून मुखचंद्र पाहून घेईन. चातकासारखी वाट पाहात होतें, पण मेले कोठलें माझें असें नशीब ! ! ( पुनः मूर्छित होते )

**श्रीपतराव.**—सरकार, असें काय करावें !

**म्हाळसाबाई.**—देवा, पुराणांतरीं मी कथा ऐकत होतें कीं भक्तांचे करुणास्वर ऐकून त्यांचे साहाय्यास तूं आ- लास. द्रौपदीवस्त्रहरणाचे वेळेस तुझा धांवा तिनें केला, तूं तिचा सहायकारी झालास. महासा- ध्वी तारामती! तिणें संकटसमयीं तुझा धांवा के- ला तेव्हां तूं तिला पावलास, तिच्या पतीस घोर संकटांतून पार पाडिलेंस व दोघांची पुन्हां भेट करवून त्यांस सुखी केलेंस; आणि मी ही हतभाग्या आज इतके दिवस करुणास्वरानें तुला आळवितें- तरी मला पाठमोरा झालास! खचीत मी अभाग्या! जर नसतें तर ह्या संकटांतून तिकडची खचीत

सुटका केली असतीस. आमचे सहस्र अपराध पोटांत घातले असतेस. अधम मी, पापी मी, चांडाळीण मी! ह्मणूनच माझी करूणा तुला नाहीं आली!

**दासी.**—बाइसाव, असं काय, मजकडं पहा की—

**साळसाबाई.**— तरी मी पहिल्यापासून सांगत होतें, देवाजीस भिऊन वागावें. त्यास न आवडेल तें कधींही करूं नये. ही चांडाळीण घरांत आणिली तेव्हां मी सांगत होतें कीं, ही घरांत आल्यापासून एकामागून एक विघ्नें येत आहेत. हिचा पायगूण चांगला नाहीं. हिच्याकरितां सर्वांचें वांकडें करून घेतलें आहे. नका हिच्या नादीं लागूं, नका हिच्याशीं लग्न लाऊं, घरांत लक्ष्मी आणणें ती चांगल्या पायगुणाची आणावी. मला ह्मणावयाचें कीं दुसरें कांहीं नाहींग, पोटीं पुत्रसंतानाकरितां ह्मणून इतकें झटावयाचें. मी ह्मणत असें, मजकडून हरकत नाहीं, पण कोणतीही गोष्ट करणें ती विचारानें झाली पाहिजे. आपणांस काय कमी, हव्या तशा मोठ्या कुळांतल्या सुशील बायका मिळतील. पण नाहींच ऐकिलें. त्या मेल्यांनीं हवी तशी भर घातली. हिनें घरांत पाय ठेविला मात्र, आणि वाटोळें होण्यास झाला आरंभ, आणि शेवटीं आज हें आकाश कोसळलें! देवाधिदेवा! काय मी करूं आतां!

**श्रीपतराव.**—सरकार, आतां आपण किती तरी शोक कराल, हर हर! हा प्रसंग येईल असें स्वप्नीं देखील नव्हतें!

**साळसाबाई.**—मी वारंवार हात जोडून किती विनवीत असें. अहो, हा पंत राज्यांत नको, ही दुसरी हवी,

मंडळीही जवळ नको. द्या कशी एकदांची घालवून. हे निःसंशय कधीं तरी आपणांस खालीं पाहण्यास लावितील. मजजवळ स्वप्न सांगितलें तें खरेंच किंग बाई झालें कसें तें. मीच एकटीनें असें सांगितलें असें नाहीं, त्या नव्या बिचाऱ्या मंडळीनेंही असेंच सांगितलें. फार काय, साहेबानेंही कान उघडले; पण नाहींच ऐकिलें कोणाचें. भारी भोळा स्वभाव बाई! तोच शेवटीं भोंवला! त्यांचीं तीं लाडीगोडीचीं भाषणें ऐकून सगळ्यांकडे कानाडोळा केला. काय त्या दामूला हरभऱ्याच्या झाडावर चढवून ठेविला होता! त्यानेंच ह्या सर्व बडोद्यास दुःखसागरांत बुडविलें! हाय हाय! कशी माझी गत होईल आतां. हे दिवस मी कसे कंठूं!

**श्रीपतराव.**—सरकार, आमच्याकडे पहा; आह्मीं तरी हतभाग्यांनीं कोणत्या प्रकारें आपली समजूत काढावी!

**म्हाळसाबाई.**—श्रीपतराव, आतां पुनः कसची भेट होती. शेवटीं मुलांमाणसांस त्यांनीं भेटूं सुद्धां किहो दिलें नाहीं. काय वरें वाटलें असेल, हंबरडा फोडला असेल! माझ्याकडे कांहीं नाहीं, मी निरपराधी आहें, असा हजारों वेळां उच्चार केला असेल! मला एकदां माझ्या सर्वांनां भेटूं द्या, असें ह्मटलें असेल. फार फार ग बाई दुःख झालें असेल. पण नाहींचना कोणास दया आली!! हर हर! असा प्रसंग वैऱ्यावरही येऊं नये! हाय हाय! आह्मांस भेटण्याकरितां भारी कंठशोष केला असेल. नाहीं ग बाई मी येथें एकटी रहावयाची, लौकर जाईन

कशी, उद्यां मी तजवीज करवितें. हर हर देवा! असे दिवस यावेना शेवटीं! धिक्कार असो आह्मांस! ...नः रडूं लागते ).

पडदा पडतो.

## अंक ७.

### प्रवेश ५.

—⋄⋄:◎:⋄⋄—

बडोदें आगगाडीचें जुनें स्टेशन.

**महाराज गायकवाड—मीड, रिची व सीवर्ड-साहेब—कमाबाई—लोक.**

( मल्हाररावांची गाडी स्टेशनावर येते )

**महाराज.**—साहेब, आतां शेवटीं आह्मीं बडोदें सोडून जावेंचना मग ! आतां कसली मंडळीची भेट. राणीसाहेबांस व माझे कमेस येथपर्यंत आणून तरी माझी शेवटची भेट करवा. त्यांस मी तर आतां मुकणारच व त्याही मला मुकणार! आतां पुढें कोठली त्यांची व माझी भेट!! प्रभो, अनाथाच्या नाथा! तुझी इच्छा ! येवढे तरी तुझे उपकार मजवर आहेत कीं माझ्यावर आलेला काळिमा तेवढा तरी तूं धुऊन टाकलास. माझें मन तरी आतां कांहीं अंशीं स्वस्थ राहील.

**मीडसाहेब.**—महाराज, आतां कशाला आह्मांस भीड घालतां आपण. आपला प्रवास सुरक्षित व्हावा. यावें आतां.

**महाराज.**—बरें, येतों तर आतां मी. आतां तिकडच्या मं-

डळीचें व राणीसाहेबांचें काय होईल तें होवो. त्यांस सोडून तर जाणें भाग आहे. पण आतां कोण ह्मणतो आह्मांस महाराज व त्यांस तरी राणीसाहेब! असो, येतों आतां. (मुजरा करितात. गाडीजवळ जातात, पण वर चढतां येत नाहीं; मीडसाहेब हात देतात, मल्हारराव वर चढतात व गाडींत बसतात. डोळे पुसतात).

**मीडसाहेब.**—महाराजांनीं काळजी करूं नये. बहुतकरून मागाहून राणीसाहेबांस आपणांकडे येण्याचा हुकूम होईल. मी तजवीज करीन. आपली बडदास्त उत्तम प्रकारची राहील.

**महाराज.**—महत् उपकार आहेत आपले सर्वांचे मजवर! (डोळ्यांतून पाणी काढितात) दुःखांत सुख एवढेंच कीं महाराणी सरकारानीं कृपा करून गायकवाडी तरी कायम ठेविली. मजकडून रयतेस सुख मिळालें नाहीं अशी सरकारची खातरी झालीच आहे, तरी तें आतां दुसरे राज्यकर्त्याकडून तरी मिळो. बिचारा सुखी नांदो व परमेश्वर त्यास दीर्घायुषी करो. (मनांत) शेवटीं येथवर मजल येऊन पोंहोंचलीना! असो, आतां काय त्याचें. हरि ठेवील तसें राहणें भाग आहे! येतों तर मी आतां. (मुजरा करितात, गाडी हळुहळू चालू होते, मीड वगैरे साहेब लोक जाऊं लागतात.)

**महाराज.**— (गाडींतून सर्व लोकांस मुजरे करितात) परमप्रिय लोकहो, येतों मी आतां. आपणा सर्वांचा

'मजवर लोभ असूं द्यावा. सर्व वडोद्यांतील माझ्या रयतेस मी विचारिलें आहे ह्मणून सांगावें. माझ्या मुत्सद्दीमंडळीस तर फारफार विचारिलें आहे ह्मणून सांगावें. होतें माझ्या मनांत, कीं हा माझा काळिमा धुवून टाकून माझ्या रयतेस पुन्हा आणखीं डोळे भरून पाहावें व सुखानें राज्य चालवावें. पण नाहीं देवाजीच्या मनांत! ( डोळ्यांतून पाणी काढितात. ) असो, आतां तुमचा दुसरा राज्यकर्ता तरी तुह्मांस सुख देवो! राजा ह्मणजे काय, ह्याचा खरा अर्थ त्यास समजो. माझ्या कमाबाईस विचारलें आहे ह्मणून सांगा बरें. (अरे, पण हो, ती पहा तिकडे कमेची गाडी आली आहे. मोठ्यानें) कमाबाई, येतों बरें मी आतां, सुखानें असत जा.

**कमाबाई.**— ( गाडींतून मोठ्यानें रडते ) बाबा, येतांना तुह्मी. हर हर देवा! काय हा मज दुबळीवर प्रसंग! शेवटीं हा दिवस आलाना! आतां माझें कसें होईल. कायग करूं बाई आतां मी. (गाडीकडे पाहते व हंबरडा फोडिते) बाबा.—

**लोक.**—'( सरकारास लवून मुजरे करितात; व डोळ्यांतून पाणी काढितात.)

**आबाशास्त्री.**—गेलेंहो गेलें, वडोद्याचें जीवित्व गेलें! आतां दुसरें कसेंही झालें तरी पूर्वींचे दिवस खचीत येणार नाहींत. आज एक आमच्या सारख्यांचा अन्नदाता नाहींसा झाला.

**श्रीधरभट.**— सरकार निघालेच ना. शेवटीं वडोद्यांतील धर्मराजा वडोदें सोडून चाललाना! शिव शिव! प्रभु

ह्मणजे केवळ धर्ममूर्ति होती. कोणीही जावो, त्याची आपली संभावना उत्तम प्रकारची व्हावयाचीच. अहो, काय बडोद्याचें नांव ऐकून काशीरामेश्वरा-पासून भिक्षुक धांवत येत होते. पुष्कळ राजे पाहिले; पण ब्राह्मणांचा समाचार घेणारा असा प्रभु पाहिला नव्हता!

दीपचंद.— गेली पहा, ती गाडी गेली, दूरवर गेली, आतां तर दिसेनाशी झाली. देवा! कठीण दिवस आले आतां! महाराज तर गेले. काय बरें ह्यांचे कारकी-र्दींत आबादानी असे! इतके दिवस सुखानें काढले.

जनकोजी.— सरकार! महाराज! गेलेतना शेवटीं अमाह्मी सोडून! राजा पण राजा होता, भारीच भोळा स्वभाव. बामणांच्या पायगुणांनीं हा प्रसंग आला. तरी आह्मी मराठे गडी सांगत होतों. पण महा-राजांस आमचें ह्मणणें गोड नाहीं लागलें. आणि आज आमाह्मीही टाकून गेले. (रडतो)

कृष्णाजीपंत.— चला, आतां काय, येथें जरी सहस्र वर्षें उभे राहिलों तरी गाडी पुनः परत येणार आहे काय, व पुनः महाराज भेटणार आहेत काय! नव्हतें ह्या राजाच्या प्रालब्धीं सुखानें राज्य करण्या-चें! आतां पुढें कसेंही होवो, पण ही घडी पुनः बसणें नाहीं. ह्या देशीं कायतें मोठें असें हिंदूचें राज्य हेंच, त्याचाही हा प्रकार! प्रारब्ध!! चला आतां!!!

(सर्व दुःखानें जातात.)

---

समाप्त.